रविवार, ९ एप्रिल २०२३
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२१७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 9 APRIL 2023 adhunikkesari.com Adhunik Kesari ●YEAR-02 ●ISSUE-217 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5




# स्व. मोहनलालजी बियाणी स्मारकासाठी जागा देऊ

## सहकार मंत्री अतुल सावे : राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार सोहळा उत्साहात



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर : पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी यांचे जीवन व पत्रकारिता आदर्श असुन मराठवाड्याच्या विकासात त्यांचे योगदान अनमोल आहे. त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार अतिशय अभिमानाची बाब आहे. त्यामुळे त्यांच्या नावाने पत्रकार प्रबोधिनी सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करून देऊ, यासाठी बीड जिल्हाधिकाऱ्यांना सुचना देऊ, असे आश्वासन सहकार मंत्री अतुल सावे यांनी दिले. तर पत्रकारांचे प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे बैठक लावून पाठपुरावा करू, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.**

छत्रपती संभाजी नगर येथे, शुक्रवार दि. ७ एप्रिल रोजी सहकार मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते लेखणीद्वारे सर्वसामान्यांच्या व्यथा मांडत, त्यांना न्याय मिळवून देणाऱ्या पत्रकारांना पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात आले. दैनिक मराठवाडा साथी व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, ( मुंबई ) यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील हॉटेल वर्षा इन येथे हा सोहळा पार पडला.

यावेळी दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदूलाल बियाणी, दैनिक मराठवाडा साथीचे संपादक जगदिश बियाणी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, मुंबईतील दैनिक पुढारीचे विशेष प्रतिनिधी चंदन शिरवाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. गेल्या तीन वर्षांपासून या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यात यंदा राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारांसोबतच 'पत्रकारिता जीवन गौरव' पुरस्कार व जनसंपर्कात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनाही 'कार्यगौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विभाग निहाय या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रभू गोरे यांनी केले. यात त्यांनी पुरस्काराचे स्वरूप स्पष्ट केले. पुढे बोलताना ना.अतुल सावे म्हणाले की, पत्रकारांचे महत्त्व राजकीय व्यक्ती शिवाय दुसऱ्या कुणाला एवढे माहीत नसते. सकाळी वर्तमानपत्र आले नाही तर दिवसाची सुरुवात व्यवस्थित होत नाही. अशा या पत्रकारांच्या काही समस्या मान्यवरांनी येथे मांडल्या. त्यासंबंधी लेखी निवेदन दिल्यास मुंबईला बैठक घेऊन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांमार्फत हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच वृत्तपत्र व्यवसायात आपला वेगळा ठसा उमटवल्याबद्दल मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी तथा संपादक जगदीश बियाणी यांचे कौतुकही केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक मराठवाडा साथी कार्यकारी संपादक प्रशांत जोशी यांनी केले. यावेळी वैभव स्वामी, ओमप्रकाश बुरांडे, चंद्रप्रकाश काबरा, प्रकाश वर्मा, रविंद्र बांगड, विलास शिंगी, मुकेश मुंदडा, संजय व्यापारी, संदीप घंटे, अनिल सावंत, सुधीर कोर्टीकर, मनोज पाटणी, पीयूष मुंदडा आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठया संख्येने उपस्थिती होती. **यांचा करण्यात आला सन्मान :** या पुरस्कार सोहळ्यात पत्रमहर्षी स्व. मोहनलालजी बियाणी राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्काराने दैनिक सकाळ मराठवाडा आवृत्तीचे कार्यकारी संपादक दयानंद माने, मुंबईतील दैनिक पुढारीचे विशेष प्रतिनिधी चंदन शिरवाळे, दैनिक लोकमतचे सहायक संपादक पवन देशपांडे, युनिसेफ महाराष्ट्रचे राज्य सल्लागार तानाजी पाटील तर 'पत्रकारिता जीवन गौरव' पुरस्काराने दैनिक आनंद नगरीचे संस्थापक संपादक शिवरतन मुंदडा व 'कार्यगौरव' पुरस्काने छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे जनसंपर्क अधिकारी संजय पाटील,महावितरणचे जनसंपर्क अधिकारी ज्ञानेश्वर आर्दड आदींना सन्मानित करण्यात आले. विभागीय पुरस्कार प्राप्त पत्रकार मराठवाडा विभाग : बाबा देशमाने ( दै. रिपोर्ताज, संपादक, बीड ), चंद्रकांत तारू ( दै. सकाळ, पैठण तालुका प्रतिनिधी ), सचिन बडे ( लोकशाही न्यूज चॅनल, छत्रपती संभाजीनगर ), प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये ( मुक्त पत्रकार, परभणी ), आनंद इंदानी ( दै. सकाळ, बदनापूर तालुका प्रतिनिधी ), सचिन कोरडे ( दै. आधुनिक केसरी, धाराशिव जिल्हा प्रतिनिधी ), संग्राम वाघमारे ( दै. पुढारी, चालकूर तालुका प्रतिनिधी ), गोकुळसिंग राजपूत ( दै. आनंद नगरी, सोयगाव तालुका प्रतिनिधी ), शकील खलिफा ( दै. देशोन्नती, पैठण तालुका प्रतिनिधी ), गोकुळ लांडे ( दै. मराठवाडा साथी, गंगापूर प्रतिनिधी ), संदीप मानकर ( दै. आधुनिक केसरी, सिल्लोड तालुका प्रतिनिधी ), सुरेश वायभट ( पैठण तालुका प्रतिनिधी ), प्रा. बिभीषण चाटे, ( दै. संकेत, बीड ), प्रा. बाळासाहेब बोराडे ( दै. आधुनिक केसरी, जालना जिल्हा प्रतिनिधी ) विदर्भ विभाग : प्रमोद पाणबुडे ( दै. साहसिक, वर्धा ), एकनाथ चौधरी ( दै. महाराष्ट्र टाईम्स, वर्धा प्रतिनिधी ), नाशिक विभाग : किरणकुमार आवारे ( दै. लोकनामा, निफाड तालुका प्रतिनिधी ), बंडू खडांगळे ( दै. आधुनिक केसरी, दिंडोरी तालुका प्रतिनिधी ), मनोहर बोचरे ( दै. सकाळ, देवगाव प्रतिनिधी ) पश्चिम महाराष्ट्र विभाग : श्रीकांत चौरे ( दै. मराठवाडा साथी, पारनेर तालुका प्रतिनिधी ), नवनाथ खिल्लारे ( दै. नवराष्ट्र, पंढरपूर प्रतिनिधी ), अशोक सूर्यवंशी ( दै. मराठवाडा साथी, मिरजगाव प्रतिनिधी ), नरहरी शहाणे ( दै. मराठवाडा साथी, पाथ्रडी तालुका प्रतिनिधी ), अजय नजन ( दै. मराठवाडा साथी, शेवगाव तालुका प्रतिनिधी ), किसन पवार ( दै. मराठवाडा साथी, कोपरगाव तालुका प्रतिनिधी ) कोकण विभाग : सचिन दामोदर कांबळे ( टाईम्स् नाऊ न्यूज चॅनल, रत्नागिरी ), विनोद पवार ( दै. पुढारी, मंडणगड प्रतिनिधी ), अमरावती विभाग : गुलाबराव इंगळे ( दै. सकाळ, जळगाव जामोद, तालुका प्रतिनिधी ), सागर झनके ( दै. आधुनिक केसरी, जळगाव जामोद तालुका प्रतिनिधी ), अमोल गावंडे ( दै. निर्भीड स्वराज संपादक, खामगाव ), किरण डोंगरदिवे ( मुक्त पत्रकार ) आदींना सन्मानित करण्यात आले.

### चक्राकार पद्धतीने जाहिराती देण्यासाठी सहकार्य करा : वसंत मुंडे




परळी शहरात चार दशकांपूर्वी स्वर्गीय मोहनलालजी यांनी दैनिक मराठवाडा साथीची मुहूर्तमेढ रोवली . मोहनलालजी नेहमीच विकासाच्या कामात पुढे असायचे, मी देखील अंबाजोगाईतून दैनिक मराठवाडा साथीत काम केले आहे, याचा मला अभिमान आहे, असे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले . पुढे बोलताना ते म्हणाले की, सत्ता आल्यानंतर माणूस कळतो . पत्रकारांच्या पेन्शनसाठी अटी – शर्ती अधिक लावण्यात आल्या आहेत . दुसरीकडे अधिस्वीकृती मिळण्यासाठीही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो . गृहनिर्माण संस्थेचा प्रश्न असेल किंवा चक्राकार पद्धतीने जाहिराती देण्याचा विषय असेल, आदी अनेक विषय आहेत . ते सोडवण्याकरिता आपण सहकार्य करावे, अशी विनंतीही त्यांनी मंत्री सावे यांच्याकडे केली .

### पत्रकारांचे अधिवेशन व्हावे : चंदुलाल बियाणी




दुसऱ्यांना न्याय मिळवून देणाऱ्या पत्रकारांच्या स्वत :च्या देखील अनेक समस्या आहेत . या समस्या बाजूला ठेवून ते सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी काम करत असतात . परंतु त्यांच्या समस्यांकडेही आपल्याला लक्ष द्यावे लागेल . त्यातील काही समस्या माझ्या सहकाऱ्यांनी येथे मांडल्या आहेत . असे सांगत दैनिक मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदूलाल बियाणी यांनी परळी वैजनाथ येथे पत्रकारांचे राज्यस्तरीय अधिवेशन घेण्याचा मनोदय अध्यक्षीय भाषणात व्यक्त केला .

### पत्रकारांसाठी एखादे महामंडळ असावे : डोईफोडे



विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी देखील, बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेसाठी लावण्यात आलेले क्लिष्ट नियम शिथिल करण्याबाबत मंत्री सावे यांच्याकडे मागणी केली . यासह आता विविध महामंडळ स्थापन झाली आहे . यामुळे पत्रकारांसाठीही एखादे महामंडळ असावे असे देखील डोईफोडे म्हणाले .






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




## अजिंठ्याच्या लेण्यांतून घडणारे बुद्ध दर्शन

आधुनिक केसरी

्याच्या दुःखात त्याची पत्नी सुंदरी हिचा दुःखद शेवट झाला. या लेण्या नवव्या दहाव्या शतकापर्यंत लोकांना ज्ञात होत्या. सातव्या शतकात भारतात आलेल्या ह्युएन त्संग या चिनी प्रवाशाने आपल्या लेखनात अजिंठ्याच्या लेण्यांचे वर्णन केले आहे. त्यानंतर मात्र या लेण्या हळूहळू लोकांच्या दृष्टीआड झाल्या आणि काही शतकात पूर्णपणे विस्मृतीत गेल्या. १८१९ मध्ये तेथे शिकारीसाठी गेलेल्या जॉन स्मिथ या ब्रिटिश अधिकाऱ्याला योगायोगाने या लेण्यांचा शोध लागला आणि त्या जगाला ज्ञात झाल्या. गौतमाचे बुद्ध झाल्यानंतरचे आयुष्य जेवढे महान, भव्य आणि उदात्त आहे, तेवढेच महान, आकर्षक आणि मनोरम असे त्यापूर्वीचे सुद्धा. कपिलवस्तूच्या शुद्धोधन राजाला उशिरा प्राप्त झालेले हे पुत्ररत्न साहजिकच त्याचे अत्यंत लाडके असते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे या बाळाला त्याची आई त्याच्या जन्माच्या सातव्या दिवशीच पोरके करून जाते. अत्यंत देखणा आणि सर्व कलांमध्ये निपुण असलेल्या या राजपुत्राला कोणत्याही प्रकारचे दुःख दृष्टीला पडू नये म्हणून त्याचा पिता राजा शुद्धोधन काळजी घेतो. सगळी सुखे त्याच्यापुढे हात जोडून उभी असतात. पण या सुखांचा उपभोग घेण्याची लालसा तेव्हाही त्याच्या मनात उद्भवलेली नसते. सिद्धार्थ उर्फ गौतम हा आपल्या सभोवतालच्या परिस्थितीचे बारकाईने निरीक्षण करून त्यावर विचार करणारा अतिशय संवेदनशील आणि कोमल मनाचा युवक असतो. त्याची ही एक प्रकारची विरक्त वृत्ती पाहून राजाला त्याची काळजी लागलेली असते. त्यातून मार्ग काढण्यासाठी दरबारी जनांच्या सल्ल्याने तो त्याचा विवाह करून देण्याचे ठरवतो. त्यामुळे तरी त्याची विरक्ती कमी होऊन मन संसारात रमेल असे त्याला वाटते. सिद्धार्थाच्या विवाहासाठी ज्या राजकन्येची निवड केली जाते, तिच्या पित्याकडे हा प्रस्ताव पाठवला जातो. त्यावेळी तिच्या पित्याच्या कानावर सिद्धार्थाचा लौकिक गेलेला असतो. अंगात कोणतेही शौर्य आणि मर्दुमकी नसलेल्या या राजपुत्राला आपली कन्या देणे तो अयोग्य समजतो. वधूपिता म्हणून त्याची चिंता योग्यच असते.



## आनंदी पहाट

## आनंदी वातावरणामुळे मनःस्वास्थ्य टिकते

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. अर्थात सरधोपटपणे केलेल्या विचारांत सकारात्मकता असतेच असे नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. त्यासाठी एक हक्काचे ठिकाण म्हणजे आपले घर. घर केवळ चार भिंतीचे नसते, घराचे घरपण आपण मिळवायचे असते, त्या घरात मनाला रमवायचे असते. आपल्याच घरात रोज नवे काहीतरी आजमावायचे असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. आपल्या अंतर्मनातील आनंद निर्माण करण्याची बाब ही जितकी महत्वाची असते तितकेच सौंदर्याला देखील महत्व असते. आपण आपल्या जीवनात सौंदर्याचा शोध घेत असतो तेव्हा ते अधिकाधिक कसे मिळवता येईल यासाठीच प्रयत्नशील असतो. सुंदरता, ही आपल्या प्रत्येक गोष्टीकडे बघण्याच्या दृष्टीकोनावर अवलंबून असते. आनंद मिळवून जीवन जगण्यातच आपले मनःस्वास्थ्य टिकून राहू शकते. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण या सर्व बाबींवर आपले व्यक्तिमत्व बाहय तसेच अंतर्गत कसे असू शकेल, हे ठरते. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपले व्यक्तिमत्व ऐट अणू शकते. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारे मन निश्चितच आपल्या जीवनात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकते.

## कौतुकाची थाप...

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515


भाग-69

लहान मुलांचे कौतुक केले तर मुलांना खूप आनंद होतो. त्यांचा उत्साह वाढतो. आणखी काही नवीन करण्याची त्यांना प्रेरणा मिळते. जसं आपण लहानांचं कौतुक करतो तसेच मोठ्यांचंही कौतुक करावं. कुठलेही काम केल्यावर जेव्हा कौतुकाची थाप मिळते ना तेव्हा केलेल्या कामाचा शिनभाग जातो. थकवा दूर होतो. पुन्हा नवं काम करण्याची उमेद मिळते. कौतुक करण्यासाठी पैसा लागत नाही. काही शक्ती खर्च होत नाही. मन मोकळेपणाने दुसऱ्यांचे कौतुक केले पाहिजे. तेवढा मनाचा मोठेपणा आपल्याकडे पाहिजे. एखाद्याने चांगले काम केले तर त्याचे तोंड भरून कौतुक केलेच पाहिजे. नुसतं एवढं कौतुक रिकामटेकडा, तेवढेच काम आहे ,तेच करतात, चमचेगिरी, मिरवायला आवडतं, प्रसिद्धीची हाव अशा सुंदर उपमा त्या व्यक्तीला दिल्या जातात. ध्येयवादी व्यक्ती कशासाठीच हपापलेली नसते. ना कौतुक, ना अपेक्षा, ना सांतवण ,ना प्रोत्साहन. त्यांच्या नजरेत फक्त आणि फक्त ध्येय दिसत असते. पण झालंच कौतुक तर छाती अशी अभिमानाने फुगते हो लेकरांची आणि मोठ्यांची सुद्धा. चेहऱ्यावर छान हसू फुलते. हृदय प्रेमाने भरते . जग खूप प्रेमळ आहे अशी भावना वाढीस लागते. कौतुक कुठे करावे हे पण समजलं पाहिजे. उगीचच कशाचंही कौतुक करून खतपाणी घालू नये. लहानपणी मुलं मोठ्या सारखी बोलतात तेव्हा ते कौतुक नसावे .तिथे वेळीच लक्ष देऊन गाडी वळणावर आणावी. पोपट जसा छान बोलतो तेव्हा कौतुक होते. पण तो जर शिव्या शिकला तर तिथे त्याचं कौतुक नको. पोपटाला सुद्धा चांगलेच शिकवावे लागते. नाहीतर, ढवळ्या शेजारी बांधला पवळ्या, वाण नाही पण गुण लागला, योग्य वेळी योग्य गोष्टीचे कौतुक व्हावे. केलेल्या कामाचा शिण येत नाही मग. मन सुखावते कौतुकाने. काही जण कौतुकाचे खूप भुकेले असतात. कौतुक केले तर सर्व काही दान करायला तयार असतात .कौतुक कशाचे? कुठे? कधी? कोणाचे ?करावे हे सुद्धा जमलं पाहिजे. नाहीतर मुलांनी मारामारी केली वस्तू चोरली त्याचे कौतुक झाले तर ते पुढे गुंड ,चोर, दरोडेखोर बनतील. एवढं सगळं वाचलं म्हणून आपले कौतुकच आहे.

## तेनालीरामचे चातुर्य

आधुनिक केसरी

एक दिवस राजा कृष्णदेवराय कोणत्या एका कारणामुळे तेनालीरामवर नाराज झाले होते व रागात येऊन त्यांनी भरलेल्या दरबारात तेनालीरामला सांगितले उदयापासून मला दरबारात तुझे तोंड दाखवू नको. त्यावेळी तेनालीराम दरबारातून बाहेर निघून गेला. दुसऱ्या दिवशी जेव्हा महाराज दरबाराजवळ येत होते तेव्हा एका चुगलीखोराने त्यांना हे सांगून भडकविले की, तेनालीराम तुमच्या आदेशाचे पालन न करता दरबारात उपस्थित आहेत. हे ऐकून महाराज भयंकर चिडले. तो चुगलखोर दरबारी पुढे बोलला – तुम्ही स्पष्ट सांगितले होते की दरबारात आल्यानंतर चाबकाचे फटके मिळतील याची पण त्यांनी पर्वा केली नाही. आता तर तेनालीराम आपल्या आदेशाचे पालन करणे शक्यच नाही. राजा दरबारात आला. त्यांनी बघितले की डोक्यात मातीचा एक माठ घालून तेनालीराम काहीतरी विचित्र हावभाव करत आहे. त्या माठाचा चारी बाजूला प्राण्यांच्या तोंडाचे चित्र बनलेले




होते.'तेनालीराम हा काय मुर्खपणा चालविला आहे, तू माझ्या आज्ञेचे पालन केलेले नाही. महाराज पुढे बोलले की, शिक्षा म्हणून चाबकाचे फटके खायला तयार रहा. 'मी कोणत्या आज्ञेचे पालन केले नाही महाराज?' माठात तोंड लपवून तेनालीराम बोलला – 'तुम्ही बोलला होतात की, उदया मला दरबारात तुझे तोंड दाखवू नकोस, तुम्हाला माझे तोंड दिसते आहे का?' हे देवा! कुभांराने मला फुटलेला माठ तर नाही ना दिला. हे ऐकताच महाराजांना हसू आले व ते बोलले – तुझ्यासारख्या बुध्दिमान आणि हजरजबाबी बरोबर कोणी नाराज होऊच शकत नाही. आता हा मातीचा माठ डोक्यावरून काढ व आपल्या जागेवर आसनस्थ हो."

## परमात्मा आनंदरूप आहे

आधुनिक केसरी

भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. भगवंताच्या हास्यमुखाचे ध्यान करावे. प्रत्येक गोष्टीत मनुष्य आनंद पाहात असतो. उकाड्यात वारा आला, त्याला वाटते बरे झाले; पाऊस आला की त्याला वाटते, आता गारवा येईल. कोणत्याही तऱ्हेने काय, मनुष्य आनंद साठवू पाहात असतो. मनुष्याला भूक लागेल तेव्हा तो जर अन्न खाईल तर त्याचे पोट भरेल आणि त्यापासून त्याला आनंद होईल; परंतु त्याने विष खाल्ले तर त्याने आनंद न होता मरण मात्र येईल. तसे आपले होते. आपण विषयातून आनंद घेऊ पाहतो आणि तो बाधक होतो. एखाद्या रोग्याला जर जंत झाले आणि त्याला जर खूप खायला घातले तर ते शरीराला पोषक न होता जंतच वाढतात; त्याचप्रमाणे आपण सत्कर्मे करताना पोटात विषयांचे प्रेम ठेवून ती केली, तर त्यामुळे विषयच पोसले जाऊन, त्यांपासून समाधान लाभू शकत नाही. याकरिता कर्तव्यबुद्धीने कर्म करावे, म्हणजे ते बाधक ठरत नाही. मनुष्य जन्मभर जो धंदा करतो त्याच्याशीच तो तद्रूप होऊन जातो. एखादा वकील घ्या, तो त्याच्या धंद्याशी इतका



तद्रूप होतो की, मरतेवेळीसुद्धा तो वादच करीत जाईल. नोकरी करणारा नोकरीशी इतका तद्रूप होतो की, स्वप्नातदेखील तो स्वतःला नोकर समजूनच राहतो. कर्म कसे करावे तर त्याच्यातून वेगळे राहून. लग्नाचा सोहळा भोगावा, लाडू खावेत, परंतु ते दुसऱ्याचे आहेत असे समजून. आपल्या मुलीचे किंवा मुलाचे नाहीत असे मानून; नाही तर व्याह्यांची काळजी लागायची, किंवा हुंडा मिळतो की नाही इकडे लक्ष लागायचे ! त्यामुळे तापच निर्माण होईल. कर्माशिवाय कोणालाच राहता येत नाही. एखाद्याला शिक्षा द्यायची म्हणून, 'अगदी हलायचे नाही, पापणी, हात, पाय, काहीही हलवता कामा नये,' असे सांगितले तर ते जसे त्याला शक्य होणार नाही, तसे काही ना काही तरी कर्म हे होणारच. भगवंतांनी अशी काही सांगड घालून दिली आहे की, कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु ती कर्मे 'राम कर्ता' ही भावना विसरून केली तर बाधक होतात आणि मरणापर्यंत माणूस पुढल्या जन्माची तयारी करीत राहतो; तेव्हा, देहाने कर्म करतानाही ' कर्ता मी नव्हे ' हे जाणून कर्म करावे. आपल्याला कर्म केल्याशिवाय करमत नाही. पण आपण फळाची आशा उगीचच करीत असतो. आपण फळाची आशा सोडून कर्म करू लागलो, की ते कर्म करीत असतानाच समाधान प्राप्त होते.

**आजचे बोधवचन आहे ----**

**७२. प्रपंचात सर्वांकरिता सर्व करावे , पण मनात मात्र 'मी रामाचा आहे' ही अखंड आठवण ठेवावी, म्हणजेच त्याच्या नामात राहावे. श्रीराम समर्थ**

## निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जानासि सकलं मातः**
**त्वं मदपेक्षया च मे |**
**मूढोऽहं च विमूढोऽहं**
**वदामि त्वां पुनः पुनः || 7 ||**
**हे माते, माझ्यापेक्षा माझे सर्व काही तू जाणतेस. मी मूढ आहे. मी विमूढ आहे, म्हणून तुला पुनः पुन्हा सांगतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**कुञ्जर निज मारग चले, श्वान भूँक थकि जाय ।**
**वड़ में क्षमा प्रधान है, जहाँ क्षमा प्रभु आय**
**।।०९।।(स्वर्वेद तृतीय मण्डल दशम अध्याय)**
**०३/१०/०९**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

हत्ती आपल्या मार्गाने चालत असतो आणि कुत्री भुंकून थकून जातात , तद्वतच महापुरूष आपल्या मार्गाने जात असतात आणि द्वेषी जन मागून त्यांची निंदा नालस्ती करून थकून जातात. महापुरूष सर्व विघ्न-बाधा दूर करून , सहन करून आपलं ध्येय गाठतात. म्हणून श्रेष्ठ पुरूषांमधे क्षमा हा प्रधान गुण आहे. जिथे क्षमा आहे, तिथे भगवंताचे वास्तव्य आहे आणि तिथेच सर्व शक्ती, समृद्धी आणि गुण आपोआप येऊन प्राप्त होतात.

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

समाजात आपण वेगवेगळ्या प्रकारची माणसं पहातो.कणी खुपच प्रेमळ असतात, तर काही रागीट स्वभावाची असतात. काही लबाड असतात, संधीसाधू असतात. तर काहीचां जन्मच जणू दुसऱ्यांचे कल्याण करण्यासाठी झालेला असतो. अशी माणसं स्वतः साठी कमी व समाजासाठी जास्त जगत असतात. अशी सत्वगुणी माणसं आहेत म्हणून तर समाजात नितीमुल्ये टिकवून आहेत. तमोगुणी व रजोगुणी माणसांमुळे समाजाला हानी पोहचते. तर सत्वगुणी माणसांमध्ये देखील निव्वळ शुध्द भगवंताची आवड असणारे माणसं सर्वात कमी असतात. त्यांना फक्त परमार्थ साधण्याची हौस असते. म्हणून त्यांना आत्मज्ञान प्रतिपादन करणा-या अद्वैत ग्रथांची आवड असते. बाकीच्यांना इतर विषयांची ओढ असते.
ज्ञानमार्गी आहे त्यास ज्ञानाची ओढ असते. भक्तांना भजन आवडते. तर साधकाचा सगळा वेळ साधन मार्गातचं जातो. कंजूस माणसाला द्रव्य आवडते. योगी लोकांना योग आवडतो. स्वार्थी माणसाला स्वार्थ आवडतो। कवीला काव्य आवडते. तर्कशुद्ध माणसाला तात्विक वाद विवाद आवडतात. कलावंतांना वेगवेगळ्या प्रकारच्या कला आवडतात. कुणाला स्नान संध्या आवडते. कुणाला हरी किर्तन आवडते. प्रेमळ माणसांन दया करूणा आवडते. चतुरांना हुशारी आवडते तर व्यवहारी जगात वावरत असताना व्यवहार कौशल्य आवडते. आपण आता समासाच्या शेवटाकडे आलो आहोत.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**तुका म्हणे करी ।ताका दुधा एक सरी ॥३॥**
**हो का पुत्र पत्नी बंधु ।त्यांचा तोडावा संबंधु ॥१॥**
**कळों आलें खट्याळसें ।शिवों नये लिंपों दोषें ॥ध्रु.॥**
**फोडावें मडकें ।मेलें लेखीं घायें एकें ॥२॥**

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ९ एप्रिल २०२३



# भ्रष्ट नेत्यांना न्यायालयाची थप्पड ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

विरोधी पक्षाला २०२४ च्या लोकसभा निवडणुकीचे डोहाळे आतापासून लागले आहेत. त्यांनी 'मोदी हटाव देश बचाव, असा नारा दिला. पण मोदी हटाव, का ? केवळ काय तर! भ्रष्टाचाराच्या कारणावरुन ईडी व सी.बी आय. राजकीय नेत्यावर कारवाया करत आहे, म्हणूनच! स्वातंत्र्यानंतर प्रथमच मोदी सरकारच्या काळात ईडी व सी.बी आय.ने भ्रष्ट राजकीय नेत्यांच्या विरोधात कारवाया सुरु केल्या आहेत. पूर्वी व्यापारी, शासकीय अधिकारी, बडे उद्योगपती, कंत्राटदारावर धाडी पडत असत.देशातील भ्रष्ट राजकीय नेते, त्यांची करोडाची बेनामी संपत्ती असूनही त्यांचेवर कारवाई होत नसे. पंतप्रधान मोदी यांनी या तपास यंत्रणेला खुली सूट दिली. या तपास यंत्रणेच्या कारवाईत काही राजकीय नेते जेलमध्ये गेले. काहींची संपत्ती जप्त करण्यात आली. भाजपाने २०१४ निवडणूक भ्रष्टाचाराच्या मुद्दावर लढविली होती. यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. तेंव्हा मोदी नावाची लाट होती.नंतर २०१९ च्या निवडणुकीत भाजपा विकासाचा विषय घेऊन मतदारांसमोर गेला. त्यांनी मोदी सरकारवर विश्वास दाखविला.मोदी व भाजपा सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. प्रथम राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी 'नॅशनल हेराल्ड' प्रकरणात कोट्यवधी संपत्ती जमा केली.त्याबाबत तपास यंत्रणेने चौकशी सुरु करताच काँग्रेसने थयथयाट केला. या पक्षाने रस्त्यावर आंदोलन केले. त्यानंतर, आम आदमी तृणमूल काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, शिवसेना ठाकरे गट, भारत राष्ट्र समिती, समाजवादी पक्षातील भ्रष्ट नेत्यावर कारवाई सुरू झाली. देशात राजकीय नेत्यावर भ्रष्टाचाराची कारवाई करण्याची हिंमत कोणात नाही, अश्या घमेंडीत राजकीय नेते होते.पण मोदी सरकारने देशात भ्रष्ट नेत्यांकडे असलेला पैसा व संपत्तीची चौकशी सुरु केली. यात विरोधी पक्षाचे नेते अधिक आहेत. पण मोदी सरकार विरोधी पक्षाच्या नेत्यावर सुडबुध्दीने कारवाया करत आहे, असा कांगावा सुरु केला. भाजपा नेते भ्रष्ट नाहीत काय ? त्यांचेवर कारवाई का होत नाही ? भाजपाकडे भ्रष्ट नेत्यांची वाशिंग मशीन आहे काय ? भाजपात गेलेल्या नेत्यांची चौकशी होत नाही, असा पक्षपातीपणाचा आरोप केला जात होता. यातून स्वतः भ्रष्टाचार सुटका व्हावी यासाठी राजकारण! जर विरोधी पक्षात स्वच्छ चारित्र्याचे नेते असतील तर त्यांच्या नेते व मंत्र्याकडे नोटांचे ढीग, बेनामी संपत्ती कशी काय सापडते ? सी.बी.आय. व इडीच्या राजकीय नेत्यावर कारवाईचे सामान्य माणूस समाधान व्यक्त करत आहेत.पण परिवारवादी पक्ष नाराज आहे. त्यामुळे मोदींनी देश विकायला काढला! महागाई, बेकारी वाढली! अदानी हे करोडपती झाले! असे आरोप करून देशाभूल करत आहेत. देशात ५१ वर्षे काँग्रेसची सत्ता होती. तेंव्हा गरीबी व बेकारी दूर का झाली नाही ? मग नऊ वर्षात हे प्रश्न पूर्णपणे सुटतील, अशी काय अपेक्षा कशी केली जातेय ? जगात अनेक राष्ट्राची अर्थव्यवस्था ढासळली आहे. तसेच श्रीलंका, पाक हे शेजारी राष्ट्र कंगाल झाले आहेत.त्यात करोनासारख्या महामारी प्रगत राष्ट्रांनाही फटका बसला.त्यात भारताची १३० कोटीची लोकसंख्या व गरीबी असताना करोनाच्या संकटात मोदी सरकारने गरिबांना मोफत धान्य, औषधी, थेट आर्थिक मदतीचा हात पुढे केला. भारतात करोना लसीचे संशोधन करून लाखो लोकांचे प्राण वाचविले आहेत. देशाचे मुद्रा भांडार ५६१अरब डॉलरपर्यंत पोहचले आहे. देशाचा २०२२- २३ मध्ये विकास दर ८ ते ८.५ टक्यापर्यंत जाण्याची शक्यता आहे. महागाई दर हा २०२३ मध्ये ६. ८ टक्के आहे. काँग्रेस राजवटीत तो १० टक्के होता. जगात भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे. आज जगात भारताची प्रतिष्ठा वाढलेली आहे. पण हे विरोधी पक्षाला मान्य नाही. इकडे भ्रष्ट राजकीय पक्ष मोदींना लक्ष्य करत आहेत. मोदी विरोधातून भारताची आंतराष्ट्रीय पातळीवर देशाची बदमामी केली जात आहे. रामनवमीच्या शोभायात्रेवर दगडफेक व हिंसा व लुटीची घटना घडल्या.पण पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी व बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार दंगलखोरांना वाचविण्यासाठी हिंदु संघटना व भाजपाचे दंगलीचे आरोप केला.याचा परिणाम मुस्लिम राष्ट्र संघटनेने ( OIC ) भारतात रामनवनीच्या निमित्ताने मुस्लिमाला लक्ष्य केले जात असल्याचे म्हंटले आहे. याचा भारतातील राजकीय पक्षाने व मुस्लिम संघटनाने लाज वाटली नाही व विरोधही केलेला नाही.

मोदींना सत्तेतून घालण्यासाठी वेगवेगळे हातखंडे वापरले जात आहेत. यात जनतेत गैरसमज पसविणे, भावना भकडविणे चालू आहे. पण मोदी डगमगणारे नेते नाहीत! हे त्यांना माहित आहे. देशातील परिवारवादी पक्षांनी भ्रष्टाचाराच्या कारवाईत राजकीय नेत्यांना चौकशीत सुट देण्यात मिळावी, कारण हे राजकारणी नेते अतिमहत्वाच्या व्यक्तीमध्ये येतात! त्यात तर्क असा की, २०१९ मध्ये भाजपाची मताची टक्केवारी ३७.३६ टक्के व काँग्रेससह गठबंधन पक्षाची मते ४५ टक्के होती. या भ्रष्टाचाराचे नेतृत्व काँग्रेस पक्षाकडे होते. काँग्रेसचे वकील ॲड. अभिषेक मनुसिंघवी यांनी न्यायालयात सांगितले की, २०१३-१४ ते २०२१ २०२२ पर्यंत सी.बी. आय. व ईडीच्या प्रकरणात ६०० टक्के वाढ झाली आहे. ईडीमार्फत १२१ प्रकरणाची चौकशी चालू असून यात ९५ टक्के विरोधी पक्षावर आहे. सी.बी आय. १२४ प्रकरणात चौकशी चालू आहे. त्यात ९५ विरोधी पक्षावर आहे, अशी आकडेवारी दिली गेली. तसेच भाजपामधील भ्रष्ट नेत्याची नावे न्यायालसमोर दिली नाहीत! विरोधी पक्षाच्या नेत्यांना यात विशेषाधिकार देण्याची मागणी केली. तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाने फटकारले, तेंव्हा गुपचूप याचिका मागे घेतली व मान खाली घालून परतावे लागले! देशातील विरोधी पक्ष निर्लज्जपणे अशी मागणी करू शकतो. याचे आश्चर्य वाटते! पण मराठी मिडीयाला मुख्य मथळा वृत्त वाट नाही. देशातील आजचा मीडिया राष्ट्रविरोधी शक्तींचा, भ्रष्ट परिवारवादी पक्षांची स्तुती सुमनांचा वर्षाव करत आहे. देशाच्या पंतप्रधान मोदी व्देषातून त्यांचे चारित्र्यहनन करतो आहे. तरीही मीडीयाची गळचेपी वाटतेय! न्यायालयाने मिडीयाबाबत केंद्राला फटकारले, हे वृत्ताला महत्वाचे स्थान दिले गेले आहे. मीडिया हा राजकीय पक्षाची भाटगिरी, असत्य, मोदी व्देषाप्रेरित लेख वृत्त मोठ्या प्रमाणात देत आहे.तेंव्हा मीडियाकडून सत्याची लोकशाहीची व स्वातंत्र्याची अपेक्षा करणे चुकीचे आहे. देशातील २०१९ च्या मताची टक्केवारीनुसार विरोधी पक्ष एकत्रपणे निवडणूक लढविल्यास मोदीचा पराभव करतो येतो, असे एक राजकीय गणित मांडले जात आहे. त्यातून भ्रष्टाचारी परिवारवादी पक्षांनी 'वज्रमूठ' बांधण्यास सुरूवात केली आहे. पण येत्या २०२४ च्या निवडणुकीत मोदीच्या विरोधात कोण ? हा प्रश्न सुतलेला नाही. कारण विरोधी पक्षाकडे मोदींना टक्कर देणारा तरी नेता नाही. त्यात प्रत्येक परिवारवादी राज्याचा मालक बनला आहे. प्रत्येक पक्ष सत्तेचा' लोण्याचा गोळा' अधिक मिळवण्याचा प्रयत्न करेल! तेंव्हा विरोधी पक्षात जागा वाटपावरुन मतभेत शक्यता नाकारता येत नाही.मोदींनी विरोधी पक्ष नेत्यावरील भ्रष्टाचाराची मोहिम थांबवावी, यासाठी दबाब तत्राचा वापर केला आहे. यातून मोदींच्या चारित्र्यावर हल्ले केले जात आहेत. काँग्रेस पक्ष हा भ्रष्टाचाराची जननी आहे. तत्कालिन पंतप्रधान राजीव गांधी यांची बोफार्स खरेदीवरुन आरोप झाले. श्रीमती सोनिया मुलगा राहुल गांधी यांचेवर 'नॅशनल हेराल्ड' तून कोट्यवधी रुपायांची संपत्ती गोळा केलेल्या प्रकरणाची चौकशी चालू आहे. प्रियंका वाड्रा परिवार हा जमीन घाटोळ्यात अडकलेला आहे. नेहरू -गांधी परिवारांच्या भ्रष्टाचाराची हजारो प्रकरणे आहेत. आजपर्यंत या घराण्यावर कारवाई झालेली नाही. गांधी परिवार भ्रष्टाचाराचा कलंक पुसण्यासाठी अदानीचा प्रश्न लाऊन धरत आहे.त्यांना भाजपा व मोदी सुध्दा भ्रष्ट नेते आहेत, हा संदेश लोकापर्यंत पोहचवायचा आहे.ही गांधी परिवाराची कपटनीती आहे. त्यासाठी संसदीय समितीचा हट्ट धरला जात आहे. काँग्रेस सदस्य दोन्ही सभागृहाचे कामकाज होऊ देत नाहीत, त्यामुळे जनतेच्या करोडा रूपायाचे नुकसान झाले. संसद समिती राजकीय असते. समितीला कायदेशीर कारवाईचा अधिकार आहे काय ? ही समिती 'हेडनबर्ग' या संस्थेच्या प्रमुखाला चौकशीला बोलवू शकते काय ? केवळ मोदींना चौकशी समितीसमोर बोलवून अपमानीत करण्याचा डाव आहे. आजपर्यंतचा संसदीय समिती इतिहास पहाता, समीतीच्याअहवालातून आरोप व प्रत्यारोप झाले! यात सरकारे गेली. पण निष्पन्न काहीही झाले नाही. विरोधी पक्ष तोच राजकीय डाव खेळत आहे. यात काँग्रेस पक्षाचे गांधी घराण्यावर असलेल्या भक्तीचे प्रदर्शन देशाने पाहिले आहे. या पक्षाचे तीन मुख्यमंत्री व पक्षाचे नेते सुरतला गेले होते. खर तर! गांधी हे खासदार, पक्षाचे पदाधिकारी नाहीत, मग हे नेते सुरत का गेले ? ते न्यायालयावर दबाब आणण्यासाठी गेले होते का ?गांधी यांनी मानहानी प्रकरणात जामीन घेतला. वास्तविक, ते खरे गांधी असते तर जेलमध्ये जाणे पसंत केले असते. या नकली गांधीची स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या नखाची बरोबरी येत नाही. सावरकर हे ११ वर्षे काळ्या कोठडीत होते तर पंडित नेहरूंनी माफी मागून तेरा दिवसात जेलमधून आले! तरी हे नकली गांधी म्हणतात, 'मी माफी मागणार नाही', पण त्यांनी राफेल प्रकरणात माफी मागितली आहे.ते माफीवीर गांधी आहेत! या गांधी परिवाराला भ्रष्टाचार संपवयाचा नाही, त्यासाठी संरक्षण हवे आहे! त्यामुळे मोदी सारखा नेता नको आहे. मुख्यमंत्री केजरीवाल यांचे पक्षाची राष्ट्रीय पक्षाकडे वाटचाल करत आहे. केजरीवाल यांनी 'मोदी हटाव, देश बचाव' चे पोस्टरबाजी केली. मोदींच्या पदवीबाबत शंका उपस्थित करत आहेत! खर तर! नेहरू गांधी परिवारापेक्षा डॉ. आबंडेकर व स्वातंत्र्यवीर सावकरकर अधिक शिकलेले आहेत. नेहरू व गांधी परिवार कॅंब्रीज विद्यापीठाचे पदवी फेल झालेले नेते आहेत, असा माजी खासदार स्वामी यांचा दावा आहे. तर श्रीमती सोनिया गांधी तर कब्रीज विद्यापीठात कधीच गेल्या नाहीत. त्यांनी लोकसभेला खोटी माहिती दिली.केजरीवाल हे मोदीचा व्देष भावनेने विरोध करत आहेत. राजकारणात शिक्षणापेक्षा अनुभवी नेता लागतो. आम आदमी मुख्यमंत्री केजरीवाल उच्चशिक्षित नेते आहेत, मग त्यांनी दिल्ली, पंजाबमध्ये काय दिवे लावले ? वास्तविक असुशिक्षित व्यक्तीपेक्षा उच्च सुशिक्षित व्यक्तीच मोठ्या प्रमाणत भ्रष्टाचार करत असतो.त्यासाठी दिल्ली भ्रष्टाचाराचे उदाहरण देता येईल! आम आदमीचे नेते भ्रष्टाचारावरुन जेलमध्ये गेले आहेत. शिक्षणमंत्री मनीष सिसेदिया मद्य घोटाळ्यात तर आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन जेलमध्ये मसाज करून स्वतः आरोग्याची काळजी घेत आहेत. हे यांचे भ्रष्टाचाराचे आदर्श मॉडेल ! पंजाबमध्ये तर खलिस्तान चळवळीला प्रोत्साहन दिल्याने आज राष्ट्राला धोका निर्माण झाला आहे. आम आदमी पक्ष हा कट्टर इमानदार असल्याने त्यांचे नेत्यावर भ्रष्टाचार कारवाई होऊ नये, असे वाटते! यात केजरीवाल यांचा अहंकार लपून राहिलेला नाही.त्यांची पंतप्रधान होण्याची सूप्त इच्छा आहे. तेंव्हा मोदी सत्तेतून गेले तर संधी मिळेल, ते 'मुंगरेलालचे स्वप्न' पहात आहेत.

> **आधुनिक केसरी**
>
> **देशातील सी.बी.आय. आणि ईडी या सर्वोच्च तपास यंत्रणा आहेत. या यंत्रेणाचा मोदी सरकारकडून गैरवापर होत असल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून सतत केला जात होता. याबाबत १४ विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. त्यांनी राजकीय नेत्यांना अटक, जमानत यात विशेष सूट व स्वतंत्र नियमावली तयार करण्याची मागणी केली.पण न्यायालयाने देशातील कायदा सर्वांसाठी समान आहे. तेंव्हा राजकीय नेत्यांना विशेषाधिकार देता येणार नाहीत, अशा शब्दात फटकारले. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे विरोधी पक्ष तोंडावर आपटला असून भ्रष्ट नेत्यांचे हस्से झाले आहे !**



भारत राष्ट्र समितीचे के. चंद्रशेखर राव यांची मुलगी के. कविताची दिल्लीच्या मद्य भ्रष्टाचारात चौकशी चालू आहे. तेलंगणात भाजपाचे वर्चस्व वाढत आहे. तेंव्हा भाजपाचा यश रोखण्यासाठी ते महाराष्ट्रात पाय रोवू पहात आहे. मार्च महिन्यात नांदेड जिल्ह्यात लोहा येथे आले होते. त्यांनी कोट्यवधी रूपये खर्चून सभा घेतली.ते महाराष्ट्राचे नव्हे, देशाचे स्वप्न पहात आहेत! 'अबकी बार किसान की सरकार, असे म्हणत असले पक्षाला तेलंगणात धोका आहे. आंध्रप्रदेशच्या चंद्राबाबू नायडू यांचे २०१९ मध्ये काय झाले ? नांदेड जिल्ह्यातील आडगळीत पडलेल्या काही नेत्यांना भारत राष्ट्र समितीत प्रवेश दिला. भारत राष्ट्र समितीचा महाराष्ट्र काय ? नांदेड जिल्ह्यात यश मिळणे कठीण! यात के. चंद्रशेखर राव व केजरीवाल हे दोघे भ्रष्टाचारात मैत्री! त्यामुळे यांनाही मोदी नेतृत्व पसंत नाही. बिहारचे चारा घोटाळ्यातील लालू प्रसाद यांचे पूत्र तेजस्वी यादव आर जेडी पक्ष नोकरीच्या बदल्यात जमीन घेतलेल्यात चौकशी चालू आहे, मोदी सरकार जुने भ्रष्टाचाराचे मुडदे उकरून काढत आहे.हा राग आहे. नीतशकुमार जर, तर पंतप्रधान झाले तर त्यांची मुख्यमंत्र्याची गादी आपणाला मिळेल, याची आशा आहे. नितीशकुमार जिकडे जातील, तिकडे ते जातील काय ? त्यामुळे दोघांना मोदी पंतप्रधान नको आहेत! पण नितीशकुमार "पलटूराम' ची पदवी यादव यांनी दिली होती. मग त्यांचे स्वप्न साकार होणार आहे काय ? महाराष्ट्रात छ. संभाजीनगर येथे तीन पक्षाची वज्रमूठ सभा झाली. यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते छगन भुजबळ, अनिल देशमुख, नबाब मलिक हे नेते भ्रष्टाचारावरून जेलमध्ये गेले. राज्य बँक, साखर कारखान्याचे लिलाव यात राष्ट्रवादी नेते गुतंलेले पवार परिवाराची चौकशी होऊ शकते. तेंव्हा मोदी हे तूर्त थाबविण्यास तयार असतील, पवार मोदी नेतृत्वाला पाठिबा देतील, यात आश्चर्य नाही. नुकतेच शरद पवार व गडकरी यांची नागपूर येथे भेट झाली. मोदी मार्ग काढताय काय ? याची प्रतीक्षा करत आहेत. मोदी सरकार जर आमच्या बेनामी संपत्ती भ्रष्टाचाराची चौकशी करत असतील तर मोदी राष्ट्रवादीला व महाराष्ट्राला परवडणारे नाहीत. शिवसेनेचे संजय राऊत यांनी सामान्य माणसाचे घरांचे पैसे हडप्प केल्याचे प्रकरण, अनिल परब यांचे बेनामी संपत्तीची चौकशी चालू आहे. त्यात शिंदे गटाला हाताशी धरून भाजपाने ठाकरे यांना जमीनीवर आणले. पूर्वी भाजपा नेते मातोश्रीवर भेटावयला जात असत, पण आता 'मातोश्री'चे नेते सिल्व्हर ओक व १० जनपथच्या उंबरवठ्यावर नाक रगडत आहेत.त्यात सत्ता पक्ष, चिन्ह गवलेल्याचा राग ठाकरे यांना आहे. शरद पवारांना ७५ वर्षात महाराष्ट्रात एकहाती सत्ता आणता आली नाही. ठाकरे शिवसेनेची राष्ट्रीय पातळीवर ताकद तरी काय ? पण निघाले सूर्याला गिळायला! यात "मविआ'तील तिघांचा वाटा आहे! त्यातून तीन बोक्यात भांडणे होतील! ठाकरे अल्पभूधारक ठरविले जाईल, त्यांच्या वाट्याला कटोरा येणार आहे! राकाँ व काँग्रेस निवडणूक पुरतेच ठाकरे गटाचा भाजपाचा विरोधात वापर करून घेतील आणि नंतर फारकत देतील. तेंव्हा ठाकरे सभेत म्हणाले, 'देश अध्यक्षीय हुकुमशाही जात आहे, ? भारतीय घटने संसदीय पध्दतीचा स्विकार केला आहे. ते घटनेचा अनादर करत नाहीत काय ? देशात ५१ वर्षे काँग्रेस राजवट होती, तेंव्हा देशात अध्यक्षीय हुकुमशाही होती की नाही ? बाळासाहेब ठाकरे संसदेवर भगवा फडकवा म्हणत होते, तर त्यांचे पूत्र उध्दजींनी सत्तेसाठी संसदेवर काँग्रेसचा झेंडा फडकविण्यासाठी विचारांचे सिम्मोलंघन केले आहे. आता सर्व भ्रष्ट परिवारवादी पक्षाचे नेते वज्रमूठ बांधत आहेत. वज्रमूठ सत्याची असते.पण त्यांची असत्यासाठी आहे. ती भ्रष्टाचार विरोधी नसून भ्रष्टाचार बचावासाठी आहे.त्यामुळे ती फार काळ टिकणार नाही. महाराष्ट्रातील मविआ' सरकार तर घरी बसून चालत होते.त्या सरकारात बोके, खंडणी, लुटणारे नेते होते. कोरोना काळातही भ्रष्टाचार झाला! शिंदे फडणवीस सरकारच्या निर्णयावर टीका करणाऱ्या चव्हाणांनी 'मविआ' कारभार तपासून पहावा! उगाच यमक जुळवू नयेत! विरोधी पक्षाचा २०१९ मध्ये मोदी विरोधात एकजूटीचा प्रयोग केलाच होता, तो काही नवीन नाही. तो पूर्णपणे फसला. त्यावेळेस ज्यांनी मोदी विरोधात मोट बांधली.त्या नेत्यांना मतदारांनी घरी बसविले. यात काँग्रेसचे नेते मल्लीकार्जून खरगे यांनाही मतदारांनी घरी बसविले होते. पण ते गांधी घराण्याशी वफादार असल्याने त्यांचे पुनर्वसन गेले. राजकारणातील पुनर्वसन नेते खरगे हे आता मोदींना आव्हान देत आहेत. त्यात २०२३ च्या राज्याच्या विधानसभा निवडणुकीनंतर ही वज्रमूठ कमजोर होत जाईल. कारण पंतप्रधान मोदी यांनी सी.बी.आय.च्या हिरक महोत्सवात 'देशात भ्रष्टाचार राजकीय नेत्याविरोधात कारवाई चालू राहणार आहे, ती थांबणार नाही, असा स्पष्ट इशारा दिला आहे. तेंव्हा २०२४ येण्यापूर्वीच देशातील भ्रष्ट परिवारवादी पक्षातील नेत्यांची पळताभूई होणार आहे.

# कल्याणकारी राज्याची नवी योजना




प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**धार्मिक, अध्यात्मिक क्षेत्रात लोक स्वार्थ ठेऊन वागत असतील किंवा जीवनाच्या इतर ठिकाणी स्वार्थोवृत्तीबद्दल कोणी काही बोलणार नसेल तर राजकारणात वाढत चाललेल्या या वृत्तीबद्दलही लोकांनी का बोलावे? हा खरेच विचार करण्याजोगा प्रश्न आहे. पण लोक बोलतात आणि बोलले पाहिजेत. कारण संसदीय लोकशाहीमध्ये काही बदल होवो अथवा न होवो पण लोकांमुळे दर पाच वर्षाला सरकार बदलू शकते, हे मात्र नक्की. हे बदललेले सरकार पूर्वीच्या सरकारपेक्षा कोणत्या बाबतीत वेगळे आहे, हे सांगता येत नसले तरी बदलाची सुखात्म भावना मात्र मतदारांना हुरळून टाकण्यास पुरेशी असते.**

बहुजन हिताय - बहुजन सुखाय हे शासकीय योजना, उपक्रमांचे ब्रीद असते, नसेल तर ते तसे असावे ही सामान्यांची अपेक्षा. मोसम बदलला की फळं बदलतात, काळ बदलला की धारणा बदलतात. पण राजकारणात मात्र व्यवस्था तीच ठेवून धोरणं बदलता येतात हे मात्र नवउदारमतवादाने जगाला दाखवून दिले, ही फार मोठी गोष्ट आहे. कारण अमेरिका, युरोपीय देश, भारत किंवा चीन आणि व्हिएतनाम कोणतेही राष्ट्र आज उदारमतवादी धोरणापासून अलिप्त नाही. मजेची गोष्ट ही की, यात डावे, उजवे, काठावरचे किंवा केंद्रकावरचे असा किंवा विकसित अथवा विकसनशील असा कोणताच भेदभाव हे धोरण करत नाही, ही विलक्षण गोष्ट म्हणावी लागेल. नवउदारमतवाद ही अत्यंत अमूर्त पण जागतिक भांडवलदारांचे हित रक्षण करणारी मजबूत प्रणाली आहे. नव्वदीच्या दशकपर्यंत म्हणजे जागतिकीकरण आपण स्वीकारण्यापर्यंत ग्राहकोपयोगी वस्तूंच्या उत्पादनातून वित्त भांडवलाची गंगाजळी एवढी वाढली की जमा झालेले अतिरिक्त भांडवल कोठे तरी गुंतवणे गरजेचे होते. अतिरिक्त भांडवलाचे वैशिष्ट्य असे की, ते पुन्हा गुंतवले नाही तर आधीच्या गुंतवणुकीचा नफा कमी करते, हा अर्थशास्त्राचा नियम आहे. ग्राहकांसाठी किती आणि काय काय बनवणार. त्यामुळे या जागतिक भांडवलाने कोणत्याही देशातील शासनव्यवस्था जे काम करते, त्यात रुची घेण्यास सुरुवात केली. त्यात दोन फायदे होते. एकतर हे क्षेत्र प्रचंड मोठे आणि दुसरे म्हणजे वर्षानुवर्षे कितीही काम करा, संपणार नाही. यात पायाभूत सुविधा, नागरी सुविधा आणि सामाजिक सेवा क्षेत्र या तीन घटकांकडे नवउदारमतवादाने आपला मोर्चा वळवला. वीज, रस्ते, विमानतळ, बंदरे, पिण्याचे पाणी, सांडपाण्याची व्यवस्था, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक, शिक्षण आरोग्य आणि शासन पूर्वी जनकल्याणार्थ ज्या काही योजना राबवत होते, त्या सर्व योजना खाजगी भांडवलाने यथावकाश आपल्या हाती घेतल्या. त्यामुळे शहाण्या माणसाने हे किंवा ते सरकार चांगले अथवा वाईट ठरविण्याच्या भानगडीत पडूच नये. सरकार कोणतेही आले तरी या गोष्टी होणार म्हणजे होणारच. देशांतर्गत जातीय किंवा धार्मिक बाबींवर बोलण्याशिवाय खाजगी क्षेत्राने आपल्या हाती दुसरे ठेवले तरी काय? इथून पुढे कायमस्वरूपी सरकारी नोकरी हा गेला बाजार असेल. मग या बेरोजगारांच्या रोषास कमी करण्यासाठी जागतिक पातळीवर एक योजना तयार आहे. आज ना उद्या ती आपल्याकडे लागू होणार. कारण मोर्चा, आंदोलनाची डोकेदुखी सरकार किती दिवस सहन करणार. या सर्वांवर रामबाण उपाय म्हणजे युबीआय (युनिव्हर्सल बेसिक इनकम) ही योजना. जग अगतिकी करण भाग दोन या संजीव चांदोरकर यांच्या पुस्तकात ही संकल्पना विस्ताराने मांडली आहे. जिज्ञासूंनी ते आवर्जून वाचावे. मुळात अठराव्या शतकात थॉमस पेन यांनी मानवतावादी दृष्टिकोनातून ही संकल्पना मांडली. पण भांडवलदारांना दोन महायुद्धामुळे तिकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही. अलीकडे अर्थतज्ज्ञ फिलिप व्हॅन पॅरिस यांनी ही संकल्पना नव्याने मांडली. शासन आपल्या सर्व लोककल्याणाच्या योजना पूर्ववत चालू ठेवून देशातील नागरिकांप्रति जबाबदारी म्हणून विशिष्ट रक्कम त्यांच्या खात्यात जमा करेल, अशी ही योजना होती. २०१६-१७ मध्ये भारत सरकारच्या मुख्य आर्थिक सल्लागारानी औपचारिकपणे सरकारच्या कानावर ही योजना घातली. सार्वजनिक कल्याणकारी योजनेत त्रुटी असतील तर त्या दूरही करता येऊ शकतात. त्या ऐवजी योजनाच बंद करणे देशहिताचे ठरणार नाही. नवउदारमतवादाचा रेटा एवढा तीव्र आहे की या योजनांचा पुनर्विचार करावा म्हणजे हळूहळू त्या बंद कराव्यात इथपर्यंत मजल गेली आहे. कारण फिनलंड, इटली,



## क्षितिजापल्याड

नेदरलँड या देशात ही योजना प्रायोगिक तत्त्वावर चालू आहे. तेथील यशापयशावर कदाचित भविष्यात जगाची दिशा निश्चित होईल. युबीआय अंतर्गत सीबीटी (कॅश बेनिफिट ट्रान्सफर) प्रणालीमध्ये शासन थेट नागरिकांच्या खात्यात पैसे जमा करणार. कदाचित आपल्याकडे जनधन योजना त्यासाठीच राबविली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. कोणत्याही सामान्य नागरिकास ही योजना अत्यंत चांगली वाटण्याचा संभव आहे. डावी विचारधारा देखील यास विरोध करू शकणार नाहीत. कारण विरोध करावा तर आपण प्रत्यक्ष जनतेच्या हिताच्या विरोधात उभे आहोत असे चित्र निर्माण होऊ शकते. प्रगल्भ भांडवलशाही ही नेहमी जाळे फेकते, त्यास विरोध करण्याचा किंवा धिक्कारण्याचा सुतभरदेखील अवकाश मिळू देत नाही. खरेतर भांडवलशाही चांगलीच असते. आपल्या धारणा आणि नीती बाजूला सारल्या तर ती कोणातही अजिबात भेदभाव करत नाही. सब घोडे बारा टक्के. असो. पण या सीबीटीचे सामाजिक आणि आर्थिक दोन्ही अंगाने नुकसान आहे. रक्कम कमी असली तरी नियमितपणे मिळतेय म्हणून समाज आळशी बनेल आणि पैशापेक्षाही तुम्ही जर काहीच करणार नसाल तर काहीच बनणार नाहीत. कारण मार्क्स म्हणतात त्याप्रमाणे माणूस वस्तूंची निर्मिती करतो हे खरे आहे, पण ही निर्मिती प्रक्रियाच माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची निर्मिती करत असते. रिकामटेकडी व्यक्तिमत्त्वशून्य माणसे असली काय किंवा नसली काय नीती बाजूला ठेवल्यास देशाला त्यांची काहीच गरज नसते. नवउदारमतवादी धोरण तुम्हाला प्रलोभन दाखवून व्यक्तिमत्त्व हिरावून घेते. शासन सेवा देणार नाही, त्याबदल्यात आम्ही रोख रक्कम देऊ असे म्हणत असेल तर देशातील सर्व शाळा, दवाखाने आणि थोडीफार शिल्लक असलेली सरकारी सेवा क्षेत्रे एका फटक्यात बंद होतील. प्रत्येक क्षेत्राचे खाजगीकरण होईल. मग खाजगी क्षेत्रात आरक्षण असावे की नसावे याबद्दल आपले काथ्याकूट सुरू होईल. यावर उपाय काय? काहींच्या मते जागतिक भांडवलास राष्ट्रवादाचे उत्तर असेही असू शकते किंवा आपुले आपण करावे जतन याही पद्धतीचे असू शकते, किंवा पारंपरिकदृष्ट्या भांडवलशाही आणि साम्यवाद असाही काही डावी मंडळी संघर्ष पाहत असतील. सर्वमान्य होईल आणि आपले स्वत्व जाणार नाही असा काही उपाय असू शकतो का? हे आपण पुढच्या लेखात विचार करू या.

# समाजाने कलाकार नाही कार्यकर्ता जगवला पाहिजे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**समाजाचे हित सच्चा व प्रामाणिक कार्यकर्त्यांवरती अवलंबून असते. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी त्या विचारांची पेरणी येथे केली आहे. त्यामुळे आंबेडकरवाद, आंबेडकरवादी चळवळ याला खूप महत्त्व प्राप्त झालेले आहे. आंबेडकरवादी चळवळी समता, बंधुता, न्याय व स्वातंत्र्यावर आधारित असते. विषमतेने बरटलेल्या समाज व्यवस्थेमध्ये समता प्रस्थापित करून सामाजिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न चळवळ करत असते. परंतु बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर अनेक नेते अनेक चळवळी या ठिकाणी निर्माण झालेल्या आहेत. पण एकही चळवळ किंवा एकही कार्यकर्ता हा राज्य पातळी किंवा राष्ट्रीय पातळीवरती काम करताना दिसत नाही.**

याचे कारण त्याला काम करताना येणाऱ्या वेगवेगळ्या अडचणी जसे काम करताना कार्यक्रमाचे नियोजन कसे करायचे, कुठे करायचे, आणि एका राज्यात एका राष्ट्रात फिरताना त्याच्या कुटुंबाची जबाबदारी त्याला फिरण्यासाठी लागणारा खर्च, या गोष्टी प्रामुख्याने समोर येतात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आपण जर विचार केला तर करोडो रुपयांची उलाढाल होत असते. या उलाढालीमध्ये अनेक गायक अनेक वक्ते कार्यक्रमासाठी बोलवले जातात. कधी कधी एखाद्या व्यक्तीची एका वर्षाची कमाई तेवढी नसते जेवढा पैसा एखाद्या वक्त्याला व गायकाला दिला जातो. वक्ता आणि गायक बोलून समाजाचे मनोरंजन होते थोड्याफार प्रमाणात प्रबोधनही होते परंतु चळवळ जिवंत राहत नाही व सामाजिक न्यायाची अपेक्षा कमी होत जाते. कारण कलाकार आणि कार्यकर्ता याच्यामध्ये फरक आहे कलाकार आपल्या कलेच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयावरती चांगल्या पद्धतीतून बोलू शकतो, लिहू शकतो, आणि गाऊ शकतो, कलाकारांना आपली कला दाखवण्यासाठी कोणतेही विषयाचे, कोणत्याही क्षेत्राचे, बंधन नसते परंतु कार्यकर्त्यांना अनेक बंधने अनेक समस्या असतात. व कार्यकर्ता निस्वार्थ भूमिकेतून समाजासाठी लढण्याचा प्रयत्न करत असतो. कलाकारांना वाव देऊ नये किंवा कलाकारांना दुय्यम समजावे हा हेतूमुळीच नाही. परंतु कलाकारांचा संबंध चळवळीशी आंबेडकरवादी विचाराशी जोडून त्यांच्यावर समाजाचा खर्च करणे हे योग्य नाही. कारण कलाकाराला वेगवेगळ्या माध्यमातून पैसा, मानसन्मान मिळू शकतो. परंतु कार्यकर्त्याला माना सन्मानाची अपेक्षा नसतेच फक्त त्याला थोडेफार सहकार्याची आवश्यकता असते. या माध्यमातून तो स्वतःचे कुटुंब सांभाळून बाबासाहेबांचे विचार समाजामध्ये रुजवून सामाजिक न्याय व सामाजिक समतेवर आधारित समाज व्यवस्था निर्माण करण्याचा त्याचा प्रयत्न असतो. आज आपण अनेक गायक वक्ते बघतोय ते गायक होते बाबासाहेबांच्या गाण्याच्या कार्यक्रम दिल्यानंतर ते बाबासाहेबांच्या जिवनावर गाणे म्हणतात. आणि दुसरीकडे त्यांना पैसा मिळाल्याच्या नंतर ते बाबासाहेबांच्या विचाराच्या विरोधात सुद्धा गाणे म्हणतात. ज्यावेळेस त्यांना प्रश्न केला जातो तर त्यावेळेस ती ही आमची कला आहे आणि कला सादर करणे आमचा धर्म आहे. असे बोलून टाळाटाळ करतात. आणि त्यांचे बरोबरही आहे कारण कोणत्याही कलाकाराला चळवळीशी जोडणे हे चुकीचेच आहे. कलाकारांमध्ये कला असल्यामुळे तो वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये जाऊन त्याची कला सादर करू शकत असतो.



जसे अनेक लोक बाबासाहेबांचे विचार, पैसे घेऊन बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त किंवा बाबासाहेब आंबेडकरांच्या वेगवेगळ्या कार्यक्रमानिमित्त चांगल्या पद्धतीने भाषणे देतात. आणि दुसरीकडे लोकशाही संविधान न मानणाऱ्या लोकांच्या सोबत सुद्धा ते असतात. याचाच अर्थ त्यांची ती कला आहे ते चळवळीचे कार्यकर्ते नाहीत. म्हणून समाजाने चळवळीचा कार्यकर्ता ओळखून समाजातील चळवळीचा कार्यकर्ता जर जगवला तर बाबासाहेबांचे विचार समाजामध्ये पेरले जातील. सामाजिक न्याय, सामाजिक समता, प्रस्थापित होण्यासाठी खूप मोठी मदत होईल. आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित चळवळीला वेग येईल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची चळवळ जिवंत राहून त्या चळवळीचा प्रभाव प्रतिगामी लोकांवर, प्रतिगामी व्यवस्थेवर नक्की होईल. म्हणून सर्वात अगोदर जयंती कार्यक्रमाला कोणाला बोलवावे तर अगोदर तो चळवळीचा आहे की कलाकार आहे हे ओळखणे गरजेचे आहे. आजपर्यंत अनेक लोकांना आंबेडकरवादी समाजाने भीम जयंतीच्या कार्यक्रमाला बोलवून लाखो रुपये लोकांना दिलेत नाव दिले प्रसिद्ध दिली पैसाही दिला आणि ह्या सगळ्या गोष्टी दिल्यानंतर त्या व्यक्तीने आंबेडकरवारी समाजाकडे पाठ फिरवून राजकारण्यांची लाचारी स्विकारुन बाबासाहेबांच्या विचाराशी, चळवळीशी गद्दारी केली. तो सुरुवातीलाही बाबासाहेबांचे नाव फक्त पोट भरण्यासाठी घ्यायचा. आणि आजही वेगवेगळ्या राजकीय पक्षांची गुलामी करून लाचारी स्वीकारून आजही ते पोट भरण्यासाठीच मान झुकवताना दिसत आहेत. ही बाब आपल्याला लक्षात घेणे गरजेचे आहे. चळवळीचा स्वच्छ कार्यकर्ता कोणत्याही स्टेज वरती कोणत्याही चुकीच्या पद्धतीने आपले विचार किंवा बुद्धी खर्च करत नाही. तो आपला वेळ खर्च करत चांगल्या कामासाठी असतो म्हणून आपण लाखो करोडो रुपये जो खर्च होतो त्यातून काही भाग हा कलाकारांना न देता कार्यकर्त्यांना दिला तर कार्यकर्ता चळवळ व समाज यांच्यासोबत इमानदार राहतो. व समाजाचेच आणि चळवळीचे काम करतो परंतु कलाकार कधी कोणते काम करेल कधी कोणती सुपारी घेईल आणि कधी कोणाच्या सोबत कधी जाईल हे सांगता येत नाही. कारण त्याची कला असते आणि तो कला सादर करण्याचा त्याचा सर्वस्वी अधिकार असते. कलाक्षेत्र आणि चळवळ क्षेत्र या दोन्ही गोष्टी विरोधी आहेत. स्वच्छ कार्यकर्ता हा कलाकार असू शकतो परंतु कलाकार हे कार्यकर्त्यां असतीलच असे नाही. आणि जे कलाकार कार्यकर्ते आहेत ते स्वतःला कधीच कलाकार समजून आपल्या सोयीनुसार पैसा व प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न न करता निरंतर फक्त चळवळीसाठीच काम करण्याचा प्रयत्न करत असतात आणि म्हणूनच त्याला कार्यकर्ता समजला जाते म्हणून भीम जयंती कार्यक्रमानिमित्त ज्या ज्या वेळी आपल्याला वक्त्यांची गायकांची आवश्यकता असते, अशा वेळेस पोट भरू लोकांपेक्षा समाजामध्ये वैचारिक पेरणी करून सरकारच्या वेगवेगळ्या ध्येय धोरणांवरती वर्षभर आवाज उठवून, सत्य व असत्या मधला फरक समाजासमोर वारंवार ठेवणाऱ्या लोकांना जर आपण कार्यक्रमानिमित्त बोलून त्यांना प्रोत्साहन दिले, त्यांचे मनोबल वाढवले, त्यांना मानसन्मान दिला तर चळवळीच्या कार्याला नक्कीच वेग येईल. चळवळीचे काम होईल, तसेच समाजामध्ये परिवर्तन होण्यासाठी सुरुवात होईल. अनेक वर्षापासून आपण जयंती साजरी करतो परंतु जयंतीच्या माध्यमातून पाहिजे तसा बदल झाला नाही. आणि होणारही नाही. कारण जयंती फक्त एका दिवसाची असते हजारो वर्षापासून म्हणजेच तथागत बुद्धांपासून परिवर्तनाला सुरुवात झालेली आहे निरंतर परिवर्तनासाठी प्रबोधनाची परंपरा सुरू आहे. तरीसुद्धा अजून शंभर टक्के परिवर्तन झाले नाही आणि म्हणून एका दिवस जयंती कार्यक्रमातून परिवर्तन होणे ही शक्य नसले तरी, तो आनंदाचा दिवस म्हणून आपण साजरा करू शकतो परंतु हा आनंद, हा उत्साह आयुष्यभर टिकवायचा असेल तर त्यासाठी आपल्याला समाजामध्ये कार्यकर्ते निर्माण करणे आवश्यक आहे. विरोधी शक्ती ह्या वेगवेगळ्या माध्यमांतून लाखो करोड रुपये खर्च करून त्यांचे विचार लोकांच्या मस्तकामध्ये कशा पद्धतीने बंदिस्त होतील यावरती काम करत आहेत आणि आम्ही मात्र फक्त एकच दिवस बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त मनोरंजन करून नाचून पैसा खर्च करतो. परंतु बाबासाहेबांचे विचार घराघरात पोहोचण्यासाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे. दररोज टीव्ही सुरू केली सोशल मीडियावरती गेलो तर अंधश्रद्धा, पाखंड, विषमतेवर आधारित अनेक कार्यक्रम दिसतात. त्या कार्यक्रमाला बळकटी देण्यासाठी अनेक स्पॉन्सर सुद्धा असतात. परंतु समतेवर आधारित, शिक्षणावर आधारित, महिला सन्मानावर आधारित, भारतीय संविधानावर आधारित, आधारित भारतीय महापुरुषांवर आधारित, एकही कार्यक्रम आपल्याला दिसत नाही. व जो कोणी असा प्रयत्न करतो त्याला समाजाकडून बळकटी व सहकार्य मिळत नाही. म्हणून अनेक कार्यकर्ते खचून त्यांचे कार्य त्यांनी मर्यादित केले आणि कार्यकर्ते जर खचलेत आणि कार्य मर्यादित झाले तर चळवळीची दुर्दशा होईल. म्हणून बांधवांनो भीम जयंती साजरी करताना आनंद उत्साह नक्की साजरा करा परंतु हाच आनंद हाच उत्साह येणाऱ्या पिढीला मिळावा, त्यांना त्याचा उपभोग घेता यावा, त्यासाठी चळवळ जगवणे व कार्यकर्ते जगवणे अपेक्षित आहे आणि म्हणून जर कार्यकर्ता जगवायचा असेल तर सच्चा कार्यकर्त्याला साथ समर्थन बळकटी देऊन आर्थिक सहकार्य करणे गरजेचे आहे. भीमजयंती कार्यक्रमानिमित्त एका गावाने एकच कार्यकर्ता जगवला तर हजारो कार्यकर्ते महाराष्ट्रात, देशात निर्माण होतील. आणि हजारो कार्यकर्ते निर्माण झाले तर समाजातील अनेक समस्या दूर होतील. एक गोष्ट अजून लक्षात घ्या आपल्याला कार्यकर्ते आणि तीही विचाराचे कार्यकर्ते निर्माण करायचे आहेत. नेते निर्माण करायचे नाहीयेत. फक्त कार्यकर्तेच निर्माण झाले तर समाजाला न्याय अधिकार नक्की मिळतील. आणि जर नेते निर्माण झाले तर नेत्यांनी समाजाचे काय करून ठेवले हे नव्याने सांगण्याची गरज नाही. परंतु जयंतीदिनानिमित्त आपण वैचारिक बाबासाहेबांची पेरणी करूया आणि कार्यकर्ता जगवण्यासाठी सर्वांनी समोर येऊ या एवढे जरी केले तरी आपण बाबासाहेबांच्या विचारातील, बाबासाहेबांना अपेक्षित ,असे काम करतोय, याचे सार्थक होईल व देशांमधील चळवळीला हातभार लावतोय याचे स्वतःला समाधान सुद्धा मिळेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ग्रंथप्रेमी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर



प्रा. डॉ. भास्कर पाटील
संपर्क क्र. ९७८७५२८४५८

आधुनिक केसरी

**ग्रंथांवर प्रेम करणारेच नव्हे; तर त्याला आपला 'जीव की प्राण' मानणारे भारत भूमीतील महनीय व्यक्तिमत्त्व आहेत विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. आपल्या ज्ञानवैभवाच्या बळावर जीवनस्पर्शी अशा सर्वच स्थळांवर आपली ठसीव नाममुद्रा उमटविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ज्ञानसाधना हा नेहमीच सर्वसामान्य जनतेचाच नव्हे; तर विश्वात पांडित्य मिरविणाऱ्यांसाठीही औत्सुक्याचा विषय राहिला आहे. बाबासाहेबांच्या या सगळ्या प्रवासाचे खरे सोबती आहेत ते ग्रंथ. म्हणून विविध पैलू असणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा महत्वाचा पैलू आहे; त्यांचे ग्रंथांवर असलेले प्रेम व ग्रंथ वाचनाची त्यांची अनंत असणारी भूक. त्यामुळेच त्यांची एक नवी ओळख जगाला झाली, ती म्हणजे ग्रंथप्रेमी, ग्रंथवेडे, वाचनवेडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बालपणापासूनच एका सर्वसामान्य पण संस्कारी कुटुंबाचा, भक्ती अध्यात्माचा वारसा वाचनाने माणूस समृद्ध बनतो; निव्वळ समृद्धच होत नाही तर, गोडी निर्माण झाल्यास इतरत्र गोष्टीपासून अलिप्त राहत; निव्वळ पुस्तकात रममाण होतो असे त्यांना लहानपणीच जाणवले. पर्यायाने शाळेच्या पायऱ्या चढल्यानंतर त्यांची ही ग्रंथ वाचनाची आवड अधिकच वृध्दिंगत झाली. ती इतकी की, ग्रंथ मिळविण्यासाठी, एखादे आवडीचे पुस्तक मिळविण्यासाठी वडिलांसमोर ते हट्ट करीत असत. बाबासाहेबांच्या जीवनातील बहुतांश वेळ हा सामाजिक व राष्ट्रीय चळवळीत आणि उर्वरित वेळ ज्ञानसाधनेत गेला. हे काही कल्पचित्र नाही तर ती ऐतिहासिक वास्तवता आहे. ग्रंथांवर प्रेम करणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व कितीतरी उदाहरणांनी पुढे ठेवता येईल. कायदे, नियम याचे फार आकलन न होणाऱ्या वयात बाबासाहेब ग्रंथांसाठी कायदेभंग करण्यास किंवा पुढे आपल्या प्रिय ग्रंथांवर 'आच' आणू पाहणाऱ्या व्यक्तींचा 'सूड' घेण्यासही मागे पुढे पाहत नव्हते. तशी भाषा रोखठोकपणे त्यांनी वापरल्याची काही उदाहरणे दिसून येतात. पुढील आयुष्यात नियम, अधिकार आणि कर्तव्य यांची देण राष्ट्राला देणारे डॉ. आंबेडकर जे घडले; त्यामागे आहे त्यांचे असीम असे ग्रंथ प्रेम. स्वतःच्या वाचनासंबंधी एका मुलाखतीत त्यांनीच नमूद केले आहे की, 'लहान वयापासूनपासून मला वाचनाचा विलक्षण नाद लागला. तो इतका की अमूक पुस्तकात अमक्या ठिकाणी एखादी महत्त्वाची बाब आहे; ही गोष्ट कोठेही टाचण वगैरे लिहिली नसतानाही मी ताबडतोब आठवू शकतो. या माझ्या सवयीमुळे माझी स्मरणशक्ती अतिशय तल्लख झाली आहे'. यातून आपल्या लक्षात येते की; जीवनाच्या अंतिम श्वासापर्यंत आपली बुद्धी तल्लख ठेवण्यात ग्रंथांची भूमिका किती महत्वाची होती. भारतीय संत, महाराष्ट्रीय संत, यांचे वाङ्मय देखील अत्यंत सूक्ष्मता व चिकित्सकपणे त्यांनी वाचले होते. त्यावर वेळोवेळी निर्भीड विचारही नोंदविले आहेत. चौफेर वाचनामुळे त्यांना विविध ज्ञान शाखांचे ज्ञान संपादन करता आले. म्हणूनच जीवनातील विविध क्षेत्रात ते सर्वच स्थळांवर ठामपणे उभे राहू शकले. साध्या विद्यार्थ्यांपासून ते थेट संविधान निर्माणकर्त्या पर्यंतचा त्यांचा प्रवास; फक्त नि फक्त ज्ञान वैभवमुळेच शक्य झाला. यात महत्त्वाची भूमिका होती ती त्यांचे सोबती असणारे ग्रंथ. त्यांची अपार मेहनत व राष्ट्राप्रती, ध्येयाप्रती असणारी त्यांची प्रचंड तळमळ. बेभान होऊन वाचन-लेखन करणारे म्हणून अनेकदा कुटुंबातील सदस्यांना त्यांचा रागही येत होता. अमेरिकेत असतांना उच्च पदव्यांचे ८-८ वर्षांचे अभ्यासक्रम दोन ते अडीच वर्षात ते पूर्ण करू शकलेत. दीर्घ काळाचे अनेक अभ्यासक्रम अल्पकाळात तडीस नेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेवाद्वितीय असे उदाहरण आहे. यामध्ये त्यांच्या प्रचंड मेहनतीचा आणि चोवीस तासांपैकी अठरा - अठरा तास अभ्यास करण्याच्या सवयीचा फार मोठा वाटा आहे, हे दाहक सत्य कोण नाकारणार!

बाबासाहेबांना घडविण्यात ग्रंथांची भूमिका महत्त्वाची आहेच. त्यांनी केलेले प्रचंड लेखन व भाषणे, राष्ट्र उद्धाराचे कार्य त्यांच्या हातून घडणे शक्यच नव्हते. बाबासाहेबांनी वाचन केलेल्या समग्र ग्रंथांमधून स्वतःची तार्किक व चिंतनशील बुद्धी विकसित केली. लेखन आणि विचार हे क्रांती घडवीत असतात. 'लेखणीची धार ही अनेकांचे प्राण घेते आणि अनेकांना जीवदानही देते'. ज्ञान हे दुधारी अस्त्र आहे, असेही त्यांना वाटत होते. बाबासाहेबांनी ग्रंथांच्या माध्यमातून ग्रहण केलेले ज्ञान याची तर्काच्या कसोटीवर तपासणी करीत चिकित्सा केली आहे. म्हणूनच त्या आकलनातून चांगल्याचा स्वीकार, वैगुण्यावर प्रहार आणि अमानुषतेचा प्रतिकार त्यांनी केला. त्यांच्या प्रचंड ग्रंथ वाचनामुळे आणि विचार वैभवामुळे स्वतंत्र विचार तयार झाले. ज्या विचारांमुळे देशातील, राष्ट्रातील अन्यायी विचारांवर प्रहार करीत; त्यात सुधारणेच्या अपेक्षा त्यांनी बाळगल्या होत्या. विद्वत्तेचा शिखरावर पोहोचण्यासाठी त्यांच्यातील ग्रंथप्रेम आणि चिकित्सक दृष्टिकोन यांना महत्त्वाचे स्थान आहे.



**भीमजयंती विचारमाला**
**भाग : एक**

वाचनातून आकलन, आकलनातून चिंतन, चिंतनातून विचारमंथन व मंथनातून समृद्ध लेखन करणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी या साऱ्यांना एकसंघ करीत; राष्ट्र उन्नयन करण्याचे कार्य केले आहे. याच वाचन छंदामुळे त्यांच्यातील समृद्ध लेखक, वक्ता तयार झाल्याचे त्यांना वाटत होते. त्यांचे विचार हे तकलादू स्वरूपाचे नव्हते तर; ठोस आणि ठामपणे त्यांनी ते सातत्याने मांडले आहेत.

राष्ट्राला समता तत्त्वात गुंफणारी विचारधारा असो की, जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ म्हणून ब्रिटिश राजवटीत त्यांचे दोष दर्शविण्याचे काम असो, भारतीय लोकसंख्येचा प्रश्न असो की, कुटुंब नियोजनाचे भविष्यकालीन चिंतन असो, शेतकऱ्यांच्या अवनितिची कारणे असो की, स्त्री दास्य विमोचनाचा विचार असो, पाण्याचे प्रश्न, किंवा नदी जोड प्रकल्पा सारखा विचार, यासारखे असंख्य विचार त्यांनी समाज सुधारक, राष्ट्रभक्त, बॅरिस्टर व मंत्री म्हणून या देशाला बहाल केले आहेत. त्यांनी अनेक भाषांवर प्रभुत्व मिळविले होते. इंग्रजी ही तर त्यांची अत्यंत आवडीची भाषा होती. मराठीवर त्यांचे प्रचंड प्रभुत्व होते. यासह पर्शियन, संस्कृत, जर्मन या भाषा त्यांना अवगत होत्या. त्यातील ग्रंथांचे वाचन - आकलन करून आपले ज्ञान ते वाढवित असत. 'ज्ञानाला भाषेचे बंधन नसते', अशी त्यांची भूमिका होती. जॉन्सन, मेकॅले, चर्चिल, बुकर टी वॉशिंग्टन, टॉलस्टॉय, मार्क्स अशा कितीतरी तत्त्ववेत्त्यांसह भारतातील वेद, पुराणे, रामायण व महाभारत यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. म्हणूनच त्यावर ते परखडपणे आपली भूमिका मांडत होते. संत कबीर आणि तुकोबा हे तर त्यांच्या अत्यंत आवडीचे संत होते. पर्यायाने तुकोबांच्या कितीतरी अभंगांना आपल्या 'मुखपत्रांच्या' शीर्षस्थानी त्यांनी स्थान दिले . वयाच्या २५ व्या वर्षी अमेरिकेसारख्या देशात ९ मे १९१६ मध्ये एका तरुणाने 'भारतातील जातीसंस्था, यंत्रणा, उत्पत्ती व विकास' या शीर्षकाचा शोधनिबंध लिहून; जगाच्या पटलावर भारतीय जातीसंस्थेचे स्वरूप तरुण वयातच विशद केले. त्याला अनेक विद्वानांकडून प्रशंसा मिळाली. 'द प्रॉब्लेम ऑफ रुपी', 'थॉट्स ऑन पाकिस्तान', 'कास्ट इन इंडिया', 'भारतीय शेतीचा प्रश्न', 'बुद्ध आणि त्यांचा धम्म', 'रिडल्स इन हिंदुइझम', आणि भारतीय राज्यघटनेची निर्मिती, 'हिंदू कोड बिल' यासारखे कितीतरी लेखन ही त्यांच्यातील विद्वत्तेची साक्ष आहे. ग्रंथप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लक्षात घेताना; त्यांनी आपल्या वाचन - आकलनातून निर्माण केलेल्या तार्किक, चिकित्सक दृष्टीकोनाकडे आपणास लक्ष देणे गरजेचे आहे.

# जिंतूर बसस्थानकावर पाणपोई केंद्राचे उद्घाटन

## स्व. आयोध्यादेवी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज




**जिंतूर :** येथील बसस्थानकावर स्व. आयोध्यादेवी रामनारायणजी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शुक्रवार ता.७ रोजी नागरिकांना पिण्यासाठी पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्ष म्हणून आगार प्रमुख मनीष जवळेकर, उद्घाटक म्हणून पोलीस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे तर प्रमुख पाहुणे म्हणून संदीपभाईजी महाराज, वाहतूक निरीक्षक भगवान चिभडे, वाटुरे साहेब, वाहतूक नियंत्रण संदीप भांबळे, रमेशजी दगड उपस्थित होते. यावेळी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ब्रीजगोपालजी तोष्णीवाल यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी प्रास्ताविकात मागील तेरा वर्षांपासून तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने बस स्थानकावरील सर्वसामान्य प्रवाशांना थंड पाणी मिळावे यासाठी पाणपोईचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती देवून महामंडळाच्या वतीने दरवर्षी पाणपोई साठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी आभार मानले. तसेच दरवर्षीप्रमाणे तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिक व गोरगरीब लोकांना ता.१७ एप्रिल रोजी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची व ता.२९ एप्रिल रोजी दिव्यांग शल्य चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली. यावेळी संदीपभाईजी महाराज यांनी तोष्णीवाल परिवाराच्यावतीने करण्यात येत असलेल्या विविध सामाजिक उपक्रमातून समाजसेवा होत असल्याने कौतुक केले. यावेळी पोलीस निरीक्षक वाघमारे यांनी तोष्णीवाल परिवाराच्या वतीने आयोजित केल्या जात असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले. तसेच रमेश दगड यांनी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित केल्या जात असलेल्या उपक्रमासाठी सर्वांनी दररोज एक तास वेळ देऊन सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदवावा अशा आवाहन केले. तर सूत्रसंचालन विनोद पाचपीले यांनी केले. या कार्यक्रमावेळी शहरातील प्रतिष्ठित व्यापारी, पत्रकार, वकील व कर्मचारी उपस्थित होते.

# अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताहाची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तोरणाळा येथे श्रीमत भागवत कथा प्रारंभ दि. ३० मार्चपासून श्रीमद् भागवत प्रवक्ते ह.भ.प. श्री संदीप महाराज (सांगडे) आळंदीकर यांच्या अमृततुल्यवाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आले होते. सायकाळी श्री संत ज्ञानेश्वर महाराज हरिपाठ, रात्री ठीक ८:३० मि. श्रीहरी कीर्तन, सकाळी काकडा आरती असे रोज नित्यनेमाप्रमाणे कार्यक्रम होऊन कथेमध्ये श्रीकृष्ण जन्म, रुक्मिणी स्वयंवर, गोवर्धन पूजा असे वेगवेगळ्या कार्यक्रम गावकऱ्यांनी आयोजित केले होते. त्याचप्रमाणे आज शुक्रवार रोजी सप्ताहची सांगता होऊन यज्ञाचे सुद्धा आयोजन केले. दुपारी १ ते ४ वाजे पर्यंत महाप्रसादाचे आयोजन केले होते. संध्याकाळी गावातून दिंडी सोहळा नगरप्रदक्षिणा मध्ये गावातील तरुण मित्र मंडळाने पावल्याचा आनंद घेऊन प्रत्येक घराजवळ श्रीमद् भागवत ग्रंथाची पूजा करण्यात आली गावामध्ये कोणत्याही प्रकारचा राजकारणाचा हेतू न ठेवता राजकारण बाजूला ठेवून सर्व गावकऱ्यानी मिळून एका ठिकाणी येऊन या कार्यक्रमाचा आनंद लुटला गावातील सर्व भजनी मंडळी महिला मंडळ गावकरी मंडळी गायनाचार्य मृदंगाचार्य चोपदार भालदार विणेकरी मार्गदर्शक समस्त गावकरी मंडळी तोरणाळा नगर प्रदक्षिणा झाल्यानंतर रात्री ठीक ८:३० मी.ह.भ. प.श्री आचार्य महादेव महाराज (पोरज) यांचे काल्याचे किर्तन झाले. कार्यक्रमाप्रसंगी पंचकोशीतील सर्व भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

महाराष्ट्र Business Katta












# केंद्र सरकारचे स्वागतार्ह पाऊल



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**देशात सध्या मोबाइलवरुन सट्टेबाजी आणि जुगारांशी संबंधित ऑनलाईन गेम्सचे फॅड वाढले आहे. लहान मुलांसह मोठा वर्ग या गेम्सच्या आहारी गेला आहे. या गेम्सवर निर्बंध आणण्यासाठी केंद्र सरकारने अनेकदा आवाहन करुनही त्यांच्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर येत असतात. याची दखल घेत केंद्र सरकारने आता नवी नियमावली जाहीर केली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून सट्टेबाजी, ऑनलाईन गेमिंग आणि जुगाराच्या जाहिरातींविरुद्ध सूचना प्रसारित करण्यात आल्या असून ऑनलाईन गेमिंस संदर्भातील जाहिराती प्रसारित न करण्याचा सूचना सर्व प्रसार माध्यमांना देण्यात आल्या आहेत.**

आजच्या डिजिटल युगात बँकिंगपासून बिझनेसपर्यंत आणि शिक्षणापासून आरोग्यापर्यंत सगळ्याच क्षेत्रांमध्ये, सगळ्याच गोष्टींमध्ये तंत्रज्ञानाने आपले स्थान पक्के केले आहे. जुगारासारख्या व्यसनाचे क्षेत्रदेखील त्याला अपवाद नाही. काळाबरोबर जुगारातही ऑनलाइन पद्धतींचा शिरकाव झाला आणि प्रचंड वेग, एका क्लिकवर असलेली उपलब्धता यांमुळे ऑनलाइन जुगाराच्या व्यसनाचा विळखा ऑफलाइन जुगारापेक्षाही कित्येक पटींनी वाढला. ऑनलाइन जुगार आणि ऑनलाइन गेमिंग यांचे व्यसन लागते, त्यामुळे समाजातील सुव्यवस्थेला धक्का बसू शकतो. ऑनलाइन गॅम्बलिंगच्या व्यसनाचा व्यक्ती, कुटुंब आणि समाज या सर्व स्तरांवर गंभीर दुष्परिणाम होतो. जुगाराच्या व्यसनामुळे नोकरीधंदा गमावणे, नातेसंबंध जपण्यात अपयश, कर्जबाजारीपणा यांसारख्या गंभीर समस्या उद्‌भवतात, त्यामुळे नैराश्य, चिंता, स्वतःला हानी पोहोचवण्याची प्रवृत्ती वाढीस लागू शकते. काही बाबतीत जुगारामुळे कौटुंबिक हिंसाचाराला खतपाणी मिळाल्याचेही निरीक्षण आहे. अनेक तरुण ऑनलाईन जुगाराच्या आहारीत गेले आहेत. पैसै हरल्यामुळे तरुणांमध्ये नैराश्यही येत आहे, काही जण तर आत्महत्येपर्यंत पोहोचले आहेत. जुगारासारख्या ऑनलाइन खेळांच्या नादामुळे तमिळनाडूमध्ये मागील तीन वर्षांत १७ आत्महत्या झाल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. यातून जुगार आणि आत्महत्या यांच्यात परस्परसंबंध असल्याचे दिसून येते. विद्यार्थी सुद्धा मोठ्या प्रमाणात ऑनलाइन गेमिंग आणि गॅम्बलिंगच्या जाळ्यात अडकल्याचे शिक्षकांचे निरीक्षण आहे. खोटे नाव किंवा ओळख धारण करून किंवा पालकांचे क्रेडिट कार्ड वापरून मुले या आभासी जगात व्यवहार करत असतात. प्रचंड संख्येत लोकांपर्यंत सहजपणे आणि स्वस्तात जुगार उपलब्ध असणे यामुळे या समस्येची व्याप्ती कित्येक पटीने वाढत आहे. या गेमिंग वेबसाइट्सचे दोन मोठे तोटे आहेत. पहिलं म्हणजे तरुणांना जुगाराची वाईट सवय लागली आहे. त्याचबरोबर सरकारचेही यामुळे मोठे नुकसान झाले आहे. या पोर्टल्सच्या माध्यमातून वर्षाला सुमारे ८० हजार कोटी रुपये परदेशात पोहोचत असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. हे पोर्टल भारतात कुठेही नोंदणीकृत नाही किंवा येथे कोणताही पत्ता नाही. ऑफलाइनपेक्षा ऑनलाइन जुगार कित्येक पटींनी घातक आहे. कोणत्याही गेमिंगचा ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रकार यांची परस्परांशी तुलनाच होऊ शकत नाही. जुगाराच्या बाबतीतही तेच आहे. हा ऑनलाइन जुगार कोणत्याही वेळी उपलब्ध असतो, त्यामुळे व्यसनाची तीव्रता अधिक असू शकते. यामध्ये समोरची खेळणारी व्यक्ती ही आभासी असते आणि बऱ्याचदा कम्प्युटरच्या अल्गोरिदमने हा खेळ नियंत्रित केलेला असतो. त्यामुळे खेळणाऱ्याच्या कौशल्याला वाव नसतो. दुसरीकडे, बहुतांश वेळा अशा प्रकारच्या रिमोट गॅम्बलिंगमधले व्यवहार हे आभासी चलन किंवा टोकन यांच्या स्वरूपात होत असतात. त्यामुळे त्यावर सरकारी यंत्रणांकडून देखरेख ठेवणेही कठीण जाते. या सर्व पार्श्वभूमीवर, ऑनलाइन गॅम्बलिगवर बंदी घालणे आणि ऑनलाइन गेमिंगचे नियमन करणे गरजेचे होते. देशात जुगारासंबंधीचा कायदा हा ब्रिटिशकालीन आहे, त्यामुळे त्यात ऑनलाइन माध्यमांतील जुगाराचा उल्लेख नाही. तर आयटी कायद्यातही जुगाराचा समावेश नाही. २०१७ मध्ये कायद्याने ऑनलाईन जुगारावर बंदी घालणारे तेलंगणा हे पहिले राज्य ठरले होते. आतापर्यंत केरळ, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश यांनी केवळ गेल्या एका वर्षात ऑनलाईन जुगारावर बंदी आणण्यासाठी कायदे आणि सुधारणा आणल्या. ऑनलाइन गेमिंग असो वा गॅम्बलिंग, त्याचा विस्तार हा देशभर असतो. त्यामुळे एका विशिष्ट राज्यात बंदी किंवा नियमन यापेक्षा राष्ट्रीय पातळीवर त्याचे नियमन करण्याची गरज होती. ऑनलाइन गेम्सच्या जाहिराती सर्रास पाहायला मिळतात. भारतात सट्टेबाजीवर बंदी आहे. असे असतांना या नव माध्यमामुळे कारवाई करता येत नव्हती. यासाठी नियमावली देखील नव्हती. यामुळे केंद्र सरकारने ऑनलाईन गेमिंगसाठी नवी नियमावली जारी केली आहे. या नव्या नियमानुसार कोणत्याही प्रकारच्या सट्टा आणि जुगाराला मनाई करण्यात आली आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी वेगळी यंत्रणा तयार करण्यात आली आहे. ऑनलाईन गेमिंग कंपन्यांची यापुढे केवायसी पडताळणी करणे बंधनकारक राहणार आहे. माध्यम संस्थांसाठी देखील काही मार्गदर्शक तत्व बनवण्यात आली असून या गेम्सच्या जाहिराती वर्तमानपत्रं, वृत्तवाहिन्या आणि अन्य काही प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध न करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. एसआरओद्वारे कोणत्या ऑनलाईन गेमला परवानगी देणं योग्य असेल, हे ठरवले जाईल. ऑनलाईन गेमला मान्यता देण्याचा निर्णय या गेममध्ये कोणत्याही प्रकारे बेटिंग किंवा जुगाराचा समावेश नाही, हे लक्षात घेऊन घेण्यात येईल. ऑनलाईन गेमवर बेट लावली जात असल्याचे आढळल्यास, तो त्यास मान्यता देणार नाही. ऑल इंडिया गेमिंग फेडरेशनने ऑनलाईन गेमिंगसाठी नव्या नियमांचे स्वागत केले आहे. फेडरेशनचे सीईओ रोलँड लँडर्स यांनी ऑनलाईन गेमिंगच्या नियमनासाठी केंद्र सरकारने उचललेले पाऊल निर्णायक असल्याचे म्हटले आहे.




# 1857 च्या स्वातंत्र्यसमरातील पहिला क्रांतिकारी मंगल पांडे

आधुनिक केसरी

**1857 साली प्रज्वलित झालेले भारतीय स्वातंत्र्यसमराचे यज्ञकुंड 1947साली देशगौरव सुभाषचंद्र बोस यांची जीवनरूपी समिधा घेऊन शांत झाले. पुरी नव्वद वर्षे या वीरप्रसवा भारतभूमीत हुतात्म्यांची मालिका उभी राहिली. स्वातंत्र्य लक्ष्मीला प्रसन्न करण्यासाठी अनेकांनी त्यांची जीवनपुष्पे देवी भगवतीच्या चरणावर वाहिली. अनेकांच्या संसारांचे सारीपाट अवेळीच उधळले गेले. अनेक भगिनी विधवा झाल्या. कित्येक माता-पित्यांना कायमस्वरूपी पुत्रवियोग सोसावा लागला. पुरेपूर मोल चुकते झाल्यावरच हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाले. 1857 च्या स्वातंत्र्ययुद्धाच्या यज्ञवेदी वरील पहिली समिधा होती परमवीर मंगल पांडे यांची. आणि ती अर्पण झाली 8 एप्रिल 1857 रोजी ! मंगल पांडे यांच्या चरित्राचा काही भाग आपण पाहूया !**

सत्त्वशील ब्राह्मण शिपाई - मंगल पांडे 34 व्या पलटणीतील तरुण ब्राह्मण शिपाई होते. ते क्रांती पक्षाचे सदस्य होते. कोलकात्याजवळील बराकपूर येथील 19 व्या पलटणीवर त्या वेळी इंग्रज अधिकाऱ्यांनी गाय वा डुक्कर यांची चरबी लावलेल्या नव्या काडतुसांचा प्रयोग करून पहाण्याचे ठरवले. ही काडतुसे बंदुकीत भरण्यापूर्वी त्यांना लावलेले आवरण दातांनी तोडावे लागे. अशा वेळी या आवरणाला लावलेली गाईची वा डुकराची चरबी तोंडात जाई. त्यामुळे या पलटणीतील शिपायांनी ती काडतुसे स्वीकारण्याचे नाकारले. इतकेच नव्हे, तर प्रतिकारार्थ त्यांनी शस्त्र उपसले. त्या दिवशी ब्रिटीश अधिकाऱ्यांची संख्या कमी असल्याने ब्रिटिशांनी तो अपमान मुकाट्याने गिळला. त्यांनी ब्रह्मदेश ( म्यानमार ) हून गोऱ्या सैनिकांची कुमक मागवून या पलटणीला निःशस्त्र करून अपमानित अवस्थेत हाकलून द्यायचे ठरवले. याची अंमलबजावणी बराकपूरला करण्याचे ठरले. आपल्या बांधवांच्या या अपमानाच्या कल्पनेने मंगल पांडे यांचे पित्त खवळले. स्वधर्मावर प्राणापलीकडे निष्ठा ठेवणारा, आचरणाने सत्शील, दिसण्यात तेजस्वी असे तरुण मंगल पांडे यांच्या पवित्र रक्तात देशस्वातंत्र्याची 'विद्युत् चेतना' संचारली. त्यांच्या तलवारीला धीर निघेनासा झाला. समोर अन्याय दिसत असतांना क्षात्रवीरांच्या तलवारी म्यानात तरी कशा रहाणार ?

कवायतीच्या मैदानात उडी ! - 31 मे रोजी एकदम सर्वत्र क्रांतीयुद्धाला प्रारंभ करण्याची श्रीमंत नानासाहेब पेशवे आदींची योजना होती. मात्र 19 व्या पलटणीतील स्वदेशबंधूंचा आपल्यादेखत अपमान व्हावा, ही गोष्ट मंगल पांडे यांच्या अंतःकरणास असह्य वेदना करू लागली. आपल्या पलटणीने आजच उत्थान केले पाहिजे, असे म्हणत मंगल पांडे यांनी त्यांची बंदूक भरून घेतली. हा दिवस होता रविवार, 29 मार्च 1857. कवायतीच्या मैदानावर उडी घेऊन मंगल पांडे ब्रिटीश करत असलेल्या अन्यायाविरुद्ध देशी सैनिकांना उत्तेजित करू लागले. 'मर्दहो, उठा !' अशी गर्जना करून ते सैनिकांना म्हणाले, ''आता माघार घेऊ नका. बंधूंनो, चला तुटून पडा ! तुम्हाला तुमच्या धर्माची शपथ आहे !! चला, आपल्या स्वातंत्र्यासाठी शत्रूचा निःपात करा !!!

हे पहाताच सार्जंट मेजर ह्यूसन याने त्यांना पकडण्याची आज्ञा केली; पण एकही सैनिक जागचा हालला नाही. उलट मंगल पांडे यांची गोळी लागून ह्यूसन जखमी झाला. हे पहाताच लेफ्टनंट बॉ घोडा नाचवत मंगलवर चाल करून आला. एवढ्यात मंगलच्या बंदुकीतून सुटलेली गोळी घोड्याच्या पोटात शिरली. घोडा लेफ्टनंटसह भूमीवर आडवा झाला. मंगल पांडे यांना पुन्हा बंदुकीत गोळ्या भरायचा अवसर मिळण्याआधीच लेफ्टनंट बॉ आपले पिस्तुल काढून उभा राहिला. मंगल पांडे यांनी तिळमात्रही न डगमगता आपली तलवार उपसली. बॉने पिस्तुल झाडले; पण मंगल पांडे यांनी त्याचा नेम चुकवला. आपल्या तलवारीने मंगल पांडे यांनी त्यालाही लोळवले. ह्यूसन व बॉ आपल्या निवासस्थानांकडे पळून गेले.

देशद्रोही शेख पालटू - एवढ्यात शेख पालटू नावाचा मुसलमान शिपाई मंगलच्या दिशेने जाऊ लागला. तो आपल्या पलटणीतील असल्यामुळे आपल्याला मदत करायला येत असावा, असे मंगल पांडे यांना वाटले; पण तसे घडले नाही. शेख पालटूने मंगल पांडे यांना पाठीमागून विळखा घातला. पांडे यांनी त्याचा विळखा सोडवला. देशी शिपाईही शेखच्या रोखाने दगड व जोडे फेकू लागले. जिवाच्या भीतीने शेख पालटू पळून गेला.

थोड्याच वेळात कर्नल व्हीलर त्या स्थानी आला. त्याने सैनिकांना मंगल पांडे यांना पकडण्याची आज्ञा केली. कर्नल व्हीलरला सैनिकांनी निक्षून सांगितले, आम्ही या पवित्र ब्राह्मणाच्या केसालासुद्धा हात लावणार नाही. हिंदुस्थानच्या भूमीवरून वाहाणारे गोऱ्या अधिकाऱ्यांचे रक्त आणि समोरचे धर्माभिमानी शिपाई पाहून कर्नल व्हीलर त्याच्या बंगल्याकडे पळून गेला. नंतर जनरल हिअर्स पुष्कळसे युरोपियन शिपाई घेऊन मंगल पांडे यांच्यावर चालून गेला. तोपर्यंत दुपार झाली होती. मंगल पांडे थकले होते. आपण फिरंग्यांच्या हातात सापडणार, हे पहाताच त्यांनी बंदूक आपल्या छातीकडे रोखली व स्वतःवर गोळी झाडून घेतली. मंगल पांडे धरणीवर कोसळले. त्यांची शुद्ध हरपली. नंतरच ब्रिटीश त्यांना पकडू शकले. जखमी झालेल्या मंगल पांडे यांना सैनिकी रुग्णालयात नेण्यात आले. आठवडाभरातच त्यांच्यावर सैनिकी न्यायालयात अभियोग चालवण्यात आला. स्वधर्मावर प्राणापलीकडे निष्ठा ठेवणाऱ्या या तरण्याबांड क्षात्रवीराला न्यायालयाने इतर कटवाल्यांची नावे विचारली; परंतु मंगल पांडे यांच्या मुखातून कोणाचेही नाव बाहेर पडले नाही. पांडे यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. आपल्या देशबांधवांच्या अपमानासाठी स्वतःचे प्राण देणाऱ्या या क्रांतीच्या अग्रदूताविषयी लोकांत इतकी विलक्षण श्रद्धा निर्माण झाली होती की, साऱ्या बराकपूरमध्ये त्यांना फाशी देण्यास एकही मांग मिळेना. शेवटी या घाणेरड्या कामासाठी कोलकात्याहून चार माणसे मागवण्यात आली.





मंगल पांडे ज्या तुकडीचे सैनिक होते, तिच्या सुभेदाराला इंग्रजांनी ठार मारले. 19 आणि 34 या दोन्ही पलटणी त्यांनी निःशस्त्र करून खालसा केल्या. याचा परिणाम उलटाच झाला. शिपायांना धाक वाटण्याऐवजी शेकडो शिपायांनी आपणहून गुलामीचे चिन्ह असलेले त्यांचे सैनिकी गणवेश फाडून टाकले. या परदास्याच्या शृंखला आजपर्यंत बाळगल्याच्या पापक्षालनार्थ त्यांनी खरोखरच भागीरथीत स्नान केले.

स्वातंत्र्यसूर्याला रक्ताचे अर्घ्य ! - 8 एप्रिल रोजी सकाळी मंगल पांडे यांना फाशीच्या फळीकडे नेण्यात आले. त्यांच्याभोवती सैनिकांचा पहारा होता. मंगल पांडे धीटपणे फळीवर चढले. 'आपण कोणाचीही नावे सांगणार नाही', असे त्यांनी पुन्हा एकदा सांगताच त्यांच्या पायाखालचा आधार काढून घेण्यात आला. मातृभूमीच्या चरणांवर आपल्या रक्ताचे अर्घ्य देऊन मंगल पांडे 1857 च्या क्रांतीयुद्धातील पहिले क्रांतीकारक ठरले. त्यांच्या नावाचा प्रभाव एवढा विलक्षण होता की, या क्रांतीयुद्धातील सर्व सैनिकांना इंग्रज 'पांडे' याच नावाने संबोधू लागले.

8 एप्रिल 1857 रोजी बराकपूरच्या कारागृहात मंगल पांडे यांचे धारोष्ण रक्त या हिंदभूमीवर सांडले. त्यांच्या या रक्तसिंचनातून देश व धर्म यांसाठी बलिदान करण्यास अनेक देशभक्त आसुसलेले होते !

**संकलक : कु. प्रियांका लोणे,**
**समन्वयक, हिंदू जनजागृती समिती,**
**संभाजीनगर-जालना**
**संपर्क क्र.: 8208443401**

# आज्ञाधारक शिष्य आरुणी !

आधुनिक केसरी

धौम्यऋषींच्या आश्रमात आरुणी नावाचा त्यांचा एक शिष्य होता. एके दिवशी मोठा पाऊस पडू लागला. पावसाच्या पाण्यामुळे आश्रमाच्या शेताचा बांध फुटून शेत वाहून जाऊ नये; म्हणून धौम्यऋषींनी शिष्यांना सांगितले, जा ! काळजी घ्या. शेताचा बांध फुटू देऊ नका.

आरुणी आणि काही शिष्य शेतातील बांधाजवळ आले. फुटलेला बांध त्या सर्वांनी नीट करावा अन् पावसाच्या पाण्याने पुन्हा तो फुटून जावा, असे बरेच वेळा घडले. पाऊस काही थांबत नव्हता. रात्र झाली. सर्व शिष्य कंटाळून परत गेले. दिवसभर कष्ट केल्यामुळे थकलेले सर्व शिष्य गाढ झोपी गेले. सकाळी पाऊस थांबला, तेव्हा सर्वांच्या लक्षात आले की आरुणी आश्रमात दिसत नाही. हे वृत्त धौम्यऋषींच्या कानावर घालण्यात आले. धौम्यऋषी म्हणाले, चला, आपण शेतात जाऊन बघूया. शेतात आल्यावर आरुणी कोठे दिसेना. धौम्यऋषींनी मोठ्याने विचारले, बाळ आरुणी, तू कोठे आहेस ? बांधाच्या दिशेकडून उत्तर आले, गुरुजी, मी येथे आहे ! पहातात तर काय ? घातलेला बांध टिकेना; म्हणून स्वतः आरुणीच तेथे आडवा पडलेला त्यांना दिसला ! गुरुजींनी त्याला उठवले आणि प्रेमाने जवळ घेतले. मुलांनो, गुरूंचे आज्ञापालन, हे शिष्याचे कर्तव्यच आहे. तुम्हीही आरुणीसारखे आज्ञापालन करून गुरुजींचे लाडके बना !



# उंच पहाडावरचे मंदिर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**एका छोट्याशा गावात राहात होता चाओ येन. लहानपणापासूनच तो खूप समजूतदार होता. गावातल्या सगळ्यांचा आवडता होता. गावच्या दक्षिणेला एका उंच पहाडावर एक मंदिर होते. त्या मंदिरात एक पवित्र ग्रंथ ठेवण्यात आला होता, ज्यात लोकांच्या भविष्यातील जीवनाविषयी लिहिले होते. तिथला पुजारी ते वाचून दाखवत असे. चाओ येन अठरा वर्षांचा झाला, तेव्हा त्याच्या वडिलांनी त्याला मंदिरात नेले. वडिलांनी पुजाऱ्याला चाओचे भविष्य वाचून दाखवण्याविषयी विनंती केली. पुजाऱ्याने पहिल्यांदा चाओच्या शिक्षणाबाबत सांगितले. त्यानंतर कामधंद्याविषयी सांगितले पण अचानक तो बोलायचा थांबला.**

चाओच्या वडिलांना काळजी वाटू लागली. त्यांनी विचारलं, काय झालं पुजारी, असे अचानक का बरं थांबलात? पुजारी दुःखी स्वरात म्हणाला," सांगताना मला फार दुः ख होतंय, पण..." "काय झालं, पुजारी? चाओचे वडिलांनी काळजीच्या आर्तस्वरात विचारले. " या ग्रंथानुसार तुमच्या मुलाचे आयुष्य अवघे एकोणवीस वर्षांचे आहे. त्यानंतर त्याचा मृत्यू अटळ आहे. चाओ आणि त्याच्या वडिलांचा या गोष्टीवर विश्वासच बसला नाही. चाओचे वडील पुन्हा म्हणाले, अनेकदा नीट पहा, नक्कीच कुठे तरी चूक झाली असली पाहिजे. नाही, कुठेच चूक नाही. यात अगदी स्वच्छ दिसतं आहे. पुजारी म्हणाला आणि त्याने ग्रंथ बंद करून ठेवला. चिंतेत बुडालेले पिता-पुत्र घरी परत आले. त्यांनी मनाला समजावलं,' जे काही घडायचं आहे, ते चुकणार नाही. आपण परमेश्वराची प्रार्थना करू' भविष्य ऐकल्यापासून चाओ उदास राहू लागला. त्याचं मन कशातच लागेना. त्याला एकच चिंता सतावू लागली, ती म्हणजे आपल्या पश्चात आई-वडिलांचं कसं होणार? याच काळजीत असताना एक दिवस चाओ धनुष्य आणि बाणांनी भरलेला भाता घेऊन शिकारीला गेला. चालत चालतच तो उंच पहाडावर गेला. त्याचे मन पार उन्मूळ पडले होते. आणि चिंतेने त्याला घेरून टाकले होते. आपल्या आई-वडिलांचा सांभाळ कोण करणार? या एकाच प्रश्नाने तो अस्वस्थ होता. तो पहाड चढतच राहिला. चढता चढता तो अगदी उंच अशा एका छोट्या गवताळ प्रदेशात पोहोचला. तिथे चोहोबाजूंनी रंगीबेरंगी टवटवीत फुले उमलली होती. छान उन्ह पडले होते. थकलेला चाओ तिथल्या एका झाडाखाली जाऊन बसला. बसल्या बसल्या त्याला पेंग येऊ लागली. लवकरच त्याला गाढ निद्रेने घेरले. डोळे उघडले, तेव्हा अंधारून आले होते. पक्ष्यांचा किलबिलाट चालू होता, त्याचबरोबर कुणाच्या तरी बोलण्याचा आवाजही ऐकू येत होता. तो पटकन उठला आणि आवाजाच्या दिशेने पुढे सरकला. तिथे त्याला दोन माणसे समोरासमोर एका दगडावर बसलेली दिसली. कवड्यांच्या खेळासारखा काही तरी खेळ चालला होता. मधे मधे ते कुठले कुठले तरी अंक उच्चारायचे. तो झाडाआड उभा राहिला. दोघांमधला एकटा रुंद कपाळाचा आणि वयस्क दिसत होता. त्याने हिरव्या रंगाचा गाऊन घातला होता. त्याची चप्पलसुद्धा हिरव्या रंगाची होती. तर त्याच्या समोर बसलेल्या माणसाचे कपडे आकाशी रंगाचे होते. त्यावरील चांदण्यांचे टिपके चमकत होते. त्याचे केस कुरळे आणि खांद्यापर्यंत लोंबणारे होते. तो अंक उच्चारायचा, तेव्हा वृद्ध डोक्याला हात लावून विचार करत राहायचा. अंक वाढायचे, कमी व्हायचे, मग शेवटी दोघेही एका अंकावर येऊन थांबायचे.

आता चाओला राहवलं नाही. तो तडक त्यांच्याजवळ गेला. ते दोघे अजूनही कुठल्या तरी अंकावर विचार करत होते. इतक्यात आकाशी निळ्या कापडातला मनुष्य म्हणाला, व्वा, खूपच छान! काय नशीब मिळवलंय या माणसाने!

इतक्यात त्या दोघांचे लक्ष चाओकडे गेले. तू कोण आणि इथे का व कसा आलास?" निळ्या गाऊनवाल्याने विचारले. चाओ म्हणाला, मी तर इथेच झोपलो होतो. आता जाग आली, तेव्हा तुम्हाला पाहिलं.



आपण कोण आहात? कोणी नाही. तू इथून जा. मला ठाऊक आहे, तुम्ही सामान्य माणसे नाही आहात. पण खरेच, कृपा करून मला सांगा की आपण कोण आहात ? चाओ आदराने पुढे झुकत म्हणाला. निळा गाऊनवाला म्हणाला, आकाशात ती तारूयांची झुंड दिसते का, ज्यांचा आकार अस्वलासारखा आहे? हो, आजीने दाखवली होती. आजसुद्धा मी ओळखतो. चाओ अगदी उत्साहित होऊन म्हणाला. मी त्या ताऱ्यांचा राजा आहे. आणि हे दिर्घायुष्य देणारे देवता आहेत. समजलं? आता घरी जा. चाओ लगेच जमिनीवर गुडघे टेकले आणि दिर्घायुष्य देणाऱ्या देवतेचे पाय धरले, मला तुमचीच गरज होती. तुम्हीच माझी मदत करू शकता. मदत? कसली मदत? वृद्ध. भाग्यग्रंथात माझे आयुष्य फक्त एकोणवीस वर्षांचे आहे आणि मला एकोणवीस वर्षे व्हायला केवळ काही दिवसच उरले आहेत. माझ्या पश्चात माझ्या आई-वडिलांचे कसे होणार, याची मला चिंता लागून राहिली आहे. मला इतक्या लवकर मरायचं नाही. मला मदत करा" चाओ अत्यंत कळवळून म्हणाला. निळा पायघोळ अंगरखा घातलेला इसम त्याच्या खांद्यावर हात ठेवत म्हणाला," हे बघ, नशीब एकदाच लिहिलं जातं. ते पुन्हा बदलता येत नाही. ग्रंथात लिहिलेलं पुसता येत नाही. आता जे काही आयुष्य उरलं आहे, ते तू आई-वडिलांच्या सेवेत घालव. जा, घरी जा उशीर करू नकोस. पण चाओ तेथून हलला नाही, तो वृद्ध व्यक्तीचे पाय धरून रडत राहिला. दोघांनीही एकमेकांकडे पाहिले. त्यांनाही काय करावं सुचत नव्हतं? काही वेळ विचार केल्यावर हिरव्या गाऊनमधला वृद्ध म्हणाला," आम्ही भाग्यग्रंथातले अंक बदलू शकत नाही, पण झालेली चूक दुरुस्त करू शकतो." असे म्हणून ती वृद्ध देवता हसली. त्याचबरोबर निळा गाऊनवालाही हसला.

त्याच्या बोलण्याचा अर्थ न उमजल्याने चाओने आपली मान वर केली. पण तिथे कोणीच नव्हते. त्याला रडू कोसळले. आपल्या मदतीला आता कोणीच येणार नाही, याची त्याला खात्री वाटू लागली. आपला भाता आणि धनुष्य खांद्यावर घेऊन तो जड अंतःकरणाने पहाड उतरू लागला. चाओने या घटनेची कुठेच वाच्यता केली नाही. आता तो फक्त एकच करायचा, दर आठवड्याला पहाडावर जायचा आणि त्या दगडावर मेणबत्ती लावून यायचा. त्याचा हा क्रम तो एक्यान्नव ( ९१ ) वर्षांचा होईपर्यंत चालत राहिला. शेवटी त्याचवेळेला त्याच्या लक्षात आले की ती देवता कोणत्या चुकीविषयी बोलत होते. दिर्घायुष्य देणाऱ्या देवता त्यांनी एकोणवीसमधला एक अंक काढून नऊनंतर लिहिला होता. आजसुद्धा दक्षिण पहाडावर एक मंदिर आहे, तिथे लोक दिर्घायुष्य लाभावे, यासाठी प्रार्थनेला जातात.

# भारतीय चित्रपटसंगीतातील अनमोल रत्न



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**भारतीय हिंदी चित्रपटसृष्टीतील संगीत क्षेत्रात आपल्या संगीताने संपूर्ण जगाला भुरळ पाडणारी आणि ज्यांचे नाव घेतल्याशिवाय हिंदी चित्रपटसृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही ती जोडी अर्थात संगीतकार शंकर - जयकिशन. 'बरसात' चित्रपटाला संगीत देण्यापासून शंकर - जयकिशन यांच्या कारकीर्दीला सुरुवात झाली आणि पुढे त्यानी मागे वळून पाहिले नाही. १९४९ ते १९८७ या काळात त्यानी जवळपास १९० चित्रपटांना संगीत दिले.**

आवारा, बादल, काली घटा, नगीना, दाग, पर्वत, पूनम, आह, आस, औरत, नया घर, पतिता, शिकस्त, सीमा, श्री ४२०, बसन्त बहार, चोरी चोरी, दिल अपना और प्रित पराई, जिश देश में गंगा बहती है, संगम असे आणखी कितीतरी चित्रपट आहेत ज्यांच्या संगीताने रसिकांना वेड लावले.

शंकर - जयकिशन यांच्या संगीताने अनेक पिढ्यांचे बालपण, तारुण्य पूर्ण व्यापून गेलेले होते. त्यांच्या संगीताचा चाहता वर्ग फार मोठा आहे. त्यातीलच एक एस. जे. यांचे चाहते प्रा. कृष्णकुमार गावंड. शंकर - जयकिशन या जोडीने भारतीय चित्रपट संगीतात दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांच्या स्मृती कायमस्वरूपी जपण्यासाठी प्रा. कृष्णकुमार गावंड यांनी 'याद - ए - शंकर जयकिशन' हा लेखसंग्रह संपादित केला आहे. स्वरमुग्धा आर्ट्स आणि उद्वेली बुक्स यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकाशित हे पुस्तक एस जे च्या चाहत्यांसाठी पर्वणीच आहे. संगीतकार शंकर जयकिशन यांच्या संगीताने प्रभावित होऊन प्रा. कृष्णकुमार गावंड यांनी १९७६ साली शालेय मित्र श्रीकांत कुलकर्णी आणि वसंत खेर यांच्या सहयोगाने "सिंफनी" संस्थेची स्थापना करुन "याद-ए-शंकरजयकिशन" कार्यक्रमाची निर्मिती केली. शुभारंभाच्या कार्यक्रमास संगीतकार शंकर( जयकिशन ) प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले व त्यांनी आशिर्वाद दिले. या कार्यक्रमाच्या रौप्यमहोत्सवास ( शिवाजीमंदिर ) येथे पुन्हा शंकरजी उपस्थित राहिले. या कार्यक्रमाचे संपूर्ण भारतात ६०० प्रयोग केवळ ५ वर्षात सादर झाले. त्यानंतर "सिंफनी" संस्थेने रंगभूमीवर विविध प्रकारचे कार्यक्रम सादर केले

२०२२ - २३हे साल हसरत जयपुरी, संगीतकार शंकर आणि गीतकार शैलेन्द्र यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्यामुळे त्यांच्या आठवणींना उजाळा देण्या-निमित्ताने या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली. या लेखसंग्रहात ३४ लेखांचा समावेश आहे. मराठी सोबतच हिंदी आणि इंग्रजी लेखही यात समाविष्ट आहेत. प्रत्येक लेख वाचताना आपण त्या काळात रममाण होऊन जातो. वेगवेगळ्या प्रांतातून आलेल्या, भिन्न स्वभावाच्या या व्यक्तिना जोडणारा समान धागा होता संगीत. शंकर जयकिशन हे नाव एकमेकांशी कसे जोडले गेले, यांची जोडी नेमकी जमली कशी, पृथ्वी थिएटर्स मध्ये या जोडीचा प्रवेश कसा झाला , राज कपूर आणि एस जे हे समीकरण कसे तयार झाले याची पार्श्वभूमी या विविध लेखांतून समजते. दोघांनाही शास्त्रीय संगीताची आवड होती. भैरवी राग हा त्यांचा अत्यंत आवडता. शंकर उत्तम तबला वाजवत असे तर जयकिशन यांचे हार्मोनियम , अकोर्डियनवर प्रभुत्व होतं. त्यांच्या कोणत्याही गाण्यात एकसुरीपणा जाणवत नाही. प्रत्येक गाण्याचे सादरीकरण हे त्या चित्रपटातील कथानकाला साजेसे असायचे. जीव तोडून काम करणं, आपल्या कामात चोख असणे म्हणजे क्काय हे जाणून घेण्यासाठी एस जे चे पारायण करायलाच हवे.


ज्या व्यक्तिंना शंकर जयकिशन यांचा सहवास लाभला, ज्यांना त्यांची ओझरती भेट घेता आली, ज्यांनी एस जे कडे वादक म्हणून काम केले, अशा व्यक्तींना संपर्क करून, प्रत्यक्ष भेटून त्यांच्याकडून या आठवणींचे संकलन करण्याचं काम वाटते तितके सोपे नव्हते. हे शिवधनुष्य संपादक प्रा. कृष्णकुमार गावंड यांनी लीलया पेलले आहे. त्यांनी स्वतः लिहिलेल्या लेखात ते म्हणतात की, एस जे चं संगीत हा पीएचडीचा विषय आहे. जितके लिहू तितके कमी. या लेखसंग्रहात अशोक पत्की, शिरीष कणेकर, डॉ. मृदुला दाढे - जोशी, विवेक पुणतांबेकर, चंद्रकांत भिडे यांचे लेख तसेच अकोर्डियन वादक के.भरत यांची मुलाखत, सतारवादक जयराम आचार्य यांची मुलाखत, धनंजय कुलकर्णी यांनी लोकप्रिय गाण्यांच्या निर्मितिमागील किस्से, पियानो वादक इनॉंक डॅनियल्स, अरुणा अन्तरकर इत्यादि.अशा कित्येक चाहते आणि दिग्गज मंडळींनी आपल्या लेखातून शंकर जयकिशन यांच्या स्मृती जागवल्या आहेत. खरेच हे लेख वाचताना रसिक वाचक, संगीतप्रेमी भूतकाळातील समृद्ध आठवणींनी गहिवरुन जातील हे नक्की. या लेखातून शंकर जयकिशन या जोडीच्या वैयक्तिक आयुष्यापासून ते त्यांच्या संगीत क्षेत्रातील कार्याबद्दल माहिती मिळतेच सोबतच या जोडीमुळे अनेक चेहरे प्रकाशमय झाले, त्यांचा ही प्रवास यात शब्दबद्ध झाला आहे. गीतकार हसरत जयपुरी, शैलेंद्र, मुकेश, गायिका लता मंगेशकर, गायिका शारदा, मोहम्मद रफी, मन्ना डे इ. सोबतच्या आठवणीं, किस्से सुद्धा वाचायला मिळतात. शंकर जयकिशन यांची मैत्री, कामातील बॉन्डिंग, ध्वनिमुद्रण करतानाची त्यांची कार्यतत्परता, त्यांचे अलिखित नियम, कामाप्रति निष्ठा या अशा अनेक गोष्टी या पुस्तकात उलगडत जातात.

मुड़ मुड़ के ना देख मुड़ मुड़ के, पर्दे में रहने दो, नैन मिले चैन कहा, जिंदगी एक सफर है सुहाना, अजीब दास्ता है ये, प्यार हुआ इकरार हुआ है, बदन पे सितारे लपेटे हुए, लिखे जो खत तुझे, आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे, किसी के मुस्कुराहटो , बहारो फूल बरसाओ, आप यहां आए किस की लिए, तेरी प्यारी प्यारी सुरतको, चाहे कोई मुझे जंगली कहे, अय्य्या करु मैं करु मै क्या सुकु सुकु इत्यादी.. या आणि अशा कित्येक गाण्यांनी रसिकांच्या मनावर राज्य केले आहे. आमच्या पिढीला ही या गाण्यांचा परिचय आहे पण या गाण्यांना संगीत शंकर जयकिशन यांचे आहे, हे या पुस्तकामुळे माहीत झाले. आताच्या नव्या पिढीला जुनी गाणी नव्या ढंगात सादर केलेली माहित असतात. पण मुळ गाण्याची जी मजा आहे, ती सर्वांपर्यंत पोहचणं महत्त्वाचे आहे. जुनी गाणी म्हणजे खरेच सुवर्णकाळ जागवणारी होती. एस जे यांनी इतकी वेगवेगळी परिमाणात्मक गाणी संगीतसृष्टीला दिली आहेत, की अशी जोड़ी पुन्हा होणे नाही. हे पुस्तक लतादिदींना आदरपूर्वक समर्पित करण्यात आले आहे आणि जयकिशन यांची कन्या भैरवी यांनी पुस्तकाला शुभेच्छा दिल्या आहेत.विवेक पुणतांबेकर यांनी समर्पम प्रस्तावना दिली आहे.

'याद - ए - शंकर जयकिशन' हे पुस्तक म्हणजे शंकर जयकिशन यांना वाहिलेली प्रांजळ शब्दसुमनांजली आहे. संगीतप्रेमीसाठी आणि एस जे च्या चाहत्यांसाठी हे पुस्तक आठवणींची शिदोरी आहे.

**( याद - ए - शंकर जयकिशन / संपादन : प्रा. कृष्णकुमार गावंड / प्रकाशक : उद्वेली बुक्स / मूल्य : ३०० रुपये )**

**- अस्मिता प्रदीप येंडे**



# सरकार ग्राहकांची आणखी किती चेष्टा करणार !



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**एकीकडे महागाईने उग्र रूप धारण केले आहे तर दुसरीकडे सरकार वेळोवेळी वीजेचे दर वाढवून शॉक देतांना दिसत आहे. सोबतच पाणी कर व इतर करांमध्ये भरमसाठ वाढ होत आहे. याची संपूर्ण झळ सर्वसामान्यांना सोसावी लागत आहे. देशातील अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्रात विक्रमी वीज निर्मिती होते. तरीही इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज महागडी का?असा प्रश्न सर्वसामान्यांनपुढे नेहमीच भेडसावत असतो तरीही सरकार नेहमीच कोणते ना कोणते कारण सामोरं करून वीज दरवाढ ग्राहकांच्या खांद्यावर लादत असते. त्यामुळे ग्राहकांना कळत न कळत अदृश्य शॉक लागत असतो.**

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने महावितरणाची दरवाढीची याचिका मंजूर करून सर्वसामान्यांना मोठा धक्काच दिला आहे.आयोगाचा दावा आहे की 2023-24 मध्ये 2.9 टक्के आणि 2024-25 मध्ये 5.6 टक्के वीज दरवाढीला मंजुरी दिली आहे.म्हणजेच आयोगाने व सरकारने नागरिकांची दिशाभूल करून मनमानी वीज दरवाढ वाढविल्याचे स्पष्ट दिसून येते.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने याचिका मंजूर केल्याने 34 टक्क्यांपर्यंत वीज दरवाढ झाली आहे.यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला मोठी कात्री लागणार आहे.राजकीय पुढाऱ्यांना अनेक सवलतींसोबत वीज दरातही मोठ्या प्रमाणात सवलत दिली जाते आणि ग्राहकांचा विचार जेव्हा होतो तेव्हा त्यांच्यावर



भरमसाठ वीज दरवाढ आकारल्या जाते हा कसला न्याय म्हणावा ?महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती करणारे मोठे राज्य आहे सोबतच महाराष्ट्र इतर राज्यांना मोठ्या प्रमाणात वीज पुरवठा करीत असते व ज्या राज्यांना वीज देतो तीथे वीजेचे दर कमी.परंतु महाराष्ट्र वीज उत्पादक राज्य असुन सुद्धा महाराष्ट्रात वीज दरवाढ हा अत्यंत चिंतेचा,गंभीर आणि आश्चर्य कारक विषय आहे.आता वीज दरवाढीचा फटका बीपीएल ग्राहकांना व शेतकऱ्यांना सुद्धा बसणार आहे.0 ते 30 युनिट पर्यंत वीज वापर करणाऱ्या ग्राहकांना आता अधिक पैसे द्यावे लागतील. या श्रेणीमध्ये जवळपास 10 टक्के वाढ झाली आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांना आता 16 ते 26 टक्के अधिक पैसे द्यावे लागतील. म्हणजे राज्य विद्युत नियामक आयोगाने बीपीएल धारकांना व शेतकऱ्यांना सुद्धा वीज दरवाढीपासुन सोडले नाही ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.ज्या राज्यात वीज उत्पादन होत नाही किंवा कमी प्रमाणात होते अशा राज्यात वीजेचे दर कमी व ज्या राज्यात भरपूर वीज निर्मिती होते त्या राज्यात वीज दरवाढ करून सरकार, राज्य विद्युत नियामक आयोग व महावितरण कंपनी ग्राहकांची गळचेपी करीत आहे की काय असे वाटत आहे.त्यामुळे राज्य विद्युत नियामक आयोगाने ग्राहकांवर लादलेली दरवाढ ताबडतोब कमी करून महाराष्ट्र सरकारने वीज दरवाढीच्या बाबतीत योग्य पाऊल उचलावे आणि ग्राहकांचे हीत लक्षात घेऊन व वीज दरवाढ कमी करून वीज ग्राहकांना व शेतकऱ्यांना योग्य दिलासा द्यावा हीच महाराष्ट्र सरकार कडून अपेक्षा.

# हेमाडपंती वास्तूकलेचा उत्तम नमुना : अकराशे वर्षांपूर्वीचे खडकेश्वर महादेव मंदिर

आधुनिक केसरी

**खडकेश्वर महादेव मंदिर हे धार्मिक जिल्हा म्हणून ओळखला जाणाऱ्या नंदिग्राम (नांदेड ) जिल्ह्यात आहे. मुखेड तालुक्याचे प्राचीन नाव मोहनावती असून दक्षिणेस 32 किमी अंतरावर खडका हे गाव वसलेले आहे. या गावास  मुक्रमाबाद या ही नावाने ओळखले जाते.  बाराव्या शतकात नंदिग्राम जिल्हात होट्टल हे कल्याणी चालुक्यांचे राजधानी होते. या काळात मंदिरातील कलात्मक दृष्ट्या अप्रतिम वास्तुकला प्रसिद्ध होती. मंदिरे घडवित असताना त्यास कल्पक कलेची जोड दिली तर एक उत्कृष्ट वास्तू निर्माण होते. धार्मिक वास्तू उभारण्यामागे वास्तूकला, शिल्पकला, खगोलशास्त्र, अंकशास्त्र या सर्वाचा आभ्यास करुन हिंदू धर्माचे पवित्र स्थान असणाऱ्या मंदिराची निर्मिती करण्यात येत असे. तत्कालीन जीवनातील गतवैभव कल्याणी चालुक्य काळातील मंदिर शिल्पातून पहावयास मिळते.**

**भौगोलिक परिस्थिती :** कर्नाटक राज्याच्या सीमेवर 3 कि.मी.अंतरावर मराठवाड्यातील कोपऱ्यात वसलेले खडका ( मुक्रमाबाद ) हे गाव सांस्कृतिक दृष्टीने नदीच्या संगमावर वसलेले आहे. उदगीर येथिल किल्ल्याजवळून वाहणारी लेंडी नदी व तिरु नदीचा संगम खडका येथे होतो.ही नदी पुढे मांजरा नदीस मिळते.प्राचीन भारतीय संस्कृतीतील लोकजीवन हे बहुदा नदींच्या शेजारीच पहावयास मिळते.विविध संकृतीचा उगम यात प्रामुख्याने नदीचा उल्लेख होतोच.लेंडी नदीचा प्रवाह खडकाळ भागातून होऊन व पुढे जाऊन मुक्रमाबाद या गावात संगम होतो. स्वातंत्र्याच्या पुर्वीपासून या गावास खडका या नावाने ओळखत असत. या परिसरात बेसाल्टचा काळा पाषाण मोठ्याप्रमाणात पहावयात मिळतो.खडका हे गाव परीसरातील बाजारपेठेसाठी प्रसिद्ध आहे.याठिकाणी काळ्या पाषाणात घडवलेली कल्याणी चालुक्यकाळातील खडकेश्वर महादेव मंदिर पहावयास मिळणे हे खडका वासीयांचे भाग्यच समजावे लागेल.    भारतात प्राचीन काळात दैवतांची भव्य देवळे बांधण्याची प्रथा होती. गुप्त काळापासून आजतागायत भारतातील विविध प्रांतात विविध शैलीचे मंदिरे बांधली गेली. स्थानिक स्थापत्यशास्त्र, शिल्पकला, कलाकुसर वगैरेंचा या मंदिराच्या  बांधकामावर मोठा प्रभाव दिसतो. प्राचीन संस्कृतीची ओळख आणि माहिती करून देण्यात मंदिरे, वास्तूकला, शिल्पकला ही महत्त्वाची भूमिका बजावतात.


महाराष्ट्रात अतिशय सुंदर दगडी बांधकामाची आणि अप्रतिम कोरीव नक्षीकामाने सजवलेली मंदिरे ही  हेमाडपंती शैलीच्या नावाने ओळखली जातात. घडीव दगडांवर दगड रचून तयार केलेली वास्तू हे हेमाडपंती मंदिरांचे खास वैशिष्ट्य मानले जाते. बांधकाम करण्यासाठी चुना, माती न वापरता अशा शैलीच्या मंदिरांचे बांधकाम केले आहे. दगडांवरील सुबक शिल्पकला छतावरील नक्षी, प्रवेशद्वारावरील द्वारपाल, यक्ष यक्षीणी, नक्षीदार वेली या मंदिरांना एक नवचैतन्य रूप प्रदान करतात. हेमाडपंती मंदिरे पक्क्या बांधकामाची नसून दगडावर दगड रचून कमी वेळात मंदिर निर्माण करण्याची शैली हेमाडपंती मंदिरात पहावयास मिळते. अनेक ठिकाणी भूकंप, पूर, पावसामुळे होणारी झीज, दगडांच्या भेगांतून उगवणारे झुडपे यातून अनेक मंदिरांची दुर्दशा झाली आहे.  यादव राजे कलाप्रेमी असल्याने हेमाडपंती मंदिरे या काळात निर्माण झाली. प्रत्येक मंदिराचे आपले स्वतःचे वेगळे वैशिष्ट्य आहे. मंदिराचे स्थापत्यकार,वास्तूविशारद हेमाडपंत यांच्या कौशल्याचे दर्शन त्यांनी साकारलेल्या मंदिरातून पहावयास मिळते.

**हेमाडपंती मांदिराची वैशिष्ट्ये :**
देवगिरीचा राजा रामदेवराव यादव यांच्या काळात ( सन 1271 ते 1311 ) मुख्य प्रधान राहिलेल्या हेमाद्री पंडित किंवा हेमाडपंत यांनी या प्रकारच्या मंदिर बांधणीचा ठीक ठिकाणी उपयोग केल्याने ही बांधणीपद्धत त्यांच्या नावावरून हेमाडपंती म्हणून ओळखली जाऊ लागली. भारतीय स्थापत्यशैलींपैकी एक प्रमुख शैली म्हणून हेमाडपंती शैलीचा उल्लेख केला जातो. मंदिरांचे हेमाडपंती पद्धतीने केलेले बांधकाम टिकून राहिलेली आजतागायत पहावयास मिळतात.  इमारत बांधायची तर दगड किंवा विटा एकमेकांस घट्ट चिकटून राहाव्यात म्हणून माती, चुना, सिमेंट इत्यादींपैकी काही वापरावे लागतेच... पण हेमाडपंती मंदिरे ह्याला अपवाद आहेत.हे मंदिर चिरे त्रिकोण,चौकोन, पंचकोन, वर्तुळ, अर्धवर्तुळ इत्यादी आकारांत घडवून ते एकमेकांत कुशलतेने बसवण्याची ही एक कला होती.या कलेतून या शैलीचा उगम झाला.व पुढे हेमाडपंती शैली नावाने ओळखले जाऊ लागले. गाभारा चौकोनी व सभांडपाला अनेक अलंकृत खांब असून प्रत्येक खांबांवर व छत्तावर विविध प्रसंगांची चित्रे,नक्षीकाम कोरलेली आहेत. छतावरील मोकळ्या भागावर नक्षी काढून सभामंडपाला आधार दिलेला आहे.हेमाडपंती देवालये प्रामुख्याने पूर्वाभिमुख पहावयास मिळतात. मंदिर हे अशा प्रकारच्या वास्तुकलेचा दुर्मिळ नमुना आहे.



**खडकेश्वर महादेव मंदिर :** बाराव्या शतकातील खडका येथिल हेमाडपंती मंदिराची रचना गर्भगृह, मुखमंडप, अंतराळ, दोन्ही बाजूस एक अशी दोन स्वतंत्र गर्भगृह व द्वार मंडम या पद्धतीने आहे.मुळ मंदिराची पूर्व-पश्चिम लांबी 48 फूट तर दक्षिण -उत्तर रुंदी 34 फूट इतकी असून मंदिर जवळपास 30 स्तंभावर उभारलेले आहे. मंदिरांचा आकार साधारणपणे चौकोनाकृती आहे. मंदिरातील स्तंभावरील नक्षीकाम तीन भागात विभागलेले आहे. तळभाग हा चौकोनी असून मध्य भागावर सुरेख अशी नक्षी साकारलेली पहावयास मिळते. अनेक भौमितिक आकाराचे सुंदर मिलाप,  साखळीचे अलंकरण, आष्टकोन, षटकोनाकृती, चौरसाकृतीचा वापर केले आहे. छताकडीव वरील भागावर गोलाकार कड्यांनी कमी कमी होत जाणाऱ्या आत बाहेर येणाऱ्या कड्यांनी सजावट केली आहे. यामुळे स्तंभाची उंची व भव्यता मनाला मोहून घेतल्याशिवाय रहात नाही.मंदिराचे बाह्य बाजूनी नंतरच्या काळात भिंती बांधल्यामुळे बाह्य बाजूवर शिल्प आहेत किंवा नाही हे आज सांगता येत नाही. हे मंदिर त्रिदल पद्धतीचे असल्याने येथे तीन गृभगृहे ब्रम्हा,विष्णू व महेश याचे रुप या मंदिरात आहेत.मंदिराचे शिखर हे करडखेड येथिल मंदिराप्रमाणे सपाट पहावयास मिळतो.मुख्य गर्भगृहावर नंतरच्या काळातील बांधलेला शिखर पहावयास मिळतो.

सभागृहात छानसा नंदी आहे.त्यावरील नक्षीचे झीज झाली आहे. नंदीमंडपावरील छताचे नक्षीकाम खूपच सुंदर आहे. चार कोपऱ्यात व्याघ्रहाचे मुखवटे व बाजूने अलंकारीक नक्षी साकारलेली आहे.योग्य त्या ठिकाणी उठावदार फुले कोरलेली आहेत. भौमितिक आकारांचा वापरातून छताचे काम पुर्ण केले आहे. मुखमंडप हा मंदिराचा देखणा मंडप असतो या ठिकाणीच गर्भगृहाचे प्रवेश द्वार असतो. या प्रवेशद्वारावर स्वागतासाठी तळभागावरील दोन्ही कोपऱ्यात गजलक्ष्मी मुर्तिशिल्पे व चवरीधारक स्त्रीशिल्पे  आहेत. मध्य भागावर अलंकारीक आकाराने सजावट करुन वरील भागावर मेरु पर्वतासारखे उंच निमुळते होत जाणारे शिखरांची रांगा कोरलेली आहेत. गर्भगृहाचे आकार 8×8 फुट असून हे चार स्तंभावर उभारलेला आहे. शिवपिंडाचा आकार जवळजवळ साडेतीन फुट एवढा आहे. गर्भगृहेच्या उत्तर दिशेला पायापासून तीन फुटावर एक सज्जा आहे. या ठिकाणी दिवा अगरबत्ती ठेवले जात असावेत. छताच्या आतील भागावर गोलाकार पाना फुलांच्या आकाराने नक्षीकाम आढळते. मंदिरातील सर्व स्तंभाला कलेचे अज्ञान असल्याने विस्वस्ताकडून नंतरच्या काळात रंगरंगोटी केल्यामुळे मंदिराचे मुळ  अस्तित्व नष्ट झालेले आढळते. खडकेश्वर मंदिरात इतर दोन उपगर्भगृह आहेत याची लांबी रुंद 5.5 फुट ते 4.5 फुट इतकी आहे.विशेष म्हणजे उत्तरेकडील शिवपिंड हे पुर्वेकडे तोंड करुन आहे, असे मंदिर खूपच क्वचित प्रमाणात आढळतात. या उपगृहाचे प्रवेशद्वारावर सुरेख नक्षी पहावयास मिळते. मंदिर परिसरात अनेक भग्नावशेष पहावयास मिळतात. मुळ मंदीराच्या समोर मोठे प्रांगण आहे या प्रांगणात दिपमाळ, मारोती मंदिर व शनिदेवतांचे मंदिर हे नंतरच्या काळात बांधलेले आहे. प्रतिवर्ष खडकेश्वर महादेव मंदिरात सात दिवस अखंड शिवनाम सप्ताहचे आयोजन केले जाते.खडका येथिल आठवडी बाजार शुक्रवारी आसल्यामुळे शनिवारी पहाटे हजारो भाविकांच्या उपस्थितीत रथोत्सव व भस्म उथळण केले जाते. समाप्तीला हजारोच्या संखेने असलेले भाविक भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.



**महादेव शरणप्पा खळुरे**
**(एम.ए.एम एड्, ए.एम.)**
**8796665555**

# सिंधुरत्ने भाग-१ :जुन्या पिढीची नव्याने ओळख


आधुनिक केसरी

**डॉ.बाळकृष्ण लळीत यांचे 'सिंधुरत्ने भाग -१' हे पुस्तक अलिकडेच प्रकाशित झाले. डॉ.लळीत हे पुणे शिरूर येथे चां.ता.बो.रा.महाविद्यालय याठिकाणी मराठी विभाग प्रमुख आहेत. त्यांनी मालवणी भाषा या विषयावर संशोधन करून पि.एच.डि. केली आहे . प्रत्येक माणसाला आपल्या बोलीभाषेवर प्रचंड प्रेम असते. तसे डॉ. लळीत यांचेही त्यांच्या मालवणी या बोलीभाषेवर प्रचंड प्रेम आहे. ते सतत यावर संशोधन करीत असतात. सोशल मिडियावर दक्षिण कोकणच्या आध्यात्मिक शोधात ही लेख मालिका लिहीत असताना त्यांच्या असे लक्षात आले कि,सिंधुदुर्ग भागात अनेक रत्ने जन्माला आली आहेत,काळाच्या ओघात ती आता विस्मृतीत जात आहेत. अशा सिंधुरत्नांना शोधून त्यांची ओळख नव्या पिढीला करून देणे आवश्यक आहे आणि यातूनच सिंधुरत्ने भाग १ या पुस्तकाचा जन्म झाला.**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात साहित्य, कला,संस्कृती, समाजकारण, राजकारण अशा विविध प्रकारात काम करणाऱ्या एवढ्या महनीय व्यक्तींनी जन्म घेतला आहे कि, एका पुस्तकात त्या मावू शकत नाहीत त्यामुळे या लेखांचे सात भागात प्रकाशन करण्याचे शिवधनुष्य त्यांनी उचलले आहे.पहिल्याच भागात त्यांनी तब्बल ४९ व्यक्तींची ओळख करून दिली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अनेक जण शिक्षणासाठी मुंबई, पुण्यात गेले.खुप शिकले आणि सामाजिक कार्यात त्यांनी आपले योगदानही दिले. अशा महनीय व्यक्तींच्या स्मृती जपल्या गेल्या पाहीजेत.यातूनच येणाऱ्या नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, अनेक जणांना आदर्श मिळेल, असे डॉ.लळीत यांना वाटते. या पुस्तकाचे प्रास्ताविक एका वाचकानेच लिहीले आहे हे विशेष आहे.या पुस्तकातील ज्या महनीय व्यक्ती आहेत त्यांची माहिती शोधण्यासाठी डॉ.लळीत यांनी अथक प्रयत्न केले आहेत. अनेक ठिकाणी भेटी दिल्या आहेत. त्यांच्या नातेवाईकांच्या भेटीगाठी केल्या आहेत. आपण ज्या जिल्ह्यात जन्माला आलो त्या जिल्हात अनेक नररत्ने जन्माला आली. त्यांची नव्या पिढीला निदान तोंड ओळख तरी व्हावी या ऊद्देशाने स्वतःची पदरमोड करून त्यांनी केलेला हा प्रयत्न आहे. पुस्तकाच्या सुरूवातीलाच सावंतवाडी संस्थानचे अधिपती पुण्यश्लोक श्रीमंत बापूसाहेब महाराज यांच्या विषयी अतीशय विस्तृत अशी माहिती दिली आहे. मालवणचे मालवणी नटसम्राट मच्छिंद्र कांबळी, चित्रकार आर.के.मालवणकर,कांदबरीकार ग.त्र्य. माडखोलकर, वि.वा.हडप,आरती प्रभू, फ्रेंच भाषा अभ्यासक ना.ग.कालेलकर, मराठी वृत्तपत्राचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर असे अनेकांच्या जीवन चरित्रावर या पुस्तकात त्यांनी प्रकाश टाकला आहे. अनेक लेखांच्या शेवटी काय अपेक्षित आहे हेही नमूद केले आहे. अशा काही महनीय व्यक्तींच्या स्मृती जपल्या गेल्या पाहीजेत हे लेखकांनी आवर्जून सांगीतले आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. या माध्यमातून या स्मृती जपायला काहीच हरकत नाही. अशा व्यक्तींच्या नावे स्मृतीस्थळे, वाचनालये, त्यांच्या वास्तू संवर्धन अशा गोष्टी करून लोकांपर्यंत त्यांच्या कार्याची ओळख करून द्यायला हवी.

प्रभानवल्लीचे राजे प्रभावळकर या लेखात प्रभावळकर यांच्या वंशजांचा शिवकालीन उल्लेख आढळतो. शिवरायांच्या कोकणातील फौजेचे ते एक प्रमुख सरदार होते. त्यांनी कुडाळ जिंकून घेतले आणि तेथेच स्थायिक झाले.आजही प्रभावळकरांचा वाडा आहे. अशा वाड्याचे ऐतिहासिक महत्त्व जाणून संवर्धन करून पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्व ओळखले पाहिजे आणि या प्रभावळकरांच्या ऐतिहासिक नोंदीची ओळख सर्वांना व्हायला हवी या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. पुढील सात भागात अजून बऱ्याच सिंधुरत्नांची ओळख होणार आहे. त्यात कोणीतरी आपल्या गावातलं असेल,कोणीतरी आपल्या बाजूच्या गावातील असेल, न जाणो कोणीतरी आपल्याच घरातील असेल याची उत्सुकता मात्र लागून राहिली आहे. नव्या पिढीने हे वाचायला हवे. हे सात खंड म्हणजे फक्त पुस्तके नसून हे संदर्भ ग्रंथ आहेत हे समजून घ्यायला हवे. आजकाल पुस्तके विकत घेऊन वाचली जात नाहीत अशी ओरड असते पण अशी पुस्तके विकत घेऊन वाचायला हवीत आणि आपल्या संग्रहीही ठेवायला हवीत.

**जयेश अ.माधव, 9167710614**




# चंदेरी दुनियेची सफर- स्ट्रगलर


प्रदीप कडू

आधुनिक केसरी


**झगमगत्या दुनियेमध्ये स्वत:ला सिद्ध करण्यासाठी या कलाकारांनी घेतलेले कष्ट, स्वत:ची कलावंत म्हणून ओळख प्रस्थापित करत असताना आलेले अपमानाचे क्षण, निराशा, झालेले अपेक्षाभंग आणि मग मिळालेल्या एका संधीमुळे पालटलेलं त्यांचं आयुष्य... या साऱ्या गोष्टींचा लेखाजोखा आशिष निनगुरकर यांनी 'स्ट्रगलर' या पुस्तकामधून मांडला आहे.**

चमचमत्या चंदेरी दुनियेचं सर्वांनाच आकर्षण असतं. या चंदेरी दुनियेमध्ये काम करणाऱ्या कलाकारांचं यश सगळ्यांनाच दिसतं, पण त्यामागे ते घेत असलेली मेहनत ही नेहमीच पडद्याआड दडलेली असते. स्ट्रगलप्रत्येकाच्या जीवनातील एक अविभाज्य टप्पा अशी पायरी जी चढल्याशिवाय यशाचा किल्ला सर करणे अशक्यच. काहींना दहावी, बारावीची बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण करणेही एक स्ट्रगल वाटू शकतो, तर आपल्या स्वयंपाकाच्या चवीने पतीराजांना भुरळ घातली पाहिजे, असा प्रेमळ विचारही काही गृहिणींना स्ट्रगलची चव चाखवतो. त्यामुळे स्ट्रगल या शब्दाशी प्रत्येक व्यक्ती आपापल्यापरीने अर्थजोडणी करते. व्यक्तीसापेक्ष असा हा स्ट्रगल काहींना आयुष्याच्या प्रारंभी चकवतो तर काहींना आयुष्यभर. काहींचा स्ट्रगल न संपणारा, अविरत, अविश्रांत तर काहींचा अगदी क्षणभंगुर स्ट्रगल करणाऱ्या स्ट्रगलरचे ग्रह कधी फिरतील, त्याला यशप्राप्तीचा मार्ग गवसेल का, हे सर्वोतोपरी स्ट्रगलरच्या प्रयत्नांवर आणि नियतीवर निर्भर करते. पण, त्यातही हा शब्द बहुदा वाचनात येतो, तो कलाकरांच्या मुलाखतीत. मग ते नाट्यकर्मी असो, मालिकाकर्मी किंवा रुपेरी पडद्यावरील दिग्गज. त्यांचा स्ट्रगल सर्वसामान्यांच्या लेखी एक वेगळीच प्रतिमा उभी करतो. त्यांचा स्ट्रगल इतरांनाही आयुष्याशी झगडा करुन परिस्थितीशी कलेकलेने घेत आपल्या पायावर उभं राहण्याच बळ देतो. मराठी सिनेसृष्टीतील तारे-तारकांचा स्ट्रगलचा कणखर प्रवास आशिष निनगुरकर यांनी 'स्ट्रगलर' या पुस्तकाच्या माध्यमातून उलगडला आहे. स्ट्रगलची प्रत्येकाची आपली अशी एक वेगळीच कहाणी असते. त्यातही सिनेसृष्टीचा विचार केला तर, ऑडिशन, रोलसाठी भटंकती, रिजेक्शन, डिप्रेशन अशा निराशाजनक प्रसंगांना तोंड द्यावे लागते. त्यातून जो तावून-सुलाखून निघतो, त्याचेचे सोने होते. त्यातही घरची परिस्थिती हलाखाची असेल, तर जबाबदाऱ्यांचे ओझेही पेलावे लागते. अभिनेता सिद्धार्थ जाधवचा एक 'स्ट्रगलर' म्हणून प्रवासही असाच म्हणावा लागेल. शालेय जीवनात अभिनयाची स्वप्नं मनात पेरुन अनेक समस्यांचा सामना करत सिद्धार्थने मराठीत एक यशस्वी, मेहनती अभिनेता म्हणून नाव कमावले. पण हे साध्य करण्यासाठी छोटे रोल स्वीकारणे, ''तू दिसायला खराब आहेस, तू अभिनेता होऊ शकत नाहीस', अशा मन खच्ची करणाऱ्या टीकांनाही तो नेटाने सामोरा गेला. प्रयत्नांची पराकाष्ठा, इतर कलाकारांची लाभलेली साथ, कुटुंबाचा आधार आणि प्रेक्षकांच्या प्रेमाच्या जोरावर सिद्धार्थ जाधव आज मराठी सिनेसृष्टीत अव्वल स्थानी आहे. निनगुरकर यांनी अशा स्ट्रगलर्सचा प्रवास वर्णन करताना, त्यांच्या शालेय जीवनापासून ते आयुष्यातील प्रत्येक टप्प्यातील संमिश्र भावनांना वाट मोकळी करुन दिली आहे. प्रत्येक कलाकार कसा घडला, त्यांचे प्रेरणास्थान, कुटुंबीयांचा-मित्र परिवाराचा त्यांच्याकडे बघण्याचा एकूणच दृष्टिकोन अशा स्ट्रगलच्या प्रवासातील प्रत्येक टप्प्याचे लेखकाने सखोल चित्रण केले आहे. भावी कलाकारांचा शाळेतील एकांकिकांपासून ते रंगभूमीचा प्रवास, त्यांच्या आयुष्याला एक कलाकार म्हणून कसा कलाटणी देतो, याचीही प्रचिती हे पुस्तक वाचताना येते. प्रत्येक कलाकार एका वेगळ्या विश्वात जन्मलेला, पण त्यांच्या स्ट्रगलचा प्रवास मात्र समांतर वाटतो. निनगुरकर यांनी कलाकारांच्या भावनांना स्ट्रगलरच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचविण्याचा केलेला हा प्रयत्न खरंच प्रशंसनीय आहे. कारण आज पडद्यावर दिसणाऱ्या यशवंत कलाकारांनीही त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार पाहिले, ज्याची आपल्याला माहिती नसते. त्यामुळे या कलाकारांचा स्ट्रगल वाचल्यानंतर, त्यांच्याविषयीचा आदर, प्रेम निश्चितच वधारते. कलाकारांची पंढरी म्हणजे मुंबईया मुंबईला आत्मसात करण्याचा, तिच्याशी हळूहळू जुळलेल्या संबंधांचाही दाखला स्ट्रगलरचे प्रत्येक पान उलटताना जाणवत राहतो. सुनील बर्वे, मुक्ता बर्वे, पंढरीनाथ कांबळे, शरद पोंक्षे, मकरंद अनासपुरे, भार्गवी चिरमुले, जितेंद्र जोशी, संतोष जुवेकर, क्रांती रेडकर, श्रेयस तळपदे या व अशा एकूण २० अभिनेता-अभिनेत्रींचा स्ट्रगल या प्रवासात उलगडला आहे. लेखनशैलीही अत्यंत सोपी आणि बोलकी आहे. त्यामध्ये कुठेही क्लिष्टपणा, रटाळपणा वाटत नाही. प्रत्येक कलाकाराची मोजक्या शब्दात पण त्यांच्या जीवनप्रवासाचा सर्वांगिण आढावा देणारी स्ट्रगलरची कथा मनाला भावते.

पुस्तक कृष्णधवल जरी असले तरी, कलाकारांचा स्ट्रगल त्यात रंग भरण्याचे पुरेपूर काम करतो. मुखपृष्ठही अगदी सुबक आणि पुस्तकाच्या थिमला अनुसरुन आहे. त्यामुळे आपल्या लाडक्या मराठी सिनेतारकांना जवळून अनुभवण्याची संधी, हे पुस्तक नक्कीच प्रदान करते.या सर्व कलावंतांचा चंदेरी दुनियेतील संघर्ष आणि त्यानंतर बहरलेली त्यांची कारकीर्द याचा वाचनीय मागोवा या पुस्तकात घेण्यात आला आहे. कलावंत कितीही सेलिब्रिटी झाला तरी, त्यासाठी करावा लागलेला स्ट्रगल तो कधीच विसरत नाही. त्याच्या आजच्या यशाला, ग्लॅमरला भुलणाऱ्या सर्वसामान्यांना त्यामागची त्यांची मेहनत, घेतलेले कष्ट निश्चितपणे या पुस्तकातून समजतील.लेखक आशिष निनगुरकर यांनी कलावंताच्या कारकिर्दिचा घेतलेला हा धांडोळा अतिशय रसाळ आहे. त्यामुळे एकदा हातात घेतलेलं पुस्तक, संपूर्ण वाचून झाल्याशिवाय खाली ठेवत नाही.

**प्रदीप कडू**
**(लेखक नाट्य अभिनेते आहेत)**

**स्ट्रगलर लेखक : आशिष निनगुरकर**
**प्रकाशक : प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद,**
**पृष्ठं : १६४,**
**किंमत : २५० रुपये**




# वैचारिक तत्विकता धुळीस मिळाल्याने टिका टिप्पणीचा स्तर खालवला

आधुनिक केसरी


गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

शब्द हे रत्न आहेत अलंकार आहेत.तसच ते शस्त्र पण आहेत आपण कोणता शब्द कुठे कसा आणि कशासाठी वापरतोय त्या नुसार त्याच महत्व अथवा थिल्लरपणा जाणवत असतो. आपण परिपक्व आहेत कि थिल्लर हे आपल्या सुमधुर वाणीतुन बाहेर पडलेल्या शब्दा नुसार ठरत असतं.आणि हे आपण स्वतः सोडता इतरांना समजतं .हे गणित जेव्हा आपल्याला समजेल तेव्हा आपल्या वाणीतून प्रकट होणारा प्रत्येक शब्द प्रभावी व दर्जेदार बाहेर पडेल . आपल्या वाणीतून प्रकट होणारा प्रत्येक शब्द तोलामोलाचा आणि दर्जेदार,व प्रभावी बाहेर पडणं अपेक्षित असेल तर आपलं आचरण चरित्र आणि शब्द याचा त्रिवेणी संगम झाला पाहिजे हा संगम झाल्याखेरीज आपली वाणी प्रभावी होणार नाही. पण वाणी प्रभावी करण्या ऐवजी सध्या ती अपवित्र कशी होईल यासाठीच आपण जास्त प्रयत्न करतोय.वैचारीक तात्विकता आज धुळीस मिळाली आहे.याचा परिणाम स्वरूप टिका टिपणीचा स्तर एवढा खालवला आहे.हि ऐकणारा काणावर बोट ठेवत आहे.पण बोलणारा हे समजायला तयार नाही. रेडयांची टक्कर लागल्यावर जसे ते बेधुंद होऊन कोणाचे तरी शिंग मोडल्या शिवाय थांबत नाहीत तसं शब्दांच झालं आहे. आपल्या पवित्र अशा वाणीतुन बाहेर पडणारा प्रत्येक शब्द तोलामोलाचा आणि विचार पुर्वक असला पाहिजे.वाणी हि पवित्र असली पाहिजे.आपली वाणी अपवित्र होणार नाही याची काळजी दक्षाता आपण घेतलीच पाहिजे.पण सहसा असं होतं नाही. आति घाई संकटात नेई त्या प्रमाणे मानवी मनाची अवस्था विद्यमान स्थितीत झाली आहे. आरे ला कारे म्हणजे ज्ञान नाही . इतरांच मत आपण समजून घेण्यासाठी ऐकतोय कि उत्तर देण्यासाठी ऐकतोय हेच गुह्य समजायला तयार नाही.मुळात आपल्या कानावर पडणारा प्रत्येक शब्द हा आपणं प्रथम समजुन घेतला पाहिजे . समजुन घेण जास्त गरजेच आहे.उतर देणं हे फार आवश्यक अथवा महत्वपूर्ण नाही.पण आपण समजुन घेण्या ऐवजी उत्तर देण्यासाठी आतुर असतो .याचा अर्थ काय तर खरया अर्थाने आपण कोणत्याही पातळीवर परिपक्व नाहीत.पण आपण स्वतः परिपक्व नाहीत हि बाब इतरांना जाणवली वाटली तरी हेच सत्य आपल्या मनाला कोणत्याही परिस्थितीत पटणार नाही.मग उपयोग तो काय आणि कसा काल आपण ज्यांचा भौतिक दर्जा पाहुण मोठी माणसं समजतो हिच मोठी माणसं अगदी शाळेतील मुलं बोलतात त्या प्रमाणे सार्वजनिक पातळीवर बोलतात मग हि निव्वळ करमणूक होत आहे. पण या मधून आदर्श तो काय घेणार.सार्वजनिक पातळीवर विचार व्यक्त होत असताना या विचारांना एक दर्जा असला पाहिजे.हाच विचारांचा दर्जा अनेक पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरत असतो . विचार कोणाचे आहेत हे विचारानुसार ठरत .मत मतांतर असलीच पाहिजे असणं गरजेचं आहे पण हि मत मतांतर व्यक्त होताना तत्विकता धुळीस मिसळता कामा नये. मुळात व्यक्तिगत पातळीवर असो कि सार्वजनिक पातळीवर पण बोलण्या अगोदर अनेकदा विचार करणं गरजेचं आहे.आणि जर इतरांच्या मतांवर मत व्यक्त करयाच असेल तर मग अगोदर ते मत समजण्यासाठी ऐकलं पाहिजे . प्रतिक्रिया देण्यासाठी ऐकलं तर मग वैचारिकता तात्त्विकता यांचा कुठेही काही ही दुर दुर पर्यंत संबंध येणार नाही. क्रिया आणि प्रतिक्रिया ह्या परस्पर विरोधी घटना घडामोडी आहेत. पण वैचारिक स्तरावर जेव्हा प्रतिक्रिया हि बाब येते . तेव्हा शब्द हे रत्न असावेत. विवेक सारथी असावा .निती न्याय धर्म सदाचार संस्कार हे सहयोगी असतील तर आपल्या वाणीचा स्तर हा कधीच खालवणार नाही.

# सुट्याचा सुकाळ



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**एप्रिल महिन्यात सगळ्या ब्यांकस किती दिवस बंद राहणार याच्या देखील सारख्या बातम्या आल्या.काम कमी सुट्याच जास्त अशी आपल्या देशाची परिस्थिती आहे. कुणालाही प्रश्न पडेल. आपला देश विस्ताराने,लोकसंख्येने,एव्हढा मोठा तरी स्वातंत्र्य नंतर ७५वर्षे झाली तरी आपण प्रगत नव्हे तर प्रगती शील म्हणवले जातो. जपान, सिंगापूर, मलेशिया, नेदरल्यांड, हे छोटे देश तांत्रिक, उद्योगिक, शैक्षणिक अशासर्वच क्षेत्रात आपल्याकिती तरी पुढे! आपल्या सरकारी कार्यालयात वर्षाला कितीदिवसकाम होते? कितीदिवस सुट्या असतात? हिशेब केलातर डोळेपांढरे होतील! ३६५ दिवसा पैकी २०४ दिवस सरकारी सुट्या असतात. हे आकडे आधी वृत्त पत्रात प्रसिध्द झाले आहेत.**

म्हणजे फक्त १६१ दिवस सरकारी कर्मचारी काम करतात. यावरून सरकारी कामकाजाच्या गतीचा अंदाज येऊ शकतो. ( शनिवार, रविवार, सणवार, जयंत्या, पुण्यतिथी, आकस्मिक रजा, क्याजुअल लिव्ह, अर्न लिव्ह, मेडिकल लिव्ह सगळे गृहित धरा! ). वेगवेगळ्या समाज घटकांना खुश करण्या साठी विविध सरकार आकस्मिक सुट्या जाहीर करतात. अनेकांना या रजेचा उपयोग नसतो. गरज नसते. फक्त आळस वाढतो. कामाचा उत्साह कमी होतो. आम्हाला नोकऱ्या मिळत नाहीत असा ओरडा करणाऱ्याना या सरकारी नोकऱ्या च अभिप्रेत असतात. कारण इथे काम केले काय न केले काय,एक तारखेला पगार मिळतोच. तुम्ही कितीही बेशिस्त वागला तरी सरकारी नोकरीतून बडतर्फ होणे कठीण असते. कारण ती प्रक्रिया कायद्याच्या चौकटीत बंदिस्त, लांब लचक वेळखाऊ असते. खाजगी क्षेत्रात असे लाड चालत नाहीत.इतक्या सुट्या नसतात. दर महा कामाचा लेखी हिशेब द्यावा लागतो. प्रगतीची नोंद होते.लेखी रिपोर्ट बंधन कारक असतो. म्हणून आळशी, कामचुकार मंडळींचा कल सरकारी नोकरी कडेच असतो. नोकऱ्या नाहीत हे अर्ध सत्य आहे. ज्यांच्या जवळ, अर्हता, शिक्षण, कौशल्य, नवे शिकण्याची जिद्द आहे त्यांच्या साठी भरपूर संधी आहेत. आजकाल आपण अनेक मोर्चे, आंदोलने,धरणे, निषेध सभा बघतो. तिथली प्रचंड गर्दी ( यात स्त्री, पुरुष, छोटे, मोठे सारेच असतात ) बघून प्रश्न पडतो, की यांना काही काम धंदा आहे की नाही ? घरी,कार्यालयात यांची गरज आहे की नाही ? हे असे मोकाट कसे काय फिरू शकतात ? मंत्री, पुढारी यांच्या आजू बाजूची गर्दी बघा! ही मंडळी रिकामटेकडी कशी ? यांना भविष्याची,पोटा पाण्याची चिंता नाही का ? याचे घर, उदर निर्वाह सारे कसे चालते ? आपला देश सुट्या चा देश म्हणायचा का ? सुट्या अन् जागोजागी गल्ली बोळात उभारले गेलेले, रहदारीला बाधा ठरणारे पुतळे, या बाबतीत आपण गिनीज बुकऑफ रेकॉर्ड नोंदवायला हरकत नाही! सरकारी कार्यालयात कर्मचारी, अधिकारी खुर्चीवर कमी बाहेर जास्त असेच चित्र दिसते. चाय पिने गये, लंच टाईम है, मीटिंग मे है ही उडवा उडवी ची उत्तर ठरलेली.ब्यांकेत साधा ड्राफ्ट, एफ डी काढायचे म्हंटले तर अर्धा पाऊण तास लागतो. आपण पैसे जमा करून खरे तर ब्यांकेवर उपकार करीत असतो.पण गरज त्यांची नाही तुमची आहे असे मग्रुरी चे वर्तन अनुभवायला मिळते. अगदी ज्येष्ठ नागरिकांना देखील ताटकळत ठेवले जाते. त्रास दिला जातो. अपमानास्पद वागणूक मिळते! निर्णय घेणाऱ्या फायलीचा प्रवास हा स्लो गाडी सारखा धीमे गतीने चालतो. पुढे एखादा रेड सिग्नल असला की मागच्या साऱ्या गाड्या खोळंबतात, तशी स्थिती. बहुतेक कार्यालयात टेबल फायली च्या ढिगाऱ्या ने भरले असते.

राज्याचा, देशाचा गाडा नीट चालायचा तर निर्णय वेळच्या वेळी घे गरजेचे असते. जस्टिस डीलेड इजजस्टिस डीनाईड असे म्हणतात. या दिरंगाईमुळे सरकारचे आर्थिक नुकसान होते. प्रगतीला खीळ बसते. ज्यांचे काम असते त्यांना प्रचंड मानसिक,आर्थिक त्रास सहन करावा लागतो. सरकार अनेक कल्याण कारी प्रोजेक्ट राबवीत असते. पण त्याचे किती लाभ किती जणांना वेळेवर मिळतो ? दिरांगाईने किती नुकसान होते ? सरकारचेच नव्हे आपले देखील! मागे एका माजी पंतप्रधान यांनीच कबूल केले की सरकार शंभर रुपये खर्च करते त्यातले



दहा च रुपये गरजू व्यक्ती पर्यंत पोहोचतात!लोक कुठे कसा पैसा खातील नेम नाही. अगदी करोना काळातील भ्रष्टाचार, डॉकटर, कंत्राटदार यांची लूट आता मीडिया मुळे बाहेर येते आहे.पण गेंड्याची कातडी असलेल्यांना, प्रेताच्या टाळू वरचे लोणी चाटणार्यांना काही फरक पडत नाही हा भाग वेगळा! किती तरी घोटाळे या देशाने पचविले, काही विस्मृतीत देखील गेले.कुणाला काय फरक पडतो ? प्रत्येक ठिकाणी दिरंगाई, बेजबाबदारी, अप्रामाणिकपणा यामुळे आपण मागे पडतो जगाच्या स्पर्धेत, हे कुणाच्या लक्षात येत नाही.एकट्या पंतप्रधानाने वीस तास काम करून चालणार नाही.निवडक प्रामाणिक अधिकाऱ्याची,कर्मचाऱ्याची उदाहरणे पुरेशी नाहीत. सर्वांनी आपापली जबाबदारी ओळखली पाहिजे.

सरकारी पगार आता कमी नाहीत. नवे पे कमिशन आल्यापासून चंगळ आहे. डी ए सारखा वाढतोच आहे. भरपूर सुट्या, सवलती ,मेडिकल मदत असे बरेच लाभ असूनही कामाच्या बाबतीत मात्र उत्साह नाही याचे आश्चर्य वाटते.उद्या या हे ठरलेले सरकारी उत्तर. मग उद्या सुटी असते, हवा तो कर्मचारीच जागेवर नसतो.

आपण जेव्हढे प्रेम आपल्या घरावर, आपल्या माणसांवर,स्वतःवर करतो तेव्हढेच प्रेम आपल्या कामावर केले तर सर्व प्रश्न सुटतील.सुट्या कमी करण्यासाठी आपणच का प्रयत्न करू नयेत.अनेक देशात फारच कमी सरकारी सुट्या असतात.काम नसतांना घरी बसण्यापेक्षा हवे तेव्हा गरजे प्रमाणे मर्यादित सुट्या घेण्याचे स्वातंत्र्य हवे.सगळेच सण सरच साजरे करीत नाहीत.ज्यांना गरज आहे त्यांनी रजा घ्यावी. म्हणजे निदान कार्यालये बंद राहणार नाहीत.कामकाज चालेल. लोकाची गैरसोय होणार नाही.जयंत्या,पुण्य तिथी कोण मनवतात.कार्यालय सुरू ठेवून देखील आदर,भवांजली अर्पिता येते. त्यासाठी संपूर्ण दिवस सुटीची,घरी लोळत बसण्याची गरज नाही.विद्यार्थी वर्गात नसणे,शिक्षक,प्राध्यापक कामावर नसणे,कार्यालयातील खुर्च्या रिकाम्या असणे, आफिसला कुलूप असणे हे मानसिक,सामाजिक आजाराचे लक्षण आहे. एकही दिवस शाळेत गैरहजर नसणाऱ्या विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार करतात! ते खरेच कौतुकास्पद.. प्रगत,समृद्ध,आनंदी देशातला प्रत्येक जण सुसह्य जीवन जगण्याला लायक असतो.तो त्याचा अधिकार असतो.तरुणांनी पुढाऱ्यांच्या नादी लागून फालतू चळवळीत भाग घेण्या पेक्षा,वेळेचा अपव्यय करण्या पेक्षा स्वताहून काही विधायक काम केले पाहिजे. ग्रेटा थुंबर्ग या शालेय विद्यार्थिनीने पर्यावरणासाठी जागतिक चळवळ उभारली. आपल्या देशातील विधायक,सृजनशील काम करू इच्छिणाऱ्या मुलांनी सुट्या कमी करण्यासाठी चळवळ का उभारू नये ?तसे झाले तर आपल्या देशाची प्रगत देशात गणना होईल.

# स्व. शंकर पाटील : स्मृतींचा दरवळ !

आधुनिक केसरी

**माझे वडील शंकरराव लक्ष्मणराव पाटील यांचा आज ९ एप्रिल रोजी २४ वा स्मृतिदिन आहे. बाबांच्या स्मृतींचा दरवळ आजही ताजा आहे. गाजर गवताची ॲलर्जी होण्याचे निमित्त झाले. सर्व प्रकारचे उपचार करूनही यश आले नाही. वास्तविक बाबा शरीराने सडपातळ, काटक. धोतर, सदरा आणि पांढरा फेटा असा त्यांचा पेहराव. मनाने निर्मळ, स्वभावाने गरम! चारित्र्यसंपन्न, सत्यवादी आणि श्रमजीवी.**

स्वच्छता आणि टापटीप ठेवण्यास महत्त्व. स्वतःचे काम स्वतः करण्यावर भर. माझी आंघोळ घालणे, कपडे धुणे,हातपाय घासणे हेही वडिलांचेच काम! स्वतःचे कपडे सनलाईट साबणाने धुवून निळ घातलेल्या पाण्यातून काढून पांढरेशुभ्र ठेवत. जेवताना ते कधीच पाणी पीत नसत. दीड ते दोन तासानंतर तपेले भरून पाणी पीत. ताक हा त्यांच्या आवडीचा विषय. महानुभाव पंथाचे उपासक असल्याने अर्थातच मद्य, मांसाहार पूर्णपणे वर्ज्य. एकच बाजू नकारात्मक होती. ती म्हणजे, बाबा लालउंट बिडी ओढत. पुढे तीसुद्धा माझ्या आग्रहामुळे बंद झाली होती. बाबा सातवीपर्यंत शिकलेले. पोलिसाची नोकरी नाकारली होती. तेव्हा नोकरी कनिष्ठ मानली जात होती! अक्षर वळणदार. सुबक शब्द हा जणू त्यांच्या अक्षरगौरवासाठीच निर्माण केला असावा. उर्दू, मोडी, मराठी आणि नंतरच्या काळात त्यांनी इंग्रजीही अवगत केली होती! पाच भावांचे कुटुंब. पहिल्या आईचे दोघे आणि दुसऱ्या आईचे तिघे अपत्य होते. खरे तर असे लिहिणे हा त्या पाच पांडवांवर घोर अन्याय ठरेल. कारण ते अत्यंत एकजीव होते. कृष्णा, गोपाळा,भीम, अर्जुन आणि शंकर या क्रमाने जन्मास आलेली ती भावंडं होती. त्यांच्या नावावर एक नजर फिरवली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बोध होऊ शकतो. असे बंधुप्रेम रामायण - महाभारतातच पाहायला मिळू शकेल. आमच्या आजोबांचे नावही लक्ष्मण आणि पंजोबाचे गोविंद! आमचा हा तत्कालीन परिवार म्हणजे जणू गोकुळच ! माझे वडील वयाने सर्वांमध्ये लहान असले तरी शिक्षणामुळे त्यांना वेगळे महत्त्व होते. तो काळ काँग्रेस पक्षाचा होता. आमचे चुलत चुलते आणि भोकरदन तालुक्यातील पहिले जीप, ट्रक, ट्रॅक्टर ही वाहनं असलेले तालुक्याचे वैभव स्व. आवडाजी पाटील यांच्यासोबत काँग्रेसचे काम करीत. गाय वासरू या चिन्हाचा ते प्रचार करीत असे. स्व. माणिक दादा पालोदकर यांचे ते सहकारी होते. त्याकाळी काही जणांना त्यांनी सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यात रोजगारही मिळवून दिलेला आहे. पक्षनिष्ठ, परंतु



केवळ निवडणूकीपुरताच राजकारणाशी संबंध ठेवत. राजकारणाचा वैयक्तिक लाभ घेतल्याचे एकही उदाहरण सांगता येणार नाही. पत्रव्यवहार असो की लग्नपत्रिका वडील स्वहस्ते लिहीत. सातबारा, फेर, कर्ज व्यवहार,पत्रवाचन, ग्रंथवाचन, मुला-मुलींचे शिक्षण याबाबत बाबांचे मार्गदर्शन अंतिम असे. आमच्या एकूण सर्व बहिणी - भावांच्या सोयरीकी बाबाच करीत. आपला पती किंवा पत्नी थेट लग्न मंडपातच पहिल्यांदा पाहायला मिळे! रास, नाडी, गुण, गुरु जुळण्याच्या भानगडीत ते कधीच पडले नाहीत. कुटुंबाचे वळण आणि संस्कार पाहिला जात होता. त्यामुळे सर्वांचे संसार सुखाचे झाले आहेत. पुढील काळात कुटुंबविस्तार अधिक वाढल्याने विभक्तीकरण झाले. परंतु कोणत्याही पाहुण्याला वेगळेपणाचा अनुभव आला नाही. एवढे प्रेम सर्व भावंडांमध्ये होते. शेती वेगळी असली तरी विहिरींवर आळीपाळीने मोटा चालत. डौलदार ऊस, गुराळ, कांदे, मेथी, लसणाचे वाफे, गुरंढोरं, दूधदुभतं असं एकूण गोकुळ सजलेलं होतं... महानुभाव पंथांचे दीडशे दोनशे साधू महंतांचे मार्ग शेतात उतरत असत. आमराई आणि उसाच्या थंडगार मळ्याजवळील रिकाम्या शेतात जणू साक्षात स्वर्गच अवतरला की काय असे चित्र होते. त्या पिढीत प्रत्येकाचा मानसन्मान जपला जात होता. सखे आणि चुलत असे शब्द देखील वापरणे ओशाळल्यासारखे वाटे. महिलांचा आदर होता परंतु आदरयुक्त भीती देखील जाणवत होती. सर्व लहान चुलत्या, सुना,पोरी डोक्यावर पदर असल्याशिवाय कधी समोर येत नव्हत्या. मोठ्या चुलत्याच्या हवेली समोरून जाताना पायातील वाहना काढलेल्या असत. आम्हाला तर बाबा किंवा मोठ्या बाबांसमोर आरशात पाहणे, भांग पाडणे लपून करावे लागे! त्याकाळी जसे संध्याकाळी गाईगावर सुटल्यावर ( म्हणजे मुलांची शाळा सुटते तसे! ) गाई वासरे बरोबर आपापल्या घरी जात. तसेच सर्व मुलांनाही वेळेत घरी जावं लागत होतं. तो काळ खुळखुळत्या पैशांचा नसला तरी निखळ आनंदाचा मात्र होता. आज मजुराजवळ एक लाख असू शकतात. तेव्हा दहा पाच खेड्यात एखाद्याकडे तेवढे पैसे असत. माझ्या शिक्षणासाठी बाबांची खूप आर्थिक ओढताण झाली होती. त्यांचे कष्ट आणि उत्तरआयुष्यातील आर्थिक टंचाई आठवली तर आजही माझे डोळे ओले होतात. परिस्थिती कितीही बिकट आली तरी वडिलांनी धैर्य सोडले नाही. नीतिमत्तेशी तडजोड केली नाही. सत्य,श्रम आणि इमानदारी सोडू नकोस असा कायम उपदेश माझ्या वडिलांनी केलेला आहे. मी ज्या पत्रकारिता क्षेत्रात काम केले तेथे आणि एकूण जीवनात माझा पाय वाकडा पडू दिलेला नाही. मी माझ्या नजरेत कसा आहे हे महत्त्वाचे मानतो. वडिलांनाही तेच अपेक्षित आणि अभिप्रेत होते. माझी दोन्ही मुलं आणि परिवार आई-बाबांच्याच आशीर्वादाने सुस्थीत आहे. एक प्राध्यापक आणि दुसरा आर्किटेक्ट झाला. दोघेही सुपारीदेखील खात नाहीत. खरे तर श्रद्धा, आठवण या हृदयात असल्या पाहिजेत. त्यासाठी कोणतेही भौतिक अवडंबर अथवा दांभिकपणा मी कधीच करत नाही. मी अनेकदा ठरवून बाबांची आठवण काढत असतो. त्यासाठी त्यांचा फोटो मला लागत नाही. लागतो तो एकांत... त्या एकांतात आजही मी बाबांना भेटतो... बोलतो... मिठी मारतो... पायावर डोकं टेकवतो... त्यांचे हातपाय विशेषतः गुडघे चेपतो... मला त्यांचा स्पर्श जाणवतो... त्यांचा आणि त्यांच्या श्वासाचा गंध मी अनुभवतो... बाबांनी माझ्या मांडीवरच जीव सोडलेला आहे. सर्वात आधी तळपाय थंड पडले... हळूहळू छातीचे ठोके कमी होत गेले... तेही थांबले... डोक्याच्या कानानजीकच्या नसा मंद सुरूच होत्या...त्याही थांबल्या... हलकासा अखेरचा श्वास मुखावाटे बाहेर पडला आणि तोंड मिटले गेले... बाबा अखेरच्या प्रवासास निघाले होते.... हुंदका फुटला.... तो क्षण कसा विसरणार ? अखेरच्या वेळी त्यांना मला बिलगावे वाटत होते...पण अंगात शक्ती नव्हती... हा प्रसंग डोळ्यात आणि तनामनात तरळतो तेव्हा डोळ्यांना पूर येतो.... आणि मी खऱ्या अर्थाने मोकळा होतो. म्हणूनच मी कधीच लिहीत नाही की "असा एकही क्षण जात नाही की तुमची आठवण येत नाही" मी ठरवून आठवण काढत असतो. सृष्टीजनक ईश्वरास आर्जव करतो की, माझे बाबा जिथे कुठे असतील तेथे त्यांना आनंदी ठेव! आई, वडील आणि अपत्य एकजीव असले पाहिजे. पालक म्हणून आणि अपत्य म्हणून लौकिक जीवनातील कर्तव्य पार पाडणे, इतकाच या नात्याचा अर्थ आहे असे मी मानत नाही. पालक आणि मुलांना हवे असते खरेखुरे प्रेम! आई वडील आयुष्यात मुलांसाठी काय करतात हे अजिबात महत्त्वाचे नाही. ते जन्मापासून किमान पाच वर्षापर्यंत आपल्या बाळासाठी काय करतात, किती प्रेम करतात, मलमूत्र स्वच्छ करतात ते महत्त्वाचे आहे. आई-वडिलांसाठीही मुलांनी आयुष्यात फार काही नाही केले तरी चालेल,पण त्यांच्या वृद्धापकाळातील अखेरच्या पाच वर्षात स्वतःच्या बालपणीच्या पाच वर्षातील परतफेड करायला पाहिजे. कारण वृद्धापकाळ हेही एक बालपणच असतं.....!


# पोलिसांच्या मदतीने ३९ हजार रुपये मिळाले परत

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील रांजणी येथील दिपक देवकर यांचे ३९ हजार त्यांच्या फोन पे वरून त्यांच्या बंधुना पाठवतांना नंबर मीस्टीक होऊन एका दुसऱ्याच व्यक्तीला ३९०००रू रक्कम सेंड झाले. चुकीने फोन पे केलेले पैसे परत मिळवण्यासाठी समोरील व्यक्तीला अनेक फोन केले, तसेच बँकेला संपर्क केला. परंतू सदर व्यक्ती पैसे देत नव्हता. यानंतर त्यासमोरील व्यक्तिने फोनसुध्दा बंद करून टाकला. ही सर्व घडामोड झाल्यावर दीपक देवकर यांनी सायबर पोर्टलवर घनसावंगी पोस्टे येथे समोरील व्यक्तींवर तक्रार दाखल केली होती. पोलीस निरीक्षक महाजन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सदर तक्रारीची चौकशी पो. ना. १४०१ गायके सर यांच्याकडे आली. त्यांनतर पोलीस गायके सर यांनी सदर व्यक्तीला त्याचे फोनवर फोन केला परंतू त्यांने बंद केला होता. परंतू काल त्यांने त्याचा फोन सूरू केला. यावेळी वारंवार फोन केला मात्र उचलला नाही. शेवटी त्यांच्या वाट्स्अप वर पोलीसी भाषेत मेसेज केला यावेळी प्रकरणाचे गांभिर्य ओळखून सदर व्यक्तीचे पैसे परत करण्यात यावेत आणि सदर व्यक्तीने १२ तासाच्यात दीपक देवकर यांचे ३९ हजार मिळाले परत केले.



## मनामधी भरलया



मनामधी भरलया
तुझ्या संग ठरलया
तुझ्या माझ्या संगतीची
वाट वळलीया
जीवनाचे मूळं झालो
तुझ्या रक्षणाच कुरण झालो
तुझ्या प्रेमात खूळा झालोया
पंखांची उडान झालो
चोचीतला दान झालो
तुझ्यावर जीव हा उदार केलाया
तुझ्या माझ्या संगतीची वाट
वळलीया
बासरितला सूर झालो
खडकावरचं फूल झालो
तुझ्या गालावरचा हसू झालोया
तुझ्या माझ्या संगतीची वाट
वळलीया
संसाराच्या आडवळणावरती
झेलली संकट तुझ्यावरची
तुझ्यासाठी वेदना आत
खोडल्याया
तुझ्या आनंदाला मोहर आलाया
मनामधील भरलया
तुझ्या संग ठरलया
एकमेकांच्या संगतीची वाट
वळलीया
-लक्ष्मण वाल्डे
कन्नड जि.संभाजीनगर

## भेटलेली माणसे !

आयुष्याच्या वाटेवर
अनेक माणसे भेटतात,
काही सोबत असतात तर
काही मध्येच साथ सोडतात
भेटलेली माणसे ही
सगळीच आपली नसतात,
आणि काही आपली असुनही
परक्यासारखी वागतात
काही सुखात सोबत असतात
तर काही दुःखात साथ देतात,
आणि काही माणसे फक्त
स्वार्थासाठी जवळ येतात
स्वार्थासाठी जवळ आलेली
माणसे जास्त काळ सोबत रहात
नाही काम झाल्यावर ही माणसे
नंतर ओळखही देत नाही
काही माणसे मात्र चांगलाच
धडा शिकवुन जातात जीवन
जगण्याचे अनुभव
यातुनच आम्हाला मिळतात
काही माणसे परकी असुनही
नेहमी सोबत असतात,
हीच माणसे मात्र
खरी आपली माणसं असतात
जीवनात अशा माणसांना
जपता आलं पाहीजे,
सुख असो वा दुःख
यांची खंबीर साथ हवी असते
आयुष्याच्या वाटेवर भेटलेली
माणसे ओळखता आली पाहीजे
कोण आपलं आणि कोण परकं
यांचीही ओळख असली पाहीजे

कु. ऋतुजा दीपक मगर
इयत्ता दहावी
शिक्षण महर्षी स्व. के. के. जाधव
सर मा. वि. कन्नड

## !! कितीदा... !!

वाटा चुकून गेल्या रस्त्यातल्या कितीदा
त्यांना दिशा मिळाल्या वस्तीतल्या कितीदा

येथे उनाड वारे वेगात वाहते रे,
उडवून नेत रेषा हातातल्या कितीदा.

आता कुठून आले हे सांत्वनांचे लोंढे
आल्या निवडणुका या देशातल्या कितीदा.


शोधात रोज आहे भाकरीच्याच सारे
जाळी भुका तयांना पोटातल्या कितीदा

आश्वासने तयांनी देवून टाकलेली
झाल्यात धूळफेकी डोळ्यातल्या कितीदा.

एकात्मताच येथे वैधव्य भोगते का ?
वाटाच वेढलेल्या प्रांतातल्या कितीदा

आव्हान पेललेले उच्चांक गाठलेले,
भरकटल्या दिशा या देशातल्या कितीदा

- संजय बिडगर नाशिक



## कार्तिक हा कोरडा

परी अप्सरांनी जग असेल सजला
असेल रंगबीरंगी फुलांनी मंच रंगला
मी हृदयात माझ्या कृष्ण कमळ
कोंडला घेरा मजसाठी साक्षात
मोहिनिने मांडला
एकटक बघावी सुंदरता की हा चेहरा
की भिडवाव्या तुझ्या नि माझ्या नजरा
बेभान होतो मी सुध्दा अंतर्बाह्य सारा
जेव्हा घेवून येतो भास तुझा, हा वारा
तुझ्या सहवासात बासरीचा गोडवा
स्पर्शात तुझ्या रेशमाचा गारवा
श्वासात तुझ्या वादळाचा हा इशारा
बघ, अंगावर माझ्या उमटूनी येतो
शहारा प्रेमात तुझ्या पंखाविना मुक्त
उडावे जणू फांदीवरूनी पान अलगद
गळावे
कुशीत तुझ्या त्रिकालांचे विस्मरण
पडावे जणू देवण्येच्या शेजारी
नारायण असावे
अंतराची किती ही दाटून गर्दी
कळी माखली ह्या गुलाबी सर्दी
गंध मोहक तुझा करी कृष्ण तो वेडा
बघ भर पावसात कार्तिक हा कोरडा

- अमोल सोनाजी मोकासे.
9730781775

## ही वाट चांदण्यातली

ही वाट चांदण्यातली शोधायची तुला, अन धूळ आरशातली सारायची तुला
तू खूप लावतो तरू बांधावरी उभ्या, जी सैरभैर ती पिढी पोसायची तुला
गरजा नको अती कधी, राहायचे सुखी, इज्जतच माणसातली कमवायची तुला
दावू नकोस गर्व रे,माझ्या तुझ्या घरी, ही गोष्ट आपसातली कळवायची तुला
ती लाच कागदातली पुरणार जन्मभर ? किंमत तुझी अशी इथे गमवायची तुला
काळीज चोरण्या तुझे आली कधी सखी, ती बात या मनातली बोलायची तुला
वाटेत पेरतील ते काटेकुटे जरी, सारून अडथळे फुले उधळायची तुला

- रज्जाक शेख, श्रीरामपूर



## चैतन्य

दाटे मनी मळभ काळोख
दृश्य होता औदासिन्य
मिटवुनी मळभ होऊनी सुलभ
जीवनी फुलू द्यावे चैतन्य
जाणवते संथता गतीची
बोचते विदारक दैन्य
वृद्धूनी गती, निर्दालूनी भीती
जीवनी फुलू द्यावे चैतन्य
भासे क्षती विश्वासाची
निरसे देखणे लावण्य
समृद्धावा तीव्र विश्वास
जीवनी फुलू द्यावे चैतन्य
नासे नीती मानवतेची
लोपे मानव दक्षिण्य
लांघूनी भिंती भेदाच्या
जीवनी फुलू द्यावे चैतन्य
वाढे झूल परंपरेची
दमन पावे नावीन्य
कास धरुनी नूतनतेची
जीवनी फुल द्यावे चैतन्य
फुटे पेव मूढजणांचे
मत त्यांचे जनमान्य
अंगीकारुनी सद्विवेक
जीवनी फुल द्यावे चैतन्य

- मनोज शोभाबाई प्रकाश
अग्रवाल



## माझ्या मित्राचं प्रेम

माझ्या भोळ्या मैतराला
।
विंचू प्रेमाचा चावला ॥
झाला पोरीवर फिदा ।
बेट्या तिच्यावं भाळला
॥धृ॥
वेड तिचेच लागले ।
पडे तिचेच सपानं ॥
गेला गुंतून तिच्यात ।
अनं हरपले भान ॥1॥
प्रेमासाठी मग म्हणे ।
द्याना लावून सेटिंग ॥
झालो वेडा तिच्यातच ।
आणि खरा रिंगटिंग ॥2॥
सदा नजर शून्यात ।
गेले हरवूनी ध्यान ॥
तिचा होकार ऐकण्या ।
माझे आतुरले कान
॥3॥
फिरे तिच्या मागेमागे ।
अवखळ सांडावाणी ॥
बघा बनवतो म्हणे ।
तिला माझीच मी राणी ॥4॥
असं म्हणून एकदा ।
त्याने प्रपोज मारला ॥
मला आवडते तु गं ।
देना लव्हशिप मला
॥5॥
मग हात तिचा असा ।
त्याच्या गालात बसला ॥
अनं तिथंच प्रेमाचा ।
सारा चक्काचुर झाला ॥6॥


- कवीराज : मनिष आहिरे
सटाणा नाशिक
7588069679

## वासुदेव ...!

टाळ वाजवित
वासुदेव आला,
गळ्यात गुंफुनी
कवड्यांच्या माला.
वासुदेव नाम
हरीचे बोलतो,
सकाळी-सकाळी
अंगणी डोलतो.
मधूर गळ्याने
ओवी गोड गातो,
सगळ्यांचे लक्ष
तो वेधुन घेतो.
मोरांच्या पिसाचा
टोप डोईवरी,
पायी घुंगराने
मस्त नाच करी.
पसा-पसा दाणे
झोळीमध्ये घेतो,
साऱ्या लेकरांना
आशिर्वाद देता.
- अय्युब पठाण
लोहगांवकर,
मो.
९७६४३५०३७४.



टूट चूका हूँ बिखरना बांकी है,
बचे कुछ एहसास जिनका जाना बांकी है ,
चंद सांसें है जिनका आना बांकी है,
मौत रोज मेरे सिरहाने खड़ी हो पूछती है
भाई आ जा, अब क्या देखना बांकी है ।



## कदर करावी

कदर करावी थोडी तरी
समाजकार्य करणाऱ्यांची
जगतात कसे ते समाजासाठी
निंदा, चुगली करु नका त्यांची
कदर करावी बळीराजाची
पोसत कसा आहे तो जगाला
आपुलकीने कष्ट जाणावे त्याचे
भाव द्यावे त्याच्या मालाला
कदर करावी सैनिकांची
सीमेवर ते आजही लढत आहेत
त्यांचे कुटुंब आहेत गावात
कोणाची आईबाबा रडत आहेत
कदर करावी महापुरुषांची
त्यांचे योगदान जाणावे
ते जगले आम्हां सर्वासाठी
त्यांना एकदातरी वाचावे
कदर करावी त्या निसर्गाची
त्याने झाडांची निर्मिती केली आहे
प्राणवायू मिळतो फुकटात
त्यांना वाचवणे आपली जबाबदारी आहे
सौ. संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा, जि. गडचिरोली
७८२१८१६४८५



## गोड परी

माझ्या स्वप्नांत आली
एक गोड परी
अन् मला म्हणाली
चल माझ्या घरी...

अलगद उचलून तिनं
कुशीत घेतलं मला
चंदेरी रथ तिचा
होता बसायला...

चंदेरी रथ तिचा
वेगवेगे धावला
परीच्या घरापुढे
एकदाचा थांबला...

ढगांतून चांदण्यातून
रथ होता पळत
मला तर बाई नव्हतं
काहीच तेंव्हा कळत...

रथात बसून मला
खूप मज्जा आली
परी मला लाडाने
घरात घेऊन गेली...

परीचं घर पाहताच मी
जाम खुश झाले
खेळणी, खाऊ खूप काहीं
तिने मला दिले...

परिने दिली मला
सुंदरशी एक छडी
अन् फिरवून म्हणाली
मार आता उडी...

छडी फिरताच मीही
एक परी झाले
परी सारखेच मलाही
आता उडता आले...

तेवढ्यात मला आईची
हाक कानी आलीं
म्हणाली उठ बाळां
शाळेची वेळ झाली...

अस्सा मला राग तेंव्हा
आईचा माझ्या आला
किती सुंदर स्वप्नाचा
भंग तिने केला...

वाटतं मला रोज- रोज
असंच बाई घडावं
त्याच गोड परीचं
स्वप्नं मला पडावं
स्वप्नं मला पडावं...

सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
चोपडे, परभणी.
९८२३०६६६०६

# सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्यावर गुन्हे दाखल करा

## श्रावणदादा गायकवाड व शिष्टमंडळाची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सामाजिक न्यायविभागाचे सचिव श्रीमंत भांगे ग प्रत्येक योजनेत टक्केवारी घेवून काम करतात. भांगे यांच्या गैरकारभारामुळे मागासवर्गीय योजनेचा लाभार्थ्यांना मिळणाऱ्या लाभापासून वंचित राहावे लागत आहेत. तसेच त्यांनी अधिकाराचा गैरवापर, कर्तव्यात कसूर करून निष्काळजीपणा केल्याने व त्यांच्या कालावधीमध्ये त्यांनी अमाप बेकायदेशिर संपत्ती कमावली आहे. त्यामुळे त्यांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी करून त्यांचेविरुध्द ॲट्रॉसिटी गुन्हे दाखल करुन त्यांची सदरील विभागातून हकालपट्टी करण्याची मागणी आंबेडकरवादी संघर्ष समितीचे अध्यक्ष श्रावण गायकवाड यांनी केली आहे.
दि.०५/०४/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अबेडकरवादी संघर्ष समिती तर्फे अनुसूनित सामाव्यांच्या न्यायहक्क मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले आहे. त्याचे नेतृत्व समितीचे अध्यक्ष श्रवण गायकवाड यांनी केले आहे. मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जिल्हाधिकारी संभाजीनगर यांच्या मार्फत पुढील मागण्यांबाबत व कार्यवाहीसाठी. निवेदन देण्यात आले आहे.

**मागण्या–**

१ ) सामाजिक न्याय विभागाचे जातीयवादी सचिव सुमित भांगे यांच्या लाचलुचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात येवून दत्त हकालपट्टी करण्यात यावा तसेच अनुसूचित जाती-जमातीच्या लाभार्थ्यास शासकीय लाभापासून वंचित ठेवल्यामुळे त्यांनी अधिकाराचा गैरवापर करून कर्तव्यात करच निष्काळजी केल्यामुळे त्यांचे अँट्रासिटीअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात २ ) बार्टी मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिकृत (BAN-RF-2021) अंतर्गत ८६१ अनुसुचित जातीच्या संशोधक विद्यार्थ्यांना सरकट फेलोशिप मंजूर करून तात्काळ त्यांच्या खात्यावर जमा करण्यात यावी, तसेच महाविद्यालयीन विद्यांची स्वाचार व शैक्षणिक



शिष्यवृत्ती त्यांच्या खात्यावर जमा करणेबाबत.
३ ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्थेचे विविध जिल्हयातील बंद केलेले ३० प्रशिक्षण केंद्र त्वरीत चालू करण्यात यावे. ४ ) शासकीय नौकांचे खाजगीकरण करणारा १४ मार्च २०२३ चा शासन निर्णय ( जत ) रद्द करण्यात यावा. वरील मागण्या दि. १४ आत मान्य करण्यात याव्यात, नसता समितीच्या वतीने मध्य मोर्चा यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.
धरणे आंदोलनामध्ये यावेळी नानासाहेब शिंदे. वसंतराज वक्ते किशोर गडकर, मनिष नरवडे, संतोष मोकळे, अशोक गरुड, मोहनलाल गोरमे, मिलिंद मोकळे, प्रा. दिपक खिल्लारे, उत्तम जाधव मधुकर शिभुवन, सुनिल खरात, राहुल वडमारे, नरेश वरठे, संजय परके, सुनिल लक्ष्मण मोटे भाई भालेराव, अंकुश शिंदे, राहुल मकासरे, नवल सूर्यवंशी, भाई प्रकाश जाधव, पवन पवार, प्रकाश घोरपडे, ज्ञानेश्वर खरात, मिलिंद दाभाडे, शांतीलाल लसगरे, मदन मगरे, प्रविण बोर्ड किसण फुलमाळी, अमोल भालेराव, सुरज मगरे, किशोर सदानंद खदसन गौतम सोनवणे, समाधान सावंत, अशोक जगधने, सुरेश गायकवाड, संतोष राऊत, विकास जाधव, पुष्पानंद नितनवरे, बाबासाहेब सुरडकर, विजय मोरे, सुनिल अभी मुकुंदा, अरुण खरात, संतोष त्रिभुवन विकास पवार, भाऊ पाड निकाळजे, ज्ञानेश्वर पगारे, धम्मा मिसाळ, सोनू नरवडे, सचिन गायकवाड, राहुल खरात संदिप अहिरे, राजु महत्, शेख जावेद, निवास वाघमारे, भिर गवई, जगदीश हर्षल नरवडे, सत्यजित गायक कांचनताई सदाशिवे, संगिताबाई जाधव भालेराव, करुणाताई पाईफडे करुणा पाटोळे आदीसह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



# फुलंब्री येथे आनंदाचा शिधा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** राज्य सरकारच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या आनंदाचा शिधा या योजनेअंतर्गत फुलंब्री रेशनकार्ड धारकांना शिधा वाटप करण्यात आले.अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेतील शिधापत्रिका धारकांना राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या 'आनंदाचा शिधा' किटच्या वाटपास फुलंब्री तालुक्यात सुरुवात झाली. फुलंब्री येथील शिधा वाटप केंद्रात भा.ज.पा तालुका अध्यक्ष तथा नगराध्यक्ष सुहास शिरसाट यांच्या हस्ते करण्यात आली. गुढीपाडवा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त महाराष्ट्र शासनाने आनंदाचा शिधा देण्याचे जाहीर केले होते. यात गुढीपाडवा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त रेशन दुकानातून 100 रुपयात रवा, साखर, गोडेतेल, चणाडाळ प्रत्येकी एक किलो या वस्तू आनंदाचा शिधा म्हणून देण्याची घोषणा करण्यात आली होती. अनेक ठिकाणी आनंदाचा शिधा पोहचत आहे. फुलंब्री येथील नगराध्यक्ष सुहास शिरसाट व स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे उपाध्यक्ष स्वस्त धान्य दुकानदार संघटना फुलंब्री शहराचे अध्यक्ष अजय शेरकर यांची उपस्थिती होती.

# प्रा.डॉ. उमाटे यांना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**लातूर :** येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयात कार्यरत असलेले हिंदी विभाग प्रमुख तथा राष्ट्रीय छात्र सेना केअरटेकर ऑफिसर प्रा.डॉ. साईनाथ उमाटे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय सेवा योजना उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी शैक्षणिक वर्ष 2021-22 चा पुरस्कार नुकताच जाहीर झाला. ते मागील पाच वर्षांपासून रासेयो कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्य करीत होते. यापूर्वी डॉ.उमाटे यांना महाराष्ट्र शासन, रासेयो विभाग, टाटा मेमोरियल हॉस्पिटल व संबंध हेल्थ फाउंडेशन यांनी आयोजित केलेल्या (स्पिट फ्री इंडिया अभियान) मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून सदर अभियान यशस्वीपणे राबविल्या बद्दल महाराष्ट्र सरकारच्या वतीने लिडरशिप सर्टिफिकेट अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाधिकारी म्हणून केलेल्या कार्याची दखल घेऊन विद्यापीठाने त्यांना लातूर जिल्ह्यासाठी विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रमाधिकारी पुरस्कार जाहीर केला आहे. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निस्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन मिळावे तसेच त्यांच्या निस्वार्थ सेवेचा यथोचित गौरव व्हावा या उद्देशाने हा पुरस्कार जिल्हानिहाय दिला जातो. या पुरस्काराबद्दल डॉ.उमाटे यांचा महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी प्रो.डॉ. ब्रिजमोहन दायमा, डॉ.बी.जी. खटाळ, डॉ.बाळासाहेब चव्हाण डॉ.गणेश लहाने, डॉ.विशाल वर्मा प्रा.शशिकांत स्वामी, डॉ.वैशाली सातपुते, डॉ.आकांक्षा भांजी, प्रा. निखिल व्यास, प्रा.अक्षय पवार, डॉ. स्मिता भक्कड, प्रा. अनुजा कांबळे कार्यालयीन अधीक्षक राजेश सेलुकर,शिवाजी पांचाळ, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक प्रशासकीय अधिकारी व मित्र यांनी अभिनंदन केले.

# श्रीरामनगरात हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्सवात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीराम नगर, छत्रपती संभाजीनगर येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरामध्ये हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. श्रीराम नगर, हिंदुस्तान आवास समोर छत्रपती संभाजीनगर येथे पहाटे चार वाजता हनुमंताचा महाअभिषेक करण्यात आला. यामध्ये १५ यजमानांनी भाग घेतला.त्यानंतर सकाळी सहा वाजता हनुमंताचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला.हनुमंत रायाच्या जन्मा वेळी या ठिकाणी पाळणा सहजविण्यात आला व परिसरातील महिला भाविकांनी हनुमान जन्माचे पाळणे म्हणून पाळण्याची दोरी हलवली. यावेळी परिसरातील असंख्य भाविक उपस्थित होते. मंदिर खूप फुलांच्या माळा करून सजवण्यात आले होते. मंदिरासमोर तरुण मुलींनी खूप सुंदर रांगोळी काढली होती. त्यामध्ये त्यांनी रांगोळी मध्ये हनुमानाची मूर्ती काढली होती. ही रांगोळी पाहण्यासाठी असंख्य भाविक उपस्थित होते. त्यानंतर दिवसभर हनुमान चालीसा, मारुती स्तोत्र पठण करण्यात आले. सायंकाळी ठीक पाच वाजता ह भ. प. भागवतचार्य शाम महाराज भवर यांचे हनुमान जन्मोत्सव निमित्त कीर्तन झाले. यामध्ये महाराजांनी हनुमानाच्या भक्ती विषयी महत्त्व सांगितले.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# सावरकर गौरव यात्रा गंगापूर-खुलताबाद मतदारसंघात

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** गंगापूर - खुलताबाद मतदारसंघात दि.6/4/2023 वार गुरुवार रोजी सकाळी 8:00 वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर गौरव यात्रेस सुरवात करण्यात आली. ही यात्रा कायगाव टोका येथील रामेश्वर महादेव मंदिरात दर्शन घेऊन आ. प्रशांतजी बंब साहेब, किशोर आबा धनायत ( प्रदेश कार्य. सदस्य ), भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे ( रत्नपुर-खुलताबाद ), शिवनाथ मालकर ( भाजपा तालुकाध्यक्ष गंगापूर ) यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्यवीर सावरकर गौरवयात्रेस सुरवात झाली असून या यात्रेत मोटारसायकल रॅलीच्या माध्यमातून ही रॅली कायगाव - गंगापूर- मालुंजा- तांदुळवाडी- सिद्धनाथ वाडगाव- शेकटा- बुट्टेवाडगाव -शिल्लेगाव- शिरेगाव -देवळी -लासुर स्टेशन धामोरी- डोणगाव -रायपूर- पिंपळगाव( दिवशी ) - पाचपिरवाडी- कसाबखेडा - वेरुळ अशी येऊन घृष्णेश्वर महादेव शिवमंदिरात दर्शन व अभिषेक करून या रॅलीचा समारोप करण्यात आला आहे , या रॅलीत गंगापुर- खुलताबाद तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, जिल्हा चिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, जि.प उपाध्यक्ष एलजी.गायकवाड, सुरेश सोनवणे, भिमराव खंडागळे, सुमित मुंदडा, नंदकुमार गांधीले, प्रदीप पाटील, सुरेश मरकड, दिनेश अंभोरे, युवराज ठेंगडे, सतिश दांडेकर, परसराम बारगळ, योगेश बारगळ, प्रकाश चव्हाण, आशिष कुलकर्णी, अविनाश कुलकर्णी, संदिप निकम, दीपक बढे, गणेश सावजी, दिनेश कायस्थ, अनिल करपे, किरण बोडखे, राहुल निकुंभ, गणेश हजारी, सुखदेव ठेगडे, रविंद्र चव्हाण, बाळु नलावडे, आनंदा काटकर, अमोल जाधव, सुरेश जाधव, शरद गावंडे, रावसाहेब देशमुख अंकुश काळे, संतोष घुसिंगे, नरेंद्र सावळे, गोपाल वर्मा, रज्जाक पठाण, तसेच गंगापूर- रत्नपुर( खुलताबाद ) तालुक्यातील पदाधिकारी, शक्तिकेंन्द्र प्रमुख, बुथप्रमुख व सर्व गावातील कार्यकर्ते यांनी आपली स्वतःची मोटारसायकल घेऊन या रॅलीत वेळेत सहभागी झाले व मा.आमदार प्रशांतजी बंब साहेब हे स्वतःहा मोटरसायकल घेऊन या रॅलीत पूर्णवेळ कायगाव टोका येथील रामेश्वर महादेव मंदिर ते वेरुळ येथील घृष्णेश्वर महादेव मंदिरापर्यंत पुर्णवेळ या रॅलीत सहभागी झाले होते. या रॅलीचा समारोप वेरूळ येथे करण्यात आला या रॅलीत उपस्थित सर्व पदाधिकरी, लोकप्रतिनिधीं व कार्यकर्त्यांचे भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यानी आभार मानले.



# नवरंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखेचे उद्घाटन



आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** सभासदांनी विश्वासावर ठेवी ठेवल्यास त्याच्या विश्वासाला तडा जाऊन देणार नाही असे जाहीर वचन मी सभासदांना देतो असा विश्वास बाजार सावंगी येथील नवरंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयाच्या अध्यक्षीय पर बोलताना संस्थापक अध्यक्ष देविदास पाटील अधाने उपस्थितांना दिला.

खुलताबाद तालुक्यातील सर्वातमोठी बाजार पेठ म्हणून गणली जाणारी बाजार सावंगी येथे नवरंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयाचे उदघाटन बाजार सावंगी चे सरपंच अप्पाराव पाटील नलावडे यांचा हस्ते करण्यात आले. यावेळी अधाने पुढे म्हणाले कि, आज पतसंस्था ही सर्व सामान्य मोलमजुरी करणाऱ्या नागरिकांची मनी बँक म्हणून ओळख निमार्ण झाली आहे, बाजार सावंगी पंचक्रोशीतील नागरिकांना उत्तम दर्जाच्या सुविधा देण्याचे काम नवरंग नागरी पत संस्थेच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येईल. विशेष करून मी ठेवीदारांना विश्वास देऊन असे सांगतो कि आपल्या ठेवी सुरक्षित राहील असे वचन मी तुम्हाला सर्वांच्या साक्षीने देतो. या पतसंस्थेच्या माध्यमातून आपल्याला सर्व प्रकारच्या शासकीय निमशासकीय सुविधा देण्याचे काम या संस्थेच्या मार्फत देण्यात येईल. आजच्या स्पर्धाच्या काळात व्यवसाय वाढीसाठी सभासद व ग्राहकांचे विचार विनिमय लक्षात घेऊन विविध प्रकारेच्या ठेव योजना, कर्ज योजना राबून ग्राहकांना मोठ्या प्रमाणात याचा फायदा होईल. विशेष करून जेष्ठ नागरिकांना घर पोहच सुविधा देण्यात येईल यासह ऑनलाईन, सुविधा आर टी जी एस , एन.ई एफ . टी., क्यू. आर. कोड , एस एम एस सुविधा, लाईट बिल भरणा, मोबाईल अप्स, सेवा दिल्या जातील. यावेळी कार्यक्रमाचे उदघाटक बाजार सावंगीचे सरपंच अप्पाराव पाटील नलावडे , पंचायत समितीचे सभापती गणेश नाना अधाने, उपसरपंच कारभारी सुखदेव नलावडे, माजी सरपंच भीमराव नलावडे, तंटामुक्ती अध्यक्ष पुंजाजी अण्णा नलावडे, भाजपा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे, पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष देविदास अधाने पाटील, यशस्विनी महिला पतसंस्थेच्या अध्यक्ष सविता देविदास अधाने पाटील, सावता ग्रुप चे उद्योजक संजय पुंड, यशस्विनी महिला पतसंस्थेचे मुख्यव्यवस्थापक पवन पाटील अधाने या मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्थाविक व्यवस्थापक गणेश शिंदे यांनी तर सूत्रसंचालन विनोद गायकवाड यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखा व्यवस्थापक हरिश अधाने, अजिनाथ दांडेकर, रामेश्वर उसरे व कर्मचारी यावेळी बाजार सावंगी पंचक्रोशीतील सभासद, खातेदार, महिला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी जिंतूरात सासरच्या मंडळीविरुध्द गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** येथील मौलाना आझाद कॉलनी येथील रहिवाशी शेख वजीर अहेमद जमील अहेमद यांची मुलगी नेहा सिरत मोहितखान रा.परभणी हिला सासरच्या मंडळी कडून विविध कारणावरून मानसिक व आर्थिक त्रास मारहाण होत असल्याने विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी जिंतूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत असे की नेहा सिरत यांचे लग्न 2017 साली मुस्लिम रीतीरिवाजा प्रमाणे मोहितखान खुर्शीदखान रा. गालिबनगर दर्गा रोड परभणी यांच्या सोबत झाले. लग्नात हुंडयात नगदी दोन लाख पन्नास हजार,सोने, चांदीचे साडे चार तोळेदागीने व संसार उपयोगी दोन लाखाचे सामान दील्यांचे तक्रारीत म्हटले आहे.

काही दिवस सासरचे मंडळींनी चांगले नांदवले लग्नाच्या सात-आठ दिवसानंतर मला लग्नात दिलेले ( माहेर ) चे नगदी पैसे 11000 माहेरी का दिले रक्कम सोबत घेऊन का आली नाही म्हणून पती यांनी शिवीगाळ करून पैसे घेऊन येण्यास सांगितले मी माझ्या वडिलांना फोन करून पैसे घेऊन या म्हणून सांगितले माझे वडिलांनी परभणी येथे11000 रुपये नगदी आणुन दिले. तेव्हा पासून माझ्यावर जाज आणि जुलूम करून शिवीगाळ अपमानस्पद बोलणे सुरुवात केली मी व माझे सासरच्या मंडळीतील व्यक्ती एकत्रित राहत होतो माझी सासू दोन वर्षां पूर्वी मयत झाली तेव्हा पासून नंदन व नंदवाई हे माझ्या घरातच राहत होते. दरम्यान 2018 साली मला एक मुलगा इमादखान वय 5 वर्ष झाला आहे. 2019 साली पोल्ट्रीफार्म टाकण्यासाठी माहेरून एक लाख रुपये घेऊन ये म्हणून तकादा लावला त्यावेळी माझे वडिलांनी अर्बन कॉपरेटिव्ह बँके कडून 50 हजार रुपये कर्ज उचलून 50 हजार रुपये नगदी असे एक लाख रुपये माझ्या पतीस दिले तरी त्यांच्या वर्तणूक मध्ये सुधारणा झाली नाही व त्यांनी मला जास्तच त्रास देण्यास सुरुवात केली. दि.20/7/2020 रोजी मी घरी एकटी असताना माझा नंदवाई शेख मुस्ताक अन्सारी पिता रफिक अन्सारी हा माझ्या घरी आला मी एकटी आहे हे पाहून त्यांनी माझ्या उजवा हात वाईट उद्देशाने पकडून मला म्हणाला की नेहा तू जास्त टेन्शन घेऊ नकोस तु मोहितखान यांचे नादी लागू नकोस तुझी काही अडचण असेल तर मला सांग मी ते पूर्ण करेल माझ्यासोबत गैर वर्तणूक केले हा सर्व झालेला प्रकार मी माझ्या पतीला सांगितल्यावर उलट मलाच थप्पड बुक्क्याने मारहाण केले हे प्रकरण त्यांनी आपल्या बहिण भावा सांगितल्यावर त्यांनी सुद्धा मला थप्पड बुके आणि लाथा बुक्क्यांनी मारहाण केली त्यावेळी मी अडीच महिन्याची गर्भवती होती माझ्या पोटात माझ्या पतीने लाथा मारल्यामुळे मला रक्तस्राव सुरु झाल्याने डॉक्टरांनी तात्काळ गर्भ काढण्यास सांगितले सर्व हकीकत मी माझ्या वडिलांना सांगितल्यावर माझ्या वडिलांनी मला जिंतूरला घेऊन आले. नेहा सिरत मोहित खान पठाण राहणार गालिबनगर दर्गा रोड परभणी यांच्या तक्रारी वरून सासरच्या मंडळीतील नवरा मोहितखान खुशीदखान पठाण, दीर मुखीदखान खुर्शीदखान पठाण, ननंद सबाआफरीन मुश्ताक अन्सारी, नंदवाई मोहम्मद मुस्ताक अन्सारी पिता रफिक अन्सारी, चुलत सासू शमाबेगम समीखान पठाण सर्व राहणार गालिब नगर परभणी यांच्यावर कलम 498( अ )354,323,504,506,34 भा. द. वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक कुंदनकुमार वाघमारे हे करीत आहे.



# रस्ताकामाचे आ. फारुक शाह यांच्या हस्ते उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील अल्पसंख्याक भागात मुलभूत सुविधा जसे रस्ते, गटारी, पाण्याची पाईप लाईन यासाठी आजपर्यंत लोक प्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्यामुळे या भागाचा विकास थांबलेला होता. कॉलनी व वस्त्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे पावसाळ्यात हाल होत होते. त्या सगळ्या गोष्टींचा आमदार फारुख शाह यांनी अभ्यास करून ज्या भागात रस्ते नाही. गटारी नाही, पाईप लाईन नाही. यासाठी निधी उपलब्ध करून कामाचा सपाटा लावलेला आहे. प्रभाग क्रं 19 जामचा मळा भागात रियाज भाई यांच्या घरा पासुन ते नईम भाई यांच्या घरापर्यंत रस्ता खराब होता. या भागातील नागरिकांनी यासंदर्भात आमदार फारुख शाह यांना निवेदन देवून मागणी केली होती की, हा रस्ता खराब असून पावसाळ्यात नागरीकांचे फार हाल होत आहे. याची तत्काळ दखल घेत आ. फारुख शाह यांनी आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत प्रभाग क्रं 19 जामचा मळा भागात रियाज भाई यांच्या घरापासून ते नईम भाई यांच्या घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. या कामासाठी १५ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याचे आज आ. फारुख शाह यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाच्या, वेळी आ.फारुख शाह यांच्यासोबत नगरसेवक आमिर पठाण, प्यारेलाल पिंजारी, इकबाल शाह, आसिफ पोपट शाह, अजहर सैय्यद, माजीद पठाण, शादाब



खाटीक, कौसर शाह, हमीद पिंजारी, जहुर शाह, रीयाजूद्दीन शेख, साजिद खान, पप्पू लोहार, सलीम खाटीक, जमीर शेख, निसार पिंजारी, नईम शेख, गुलाब मणियार, रफीक मन्सुरी इ. उपस्थित होते. स्त्याचे काम सुरू झाल्यामुळे परिसरातील नागरिकांनी आ. शाह यांचा नागरी सत्कार केला व आभार मानले.



# मुद्रांक विक्रेत्यांचा राज्यस्तरीय मेळावा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील सैनिक भवन येथे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या एक महिन्यापासून या मेळाव्याचे नियोजन तयारी सुरू होती संपूर्ण महाराष्ट्रातून प्रत्येक जिल्ह्यातून मुद्रांक विक्रेता यात सहभागी झाले होते. कित्येक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मागणीसाठी हा मेळावा घेण्यात आला. मुद्रांक विक्री मागे टक्केवारीची कमतरता 100 ते 500 चे स्टॅम्प विक्री पेक्षा अधिक किमतीचा स्टॅम्प विक्री करण्यास मज्जाव. यासाठी जिल्हाधिकारी पासून ते मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना कित्येक निवेदन देण्यात आली महसूल मंत्री व मुख्यमंत्र्यांच्या भेटीही झाल्यात तरीही आमच्या मागण्या अजून प्रलंबित आहेत असे या ठिकाणी सांगण्यात आले. मुद्रांक विक्रेता हा स्टॅम्प विक्रीच्या माध्यमातून दोन नंबरचा महसूल मिळवून देतो तरीही आमच्यावर असा प्रकारचा अन्याय होत आहे, असे वक्तव्यही करण्यात आले. काही दिवसात आमच्या मागण्या जर पूर्ण नाही झाल्यात तर मोठे आंदोलन छेडू असे आव्हान या ठिकाणी करण्यात आले.

# वडोदबाजार येथे आनंदाचा शिधा वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वडोदबाजार :** राज्य सरकारच्यावतीने जाहीर करण्यात आलेल्या आनंदाचा शिधा या योजनेअंतर्गत वडोद बाजार रेशनकार्ड धारकांना आज (दि७) रोजी शिधा वाटप करण्यात आले. अंत्योदय व अन्नसुरक्षा योजनेतील शिधापत्रिका धारकांना राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या 'आनंदाचा शिधा' किटच्या वाटपास फुलंब्री तालुक्यात सुरुवात झाली.वडोद बाजार येथील शिधा वाटप केंद्रात उपसरपंच गोपाळ वाघ यांच्या हस्ते करण्यात आली. गुढीपाडवा व डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने आनंदाचा शिधा देण्याचे जाहीर केले होते. यात गुढीपाडवा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त रेशन दुकानातून 100 रुपयात रवा, साखर, गोडेतेल, चणाडाळ प्रत्येकी एक किलो या वस्तू आनंदाचा शिधा म्हणून देण्याची घोषणा करण्यात आली होती. अनेक ठिकाणी आनंदाचा शिधा पोहचत आहे. वडोद बाजार येथील उपसरपंच डॉ. गोपाळ वाघ व धुपाजी मस्के यांच्या उपस्थीतीत शिधा वाटप पार पडले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते उमेश गवळी, अंजुम शेख, शुभम गवळी, रमेश पांढरे, जाकीर शेख, राहुल दहिभाते, विलास मस्के, पुनमचंद राठोड, योगेश वाघ, गजानन घुले, रामदास बिलगे, पन्नालाल बिलगे, देविदास म्हस्के, मनोज भारती, लताबाई गवळी, गीता देशमुख, शांताबाई बिलगे, आदींसह रेशन कार्डधारक व ग्रामस्थ उपस्थित होते.



# आयु:पंख संघटनेतर्फे आरोग्य दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्त्री वैद्या संचलित आयु:पंख संघटनेतर्फे सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ ,संत रोहिदास आरोग्य केंद्र मुकुंदवाडी येथे जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला यावेळी डॉ. रीना देशमुख यांनी 14 ते 20 वर्ष वयोगटातील किशोरवयीन मुलींना आहार आणि मासिक पाळी या संदर्भात मार्गदर्शन केले यावेळी सौ.वर्षा पाटील (संत रोहिदास आरोग्य केंद्र प्रमुख) यांच्या विशेष सहकार्याने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वंदना सुरडकर (किशोरी विकास प्रकल्प संचालिका) सौ. कोमल मोरे (किशोरी विकास प्रकल्प समन्वयक), सौ. अनिता उमरे (तेजस्विनी महिला प्रकल्प समन्वयक) सौ.अनिता सपकाळ (किशोरी विकास प्रकल्प समन्वयक) व सौ. कल्याणी अवसरमोल व सौ. कल्पना नन्नावरे (किशोरी विकास प्रकल्प संवादिनी ताई) या सर्वांचे सहकार्य लाभले . तसेच आयु:पंख च्या डॉ. सुनीता परिहार, डॉ. सुचिता सावळे, डॉ. सुनीता राठोड, डॉ. स्नेहल विभुते, यांनी सर्व मुलींची आरोग्य तपासणी केली व शंकाचे निरसन केले. डॉ. मंगल ताठे यांनी सूत्रसंचालन केले आणि डॉ. वृषाली निर्वे यांनी आभार प्रदर्शन केले.



# सूतगिरणी चौकात खासगी बस आगीत जळून खाक

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** गारखेडा परिसरातील सूतगिरणी चौकातील देशी दारूच्या दुकानासमोर बुधवारी रात्री नऊ वाजेच्या सुमारास खासगी बसला अचानक आग लागली. पाहता पाहता बसला आगीने वेढले व काही मिनिटांमध्ये बस जळून खाक झाली. त्यामुळे समोर उभ्या दुसऱ्या बसचा पाठीमागील भाग या घटनेत जळाला. घटनेची माहिती कळताच अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेवून बसला लागलेली आग विझवली. बसला आग लागलेची घटना घडल्यावर शहरभर अफवांचे पेव फुटले होते. या घटनेची नोंद जवाहरनगर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# नक्षलवाद्यांमध्ये आणि पोलिसांत चकमक

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यातील सालेकसा पोलीस ठाणे अंतर्गत मुरकुटडोह आऊटपोस्टअंतर्गत येत असलेल्या छत्तीसगड सीमेवरील दक्षिणपूर्व भागातील आऊट पोस्टपासून 3 कि.मी.अंतरा वरील टकेझरी जंगल पहाडी परिसरात शुक्रवारला सायकांळी साडेसहा ते सात वाजेच्या सुमारास पोलिसांसोबत नक्षलवाद्यांची चकमक झाल्याची घटना घडली. या घटनेत सहा ते सात नक्षली हे छत्तीसगड वरुन महाराष्ट्रातील सीमेवरील जंगलात शिरत असल्याचे शोध मोहिमेवर असलेल्या गोंदिया पोलिसांच्या पथकाला दिसताच त्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. नक्षल्यांनीही गोळीबार करत घटनास्थळावरुन परत छत्तीसगडच्या दिशेने फरार झाले. या घटनेत कुणीही जखमी झाला नसून सालेकसा पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. सहा ते सात संशयित व्यक्तीच्या हालचाली या परिसरात असल्याची गुप्त माहिती मिळाली असता त्या परिसरात शोधमोहीम वाढवली होती. दरम्यान, महाराष्ट्राच्या सीमेत शिरत असताना शोधमोहीम करणाऱ्या पथकांनी त्यांचेवर गोळीबार केला असता त्यांच्याकडून परत गोळीबार करण्यात आला. दोन्हीकडून अर्धातास गोळीबार झाला.



# परतीच्या पावसाचा पिशोर परिसरात धुमाकूळ

## पावसाच्या जोराने शेतात पडले भेग; शेतकऱ्यांचा हाता तोंडाशी आलेला घास हिरवला

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** तालुक्यातील पिशोर व परिसरात शुक्रवार रोजी सायंकाळी अवकाळी पावसाने धुमाकूळ घातल्याने शेतकरी वर्ग हतबल झाला आहे, गहु, ज्वारी, बाजरी, मका, उस , कांदा आदीसह पिके आडवी झाली असून जमीदोस्त झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आधीच खरिपातील पिकांना भाव मिळत नसल्याने आर्थिक शेतकरी संकटात सापडला होता . यात पुन्हा अवकाळी पाऊस व गारपिट मुळे हातातोंडाशी आलेले पिके आडवी झाल्याने शेतकरी पुन्हा हतबल झाला आहे . शासनाने पिशोर, भारंबा, वाड़ी भारम्बा, कोलंबी, वासडी, हस्ता भिलदरी, पळशी, रामनगर, साखरवेल, मोहन्द्री या गावासह परिसरतील नुकसानीचे सरसकट पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली या बाबत सविस्तर माहिती अशी आहे की, कन्नड तालुक्यातील पिशोर परिसरात शुक्रवार रोजी जवळपास धु धु पाउस 2 तास पाऊस पडल्याने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे .एन रात्रि हे आस्मानी संकट आल्याने शेतकरी हतबल होऊन चिंतातुर झाला आहेत, वेळ रात्रिची असल्यामुळे अनेकांची तारंबळ उडाली होती, अनेक शेतकऱ्यांना आपली मका, गहु हे उन देण्यात करीता बाहेर मोकळया जागी ठेवल्या होत्या मात्र अचानक धुवाधार पाउस आल्याने त्यांना कसे झाका हा मोठा प्रश्न उपस्थित झाला होता, परिसरातील शेतकऱ्यांने मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे शासनाने तत्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत. परिसरातील पिशोर,बाळखेडा दिगर, शफेपूर, खडकी, रामनगर, साखरबेल पळशी, वासडी, कोळंची मांजरा, भारंबा बाडी, तांडा भारंबा, शफियाबाद , भिलदरी, मोहंद्री, आदीसह परिसरात शनिवारी सुमारे अर्धा तास अवकाळी पाऊसासह गारपीट झाल्याने शेतातील उभी पिके आडवी झाल्याने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनाचा गहू , मका , कांदे , हरभरा यासह पिकांना गारपीट मुळे मोठा नुकसान झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

परिसरात शुक्रवार रोजी झालेल्या अवकाळी पावसाने बळीराजाचे मोठे नुकसान झाले आहे, मागच्या महिन्यात ही आश्यच प्रमाणे गारा पड़ल्याने मोठे नुकसान झाले होते, विशेषतः यात हातातोंडाशी आलेले पीक नजरेसमोर होत्याचे नव्हते झाले. निसर्ग कोपल्याने शेतकरी हतबल झाला आहे. त्यामुळे कशी नशिबाने नुकसानिचा खेळ मांडला... असे म्हणण्याची वेळ आली आहे, आली आहे. सर्व प्रथम मोठ्या पिकाना फटका बसला आहे. पिशोर परिसरात शुक्रवार रोजी अवकाळी पावसाला व गारपीटीला सुरुवात झाली. यामुळे शेतशिवारात शेतकऱ्यांची एकच पाचपळ उडाली. गारापासून वाचण्यासाठी जो - तो आसरा शोधत होता. सोबत गारा पड़त असल्याने शेतातील मका, गहू, कांदा, मिरची, ज्वारी, बाजरी, हरभरा , रब्बी पिकांचे प्रचंड नुकसान झाले. गारा दगड़ा सारख्या पड़त असल्याने ओपन शेत शिवार असल्याने अनेकांना गाराचा मार ही बसला आहे,मात्र यातून काहि





हानी झाली नसल्याचे दिसत आहे, पिशोर परिसरातील खातखेडा, पळशी येथे अवकाळीने अक्षरशः थैमान मांडले होते. या गाव परिसरातील शेतांमध्ये प्रचंड या पूर्वी ही प्रचंड़ गारपीट झाली, आता धुव्वधार पाउस पडल्या मुळे बळीराजाच्या नजरेसमोर आपल्या हाताने जोपासलेली पीके काही क्षणात होत्याची नव्हती झाली. यात बळीराजा मात्र अजूलपवून केवळ आपल्या नशिबाला दोष देत असल्याचे दिसून आले . शासनाने आता तरी त्यांचे डोळे उघडावेत आणि बळीराजाचे अबू पुसावे, अशी जणूकाही मागणी बळीराजाच्या डोळ्यातून धं - पडणारे पाणी करत असावेत असे विदारक दृश्य आज परिसरात पाहावयास मिळाले.



**भल्या पहाटे नुकसान दिसल्याने भारम्बा गावाचे सरपंच प्रवीण शिंदे यांचा तहसीदारांना फोन**

तालुक्यातील शेतकरी वर्ग एक तर मालाला भाव नसल्याने मेटाकुटीला आहेत, मगिल दो महिन्या पासून घरात साठवून थेवलेला भाव वाढीच्या आशेवर कापूस मिळेल त्या भावात द्यावा लागत आहे, बहुतांश शेतकऱ्यांणी उधार उसनावर करून आपल्या शेतात पेरणी केली होती, मात्र हातातोंडाशी आलेली पिक डोळ्या सोबर उध्वस्त होत असल्याने शेतकरी घबरला आहे, शुक्रवार रोजी धुव्वधार पाउसाने भारंबा शिवारात मोठे नुकसान केले आहे या बाबत मि तहसीलदार साहेबांनी समक्ष कॉल करून माहिती दिली आहे, तसेच त्यांनी जीपीएस द्वारे फ़ोटो काढण्याची माहिती दिली आहे आणि लवकर पंचनामा करून भरपाई देन्याची माहिती दिली आहे .

# कोमात गेलेल्या विद्यार्थ्यासाठी सरसावली शाळा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर येथील दि.५/४/२३ रोजी झाडाची फांदी डोक्यावर पडल्यामुळे कोमात गेलेल्या विद्यार्थ्याच्या वैद्यकीय मदतीसाठी शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक पुढे सरसावले असून 'एक हात मदतीचा ' या मदत फेरीद्वारे १० हजार रुपयांची मदत पालकांच्या स्वाधीन केली आहे .

पहूर येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात इयत्ता सहावी मध्ये शिकणारा विष्णू गणेश कुमावत हा हिवरखेडा ( ता . जामनेर ) येथील विद्यार्थी शनिवारी दुपारी ३ वाजता पिंपळाची फांदी डोक्यात पडल्याने गंभीररित्या जखमी झाला . त्याला तात्काळ पहूर ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले .त्याच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यास पुढील उपचारार्थ जळगाव जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती



अत्यवस्थ झाल्याने त्यास जळगाव येथेच डॉ . डाबी यांच्या खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले असून तिथे अतिदक्षता विभागात त्याच्यावर उपचार सुरू आहेत . गेल्या ५ दिवसांपासून तो बेशुद्धावस्थेत असून डॉक्टर त्याला वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करीत आहेत .

सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी खाऊचे पैसे मदतीसाठी देऊन शिक्षकांच्या सहकार्याने गावातून तसेस बस स्थानक परिसरातून 'एक हात मदतीचा ' हा उपक्रम राबवत माणुसकीचे दर्शन घडविले . या उपक्रमाद्वारे १० हजार रुपयांचा निधी संकलित झाला असून सदर निधी जखमी विष्णूचे वडील गणेश कुमावत यांच्या स्वाधीन करण्यात आला आहे. जखमी विष्णूची घरची परिस्थिती हालाखीची असून आई आणि वडील शेतमजुरी करत कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात . अचानक आलेले हे संकट दूर करण्यासाठी ग्रामस्थ मदत करत आहेत. हिवरखेडा येथील भाऊराव पाटील , भास्कर पाटील, उत्तम पाटील यांच्यासह ग्रामस्थांनी वाकोद, हिवरखेडा, पिंपळगाव, वडगाव, हिवरी येथेही मदतीसाठी पदर पसरवून उपचारासाठी निधी संकलित केला आहे. विष्णू गणेश कुमावत या विद्यार्थ्यांच्या उपचारासाठी दात्यांनी मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अलिजा जावेद रंगरेजचा पहिला रोजा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील कन्नड येथील अलिजा जावेद



रंगरेज पहिल्या रोजा जीवनाचा पहिला सफल झाला पवित्र रमजान महिन्यात आपल्या रोजा पुर्ण केला. आयशानगर नगरसेवक फकीरा रंगरेज यांची नात आलीजा जावेद वय चार वर्षे या मुलीने पवित्र रमजानतला पहिला रोजा ठेवला उपवास एवढ्या कमी वयात पूर्ण केला. सध्याचे तापमान आणि रखरखत्या उन्हाळ्यात पहाटे पाच वाजेपासून ते सांयकाळी सात वाजेपर्यंत अन्नाच्या एक कण आणि पाणी च्या आधारावार उपाशी पोटी राहून तिने एवढ्या कमी वयात आपल्या जीवनाचा पहिला रोजा पुर्ण केल्याबद्दल या मुलाची आजोबा फकीरा रंगरेज व आई वडील नातेवाईक यांच्या अभिनंदन करुन शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# आ. राजेश पवार यांच्या संकल्पनेतील कृतीशील नगरपालिका दक्षता समिती जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्र्याच्या शिफारसी व मार्गदर्शनानुसार नुकतीच धर्माबाद नगरपालिका स्तरीय दक्षता समिती जाहीर झाली असून आमदार राजेश पवार यांच्या संकल्पनेतील कृतीशील, सर्वसमावेशक व्यक्तिमत्व असलेल्या बारा लोकांची अशासकीय सदस्य म्हणून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यादी जाहीर केली आहे.

राज्यातील बहुसंख्य नगरपालिकेचा कार्यकाळ संपला असून येथे प्रशासक आहेत. अशा नगरपालिकेवर, त्यांच्या कार्यावर अंकुश राहावा, विविध जाती धर्मातील लोकांच्या नगरपालिका अंतर्गत समस्यांना वाचा फोडावी यासाठी सदरील दक्षता समिती ही करडी नजर ठेवून असते. त्यामुळे या समितीला अनन्य साधारण महत्व आहे. जेकी नगरसेवक समकक्ष आहे. सदरील समितीचे अध्यक्ष हे आमदार राजेश पवार हे असून उपाध्यक्ष विधान परिषद आमदार राम पाटील रातोळीकर आहेत. तर नगराध्यक्ष पद रिक्त असल्यामुळे पदसिद्ध सदस्य म्हणून तत्कालीन नगराध्यक्ष यांची या समितीत वर्णी असून बाकीच्या अशासकीय सदस्यांमध्ये आमदार राजेश पवार यांनी खरोखरच तळागाळातील लोकांचे प्रश्न समजून घेणारे विविध जाती धर्माच्या कार्यकर्त्यांना या समितीमध्ये स्थान देण्यामुळे शहरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

अशासकीय सदस्यांमध्ये ग्राहक चळवळीशी संबंधित व्यक्ती म्हणून साईनाथ बोईनवाड, अ.ज. जमातीचे आकाश जंगीटवर, अनुसूचित जाती जमातीचे व सद्यस्थितीत पत्रकाराची



भूमिका योग्यपणे साकार करणारे पत्रकार संघटनेचे अध्यक्ष गंगाधर धडेकर, महिला प्रतिनिधी म्हणून सौ.सुनीता रमेशगौड जंगमपल्ली, स्वाती राजेश सुरकुटवार, विरोधी पक्ष सदस्य म्हणून प्रवीण मदनुरे, नानकसिंग ढिल्लों, सामाजिक कार्यकर्त्यांमधून बालाजी चिंतावार, अल्पसंख्याक प्रतिनिधीचे सदस्य म्हणून याया खान पठाण, रास्त भाव दुकानदार प्रतिनिधी म्हणून राजेश्वर व्होटकर इत्यादींची या समितीमध्ये वर्णी लागली असून या समितीचे सचिव तहसीलदार दत्तात्रय शिंदे हे आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर या मानापानाच्या समितीवर आमदार राजेश पवार यांच्या संकल्पनेतील चांगल्या लोकांची वर्णी लागल्यामुळे त्यांच्यावर कौतुकाचा पाऊस पडत आहे.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# सुख- शांती हवी असेल तर अध्यात्माची कास धरा

## ह.भ.प. एकनाथ नामदेव महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहची सांगता

आधुनिक केसरी न्यूज

**महेंद्र बोराळे**

**कंधार :** तालुक्यातील शेकापुर येथील दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी भव्य बारशी यात्रा महोत्सव कै. रामचंद्र पाटील केंद्रे यांच्या शेतातील श्री शंभू महादेव यांच्या भव्य यात्रेला गुरूवार दि. ३० मार्च पासून प्रारंभ झाला होता. या यात्रेनिमित्त भव्य कुस्त्यांची दंगल, कावडीचा कार्यक्रम, कळस स्थापना व इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रथमच शेकापूर येथे भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन संत नामदेव महाराज संस्थानचे मताधिपती एकनाथ नामदेव महाराज यांच्या कृपेने व भजन शिरोमणी वारकरी भूषण श्री प्रेमराज महाराज आनंदवाडीकर यांनी तयार केलेल्या गुनिजन भजनी मंडळाच्या सहकार्याने हा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शेकापूर येथील कै. रामचंद्र पाटील केंद्रे यांच्या शेतातील जागृत महादेव मंदिर असून सर्व पंचक्रोशित नवसाला पावणारा महादेव म्हणून प्रसिद्ध आहे. या देवस्थानास नांदेड, जिल्ह्यातील मोठा भाविक वर्ग दर्शनासाठी येत असतो. दि.६ एप्रिल रोजी सकाळी ६ वा. कळसाची मिरवणूक, सकाळी ८ ते ११ कळस पुजा होमहवन व काल्याचे किर्तन श्री ह.भ.प. महंत गुरुवर्य एकनाथ नामदेव महाराज उम्रजकर यांच्या हस्ते कळस स्थापना व काल्याचे कीर्तन संपन्न झाले. काल्याच्या कीर्तनामध्ये महाराजांनी मार्गदर्शन करत असताना समस्त ग्रामस्थांना आपल्या जीवनामध्ये सुख शांती हवी असेल तर अध्यात्माची कास धरा असा मोलाचा संदेश महाराजांनी आपल्या कीर्तनातून देऊन व असाच अखंड हरिनाम सप्ताह पुढे मोठ्या आवडीने करावा असं गावकऱ्यांना आवाहन केले अध्यात्मामुळे माणूस सुसंस्कृत व व्यसनमुक्त व्यसनापासून दूर राहून आपला संसार व परमार्थ सुखाचा होऊ शकतो त्यामुळे अध्यात्माचे सर्वांनी पालन करावं असंही आव्हान महाराजांनी या कीर्तनातून समस्त ग्रामस्थांना केले.

महाराज आपल्या कीर्तनात पुढे बोलत असताना संत नामदेव महाराज संस्थान उंब्रज व शेकापूर वासियांचे असलेले जुने संबंध यावरती बोलत असताना महाराजांनी संत नामदेव महाराज तेलंगणा राज्यातून येत असताना शेकापूर मुक्कामी राहत होते असाही जुनी आठवण महाराजांनी शेकापूर वाशीयांना करून दिले व संत नामदेव महाराजांच्या हस्ते बजरंग बली हनुमंतरायांना पनीर खाऊ घातला अशी आख्यायिका असल्याचे ग्रामस्थांना सांगितले .

महाराज पुढे बोलत असताना आपल्या अंतकरणांमध्ये असलेल्या विकाराच्या गाठी नाहीशा करून आपलं चित्त निर्मळ केल्यानंतर आपल्या अंतकरणांमध्ये भगवान परमात्म्याचा वास होतो असेही सांगितले व आपल्या अंतकरणांमध्ये अहंकार गर्व मी पणा हे सोडून देऊन प्रत्येकाने एकमेकाबद्दल बोलत असताना सर्वांनी प्रेमाने व आदराने वागावे असे गावकऱ्यांना सांगितले सर्व जणतेनी कुठलाही भेदभाव न करता एक मेकाच्या सहकार्याने राहावे असेही महाराजांनी सर्व गावकऱ्यांना आवाहन केले. शेकापूर येथील सर्व मुलींना तथा बायलेकींना ओटी व शंभू महादेवाची पिंड देऊन सन्मानित करण्यात आले.


या कार्यक्रमास मृदंगाचार्य म्हणून तालमणी नामदेव महाराज केंद्रे विशाल म. बाबुळगावकर माऊली महाराज तिडके व गायनाचार्य म्हणून स्वर रत्न गोपीनाथ महाराज केंद्रे विष्णु महाराज तांदळीकर राहुल नावलगावकर प्राध्यापक राजेंद्र महाराज घुगे कैलास महाराज मुरकुटे वैजनाथ महाराज तिडके व पंचक्रोशीतील भजनी मंडळ यांचे सहकार्य लाभले

यात्रा कमिटी व समस्त गावकरी मंडळींच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



# माडग्याळमध्ये मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त मैदानी कुस्तीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**जत :** सांगली जिल्ह्यातील माडग्याळ येथे श्री मल्लिकार्जून देवाच्या यात्रेनिमित्त रविवारी खास कुस्ती शौकिनांसाठी जंगी मैदानी कुस्तीचे आयोजन करण्यात आले आहे. एकूण 200 पैलवान या कुस्तीत भाग घेणार असल्याची माहिती कुस्ती कमिटीचे अध्यक्ष लिंबाजी माळी उपाध्यक्ष कामाण्णा बंडगर यांनी दिली. कुस्तीसाठी राज्य स्तरावर मैदान गाजवलेल्या पैलवानांची हजेरी असणार आहे. तसेच या कुस्तीत महिला कुस्ती पैलवांनाच्या लढती होणार आहेत. पांरपारीक खेळ असल्याने कुस्तीला प्रोत्याहन देण्यासाठी माडग्याळमध्ये प्रथमच कुस्तीचे आयोजन करण्यात आल्याचे लोकनियुक्त सरपंच अनिताताई महादेव माळी यांनी सांगितले. माडग्याळचे लोकनियुक्त सरपंच सौ. अनिताताई महादेव माळी यांच्याकडून प्रथम क्रमांकाच्या विजयी पैलवानास दोन किलो चांदीचा गदा भेट स्वरूपात व कुस्ती कमिटीकडून एक्कावन्न हजार रूपये देण्यात येणार आहे. माडग्याळ पंचक्रोशीत प्रथमच येवढ्या मोठ्या प्रमाणात कुस्तीचे मैदान होणार आहे. प्रमुख पाहुणे व उध्दाटक म्हणून महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्याध्यक्ष व सांगली जिल्हा तालिम संघाचे अध्यक्ष नामदेव रावजी मोहिते ( बापू ) व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे निवेदक मा. श्री. पैलवान कृष्णा शेंडगे सर उपस्थित असणार आहेत. प्रमुख पाहूणे म्हणून आरोग्य सभापती तम्मणगौडा ईश्वराप्पा रवीपाटील, हरीभक्त परायण तुकाराम बाबा महाराज, प्रकाशराव जमदाडे व सरदार पाटील, सांगली जिल्हा आरपीआय चे अध्यक्ष संजयजी कांबळे, उमदी पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक पंकज पवार, डी. बी माळी, पैलवान श्रीशैल कोटगोंड, भागिरथी मल्टिस्पेशलीटी हॉस्पिटल चे संचालक डॉ. सार्थक हिट्टी, शेखर हिट्टी साहेब उपस्थित राहणार आहेत.

लोकनियुक्त सरपंच व यात्रा कमिटीचे अध्यक्ष अनिताताई महादेव माळी, उपसरपंच तथा यात्रा कमिटीचे उपाध्यक्ष सविता मच्छिंद्र सावंत, भावी उपसरपंच निकिता कांबळे यात्रा कमिटीतील सदस्य महादेव माळी, बाळासो सावंत, शिवानंद हाक्के, पांडूरंग सावंत, पिराप्पा कांबळे निरेमला कोरे शोभा कोरे, संगिता माळी, शारदा माळी श्रीमती कुसूम चव्हाण व प्रेमनाथ चौगुले, तसेच शशिकात माळी, कुस्ती कमिटीकडून लिबांजी माळी, कामाण्णा बंडगर, जेटलिन कोरे, तुकाराम कोरे, आंबू कांबळे, प्रविण सावंत, मच्छिंद्र सावंत यांनी नियोजन केले आहे.

# गुलाबराव इंगळे, अमोल गावंडे, सागर झनके यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान



आधुनिक केसरी न्यूज

जळगाव जा : दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा राज्यस्तरीय स्व.मोहनलालजी बीयानी पुरस्कार वितरण सोहळा महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री अतुल साबे यांचे अध्यक्षतेखाली सात एप्रील रोजी हॉटेल वर्षा इन संभाजी नगर औरंगाबाद येथे पार पडला. पत्रकारितेत उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल यावर्षीचा राज्यस्तरीय स्व.मोहनलालजी बियानी विभागीय स्तरीय ( अमरावती ) पुरस्कार गुलाबराव इंगळे दै.सकाळ तालुका प्रतीनीधी, अमोल गावंडे,निर्भिड स्वराज्य संपादक खामगाव आणि आधुनिक केसरिचे बुलढाणा जिल्हा प्रतीनीधी सागर झनके यांना महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री अतूल सावे, महाराष्ट्र पत्रकार संघाचे प्रदेश अध्यक्ष वसंत मुंडे, दै.मराठवाडा साथीचे संपादक चंदुलाल बियानी, डॉ. प्रभू गोरे यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. गेल्या तीन वर्षापासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई आणि दै.मराठवाडा साथी यांचे संयुक्त विद्यमाने पत्रकारिता क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केल्याबद्दल पत्रकरांना हा पुरस्कार दिल्या जातो.त्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून पुरस्कारासाठी निविदा मागवण्यात आल्या होत्या.यावर्षी अमरावती विभागीय स्तरातून गुलाबराव इंगळे, अमोल गावंडे आणि सागर झनके यांना स्व.मोहनलालजी बियानी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल तीनही पत्रकार बांधवांचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# लिंबाचाचटका

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

ह्या दिवसात रसरशीत मस्त मोठी पिवळी धमक लिंबं मिळतात.नेहमीप्रमाणे वर्षभर टिकणारं साधं ,उपवासाचे लोणचं करून ठेवतोच. पण झटपट होणारा चटकदार लिंबाचा चटका माझ्या मामेनणंद सौ सविता शरद देसाई हिने रेसिपी सांगितली मग करून बघितला घरात सगळ्यांना खुप आवडला . आजारी माणसाला तर तोंडाला चव आणणारा , लहान मोठ्या सगळ्यांनाच आवडणारा "लिंबाचा चटका " नक्की आवडेल करून बघा आणि कळवा नक्कीच.त्यासाठी लिहून घ्या साहित्य आणि कृती...

**लिंबाचा चटका**

**साहित्य :** दोन तीन लिंबं, अर्धा चमचा लोणच्याचा मसाला, अर्धा चमचा तिखट , थोडाआल्याचा किस , हिंग हळद, जिरे, मोहरी, मेथीदाणे, तेल फोडणीसाठी, एक ते दीड चमचा साखर अर्धा चमचा मीठ चवीनुसार प्रमाण कमी जास्त करा. अर्धा लिंबाचा रस...

**कृती::** लिंबं स्वच्छ धुऊन, कोरडे करून घ्या. दोन लिंबाची सालकाढणीने लिंबाच्या वरची पिवळीसाल काढून घ्या . आतला पांढरा थर पण थोडा थोडा काढून टाका. आता त्याच्या फोडी करून बिया काढून टाकाव्यात. मिक्सरच्या भांड्यात घाला त्यात मीठ साखर चवीनुसार, आल्याचा कीस, लोणच्याचा मसाला, तिखट घालून बारीक फिरवून घ्या .हे मिश्रण बाऊलमधे काढून घ्या. त्यात लिंबाचा रस घालून मिश्रण एकसारखे हलवून घ्या. त्यावर हिंग जिरे मोहरी हळद मेथीदाणे घालून खमंग फोडणी करून घालावी.मिश्रण एकसारखे हलवून घ्या. भरपूर दिवस टिकते. तोंडाला चव येते.आंबट ,गोड, तिखट चवीचा लिंबाचा चटका तयार. मग करून बघाच एकदा..



# समर स्पेशल-गुलाब फिरनी

आधुनिक केसरी



## लय भारी सुगरण

सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

**साहित्य :** अर्धी वाटी तांदूळ , 4 चमचे साखर , 1 लिटर दूध , 2 चमचे साजूक तूप , 2 चमचे गुलाब पाणी 2 चमचे वाळलेल्या गुलाब पाकळ्यांचा चुरा, 2 ते 3 थेंब रोज इसेन्स, सजावटीसाठी बदाम, पिस्ते. **कृती :** प्रथम तांदूळ स्वच्छ धुवून चांगले सुकवून घ्यावेत मग गॅसवर कढई ठेवून त्यामध्ये तूप घालून तांदूळ गुलाबी रंगावर भाजून घ्यावेत.मग थोडे थंड झाले की मिक्सर मधून थोडे जाडसर भरडून घ्यावेत. गॅसवर जाड बुडाच्या भांड्यात किंवा कढई मध्ये दूध उकळण्यास ठेवावे.थोडे आटले की त्यात साखर घालावी.साखर विरघळली की त्यात मिक्सर मधील तांदूळाचे पीठ घालावे. सतत ढवळत राहावे.म्हणजे चांगले एकजीव होईल ,गाठी होणार नाहीत आणि बुडालाही लागणार नाही. नंतर त्यात गुलाब पाणी व थोड्या गुलाब पाकळ्यान्चा चुरा बाजूला ठेवून बाकीचा सर्व फिरनीत घालावा. शेवटी रोज इसेन्स घालून व्यवस्थित हलवून गॅस बंद करावा. ही फिरनी थंड करण्यासाठी एका भांड्यात काढावी.थोडी थंड होताच छान भांड्यात काढून फ्रीझ मध्ये एकदम थंडगार होण्यासाठी ठेवावी.छान थंड झाली की त्यावर बाकीच्या गुलाबपाकळ्यांचा चुरा घालून व बदाम पिस्ते यानी मस्त सजवुन थंडगार गुलाब फिरनी सर्व्ह करावी.

**वैशिष्ट्य :** उन्हाळ्यात गुलाब हा थंडावा देणारा आहे.म्हणूनच रोज सरबताना उन्हाळ्यात खूप महत्व असते. स्वाद आणि चव दोन्हिहि एकदम लाजवाबच ! शिवाय आकर्षकही आहेच. उन्हाळ्यात थंडगार पदार्थ खाताना वेगळीच मज्जा येते. थंड आणि गोड पदार्थांमुळे ॲसिडिटी पण होत नाही. दुध,तुप,बदाम ,पिस्ते यामुळे ही पौष्टिकहि असते. पोट आणि मन दोन्ही तृप्त होते.

